रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८८ | अंक १०८ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in



# कृषीवल

रायगड, रविवार, दि. १५ सप्टेंबर २०२४

किंमत ४ ₹

विनायका हो सिद्धगणेशा
रंग सभेला या तुम्ही या...
पक्षी गाती घरट्यांमधुनी
आशीर्वच हो द्या तुम्ही द्या...

॥ वंदितो तुजला गजवदना ! ॥

## वे|ध|क

### रायगडात सोमवारची सुट्टी कायम

**अलिबाग :** रायगड जिल्ह्यात मुस्लिम बांधव व पोलीस अधीक्षक रायगड यांच्याशी झालेल्या चर्चेनुसार ईद-ए-मिलादनिमित्ताने सोमवार, दि.१६ सप्टेंबर रोजी राज्य शासनाने जाहीर केलेली सार्वजनिक सुट्टी कायम ठेवण्यात आली आहे. राज्य शासनाने अधिसूचित केलेल्या २४ सार्वजनिक सुट्ट्यांमध्ये ईद-ए-मिलाद या सणाची सोमवार, दि. १६ सप्टेंबर रोजी दर्शविण्यात आलेली सार्वजनिक सुट्टी रायगड जिल्ह्यामध्ये नवीन अधिसूचनेद्वारे कायम ठेवण्यात आली आहे. याची सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालयांनी आणि संबंधितांनी नोंद घ्यावी, असे उपजिल्हाधिकारी डॉ. रवींद्र शेळके यांनी कळविले आहे.

### मुरूड शहर पूर्वपदावर

**आगरदांडा :** दोन दिवसांपूर्वी भोगेश्वर पाखाडीत दोन लहान मुलांनी सायंकाळच्या दरम्यान गौरी गणपती विसर्जन मिरवणुकीवर दगडफेक केल्याने शहरात तणावाचे वातावरण होते. दरम्यान, मुरुड शहरातील व्यापाऱ्यांनी दुकाने बंद केली होती. आज तणावाचे वातावरण निवळल्याने मुरुड शहर हळूहळू पूर्वपदावर येत असल्याचे दिलासादायक चित्रही पाहायला मिळत आहे. मुरुड बाजारपेठ सुरू झाल्याने हळूहळू लोकांची गर्दी वाढली आहे. पोलिसांचा खडा पहारा अद्यापही तैनात आहे. जो भाग संवेदनशील आहे. त्या भागामध्ये पोलिसांचा सर्वाधिक पहारा ठेवण्यात आला आहे.

### भीषण अपघातात चौघे जागीच ठार

**छ. संभाजीनगर :** छत्रपती संभाजी नगरमध्ये झालेल्या एका भीषण अपघातामध्ये एकाच कुटुंबातील चौघांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये सहा महिन्यांच्या बाळाचाही समावेश आहे. दहा वर्षांनंतर झालेल्या बाळाचे बारसे आटोपून अमरातीहून पुण्याच्या दिशेने जात असताना वाळूजपासून तीन किलोमीटर पुढे लिंबेजळगाव परिसरातील टोलनाक्याजवळ हा अपघात घडला. दारू पिऊन गाडी चालवणाऱ्या तरुणांच्या स्कॉर्पिओने कारला जोरदार धडक दिल्याने हा अपघात झाला. या अपघातात मृणालिनी अजय बेसरकर (३८), आशालता पोपळघोटे (६५), दुर्गा सागर गिते (७) आणि सहा महिन्यांच्या बाळाचा जागीच मृत्यू झाला. तर, ४० वर्षीय अजय बेसरफर आणि ३५ वर्षीय शुभांगीनी गिले जखमी झाल्या आहेत. दरम्यान, मद्यपान करुन कार चालवणाऱ्या स्कॉर्पिओमधील दोन्ही तरुणांविरुद्ध सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### मान्सूनच्या निरोपाची वेळ समीप

**नवी दिल्ली :** मान्सूनच्या निरोपाची वेळ आता जवळ आली आहे. आणखी पाच दिवसांनंतर म्हणजेच १९ सप्टेंबरपासून मान्सून माघारी परतायला सुरुवात होईल, असा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. यंदाच्या वर्षी देशावर वरुणराजाने चांगलीच कृपा केली. महाराष्ट्रासह देशभरात चांगला पाऊस झाला. एरव्ही कोरडाठाक होणारा मराठवाडा भिजून चिंब झाला. राज्यातील बहुतांश धरणे शंभर टक्के भरली. देशात सरासरी ७७२.५ मि.मी. पर्जन्यमान असते. यावर्षी १ जूनला मान्सून दाखल झाल्यापासून आतापर्यंत ८३६.७ मि.मी. पाऊस झाला आहे. म्हणजेच आठ टक्क्यांनी हे प्रमाण जास्त आहे. धो-धो बरसलेला मान्सून १९ ते २५ सप्टेंबर या कालावधीत परतीचा प्रवास सुरू करण्याची शक्यता आहे, अशी माहिती हवामान विभागाने दिली आहे. सर्वसाधारणपणे मान्सून १ जूनला केरळमध्ये पोहोचतो आणि ८ जुलैपर्यंत देशभरात पोहोचतो.

# प्रशासकीय राजवटीत ‘आदर्श’ हरवला

## गेल्या तीन वर्षांपासून शिक्षक पुरस्कार रखडले

| आविष्कार देसाई |
| रायगड |

**पुरस्कार छोटा असो वा मोठा ते नेहमीच प्रेरणा देणारे असतात. परंतु, ते वेळेत जाहीर होऊन त्याचे वितरण झाले, तर त्या पुरस्कारांना महत्त्व प्राप्त होते. गंभीर बाब म्हणजे, रायगड जिल्हा परिषदेवर २१ मार्च २०२२ सालापासून प्रशासकीय राजवट सुरु आहे. त्यानुसार तब्बल तीन वर्षांपासून आदर्श शिक्षकांचे पुरस्कार रखडले आहेत. रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाने आदर्श शिक्षक पुरस्कारांची सलग तीन वर्षांची यादी वेळोवेळी जाहीर केली आहे. मात्र, माध्यमिक विभागाची यादी अद्याप अंतिम झाली नसून, पुरस्कार वितरणही झालेले नाही. त्यामुळे शिक्षकांमध्ये नाराजीचा सूर आहे.**

समाजाला आदर्श वाटावा असे काम करणाऱ्या शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरवण्यात येते. पुरस्कारांमुळे संबंधितांना काम करण्याची नवी ऊर्जा प्राप्त होते, तर इतरांसाठी प्रेरणादायी असते. म्हणून सरकारने पुरस्कार देण्याची प्रथा सुरु केली आहे. रायगड जिल्ह्यातील १५ तालुक्यांतील प्रत्येकी एका प्राथमिक आणि माध्यामिक शिक्षण विभागातील शिक्षकाची निवड करण्यात येते. तसेच विशेष दिव्यांग पुरस्कारासाठी एका अशा एकूण १६ शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार देण्यात येतो.

प्राथमिक शिक्षण विभागाची यादी दरवर्षी जाहीर करण्यात आलेली आहे. परंतु, माध्यमिक शिक्षण विभागाची यादी गेल्या तीन वर्षांत रायगड जिल्हा परिषदेने अंतिम केलेली नसल्याची माहिती समोर आली आहे. यंदा २०२४ यावर्षीदेखील अशीच परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे माध्यमिक विभागातील कोणत्या शिक्षकांना हा मानाचा पुरस्कार मिळणार आहे, हे अद्याप गुलदस्त्यातच आहे. ५ सप्टेंबर हा दिवस शिक्षक दिन म्हणून साजरा करण्यात येतो. गेली दोन वर्षे कोरोनाचा कहर असल्याने शिक्षकांना पुरस्कार देण्याचा मोठा सोहळा पार पडला नव्हता. माध्यमिक शिक्षकांना पुरस्कार देण्याची अंतिम यादी अद्याप अंतिम झालेली नाही. दरम्यान, शिक्षणाधिकारी महारुद्र नाले यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही.



### पुरस्कार वितरणास मुहूर्त कधी?

जिल्हा परिषदेच्यावतीने दिल्या जाणाऱ्या आदर्श शिक्षक पुरस्कारांमधील २०२२-२३, २०२३-२४ आणि २०२४-२५ या तीन वर्षांच्या पुरस्कारांना आजही मुहूर्त मिळालेला नाही. जिल्हा परिषदेचे तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिकारी किरण पाटील, त्यानंतर भरत बास्टेवाड यांच्या काळात या पुरस्कारांचे सोपस्कार पूर्ण करुन ठेवण्यात आले आहेत. याआधी प्राथमिक शिक्षकांच्या आदर्श पुरस्कारांची घोषणा करण्यात आलेली आहे, तर माध्यमिक शिक्षकांना अपेक्षा होती की त्यांच्याही नावांची घोषणा होईल. मात्र, त्यांची निराशा झाली आहे. आता पुरस्कार वितरण एकाच वर्षाचे होणार की वितरणापूर्वी मागील पुरस्कारांची घोषणा करून एकाचवेळी तिन्ही वर्षांचे पुरस्कार वितरण होणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### आचारसंहितेची भीती

काहीच दिवसांनी विधानसभा निवडणुकीची घोषणा होण्याची शक्यता आहे. निवडणूक आयोगाने निवडणुका जाहीर केल्यास तिन्ही वर्षांचे पुरस्कार हे आचारसंहितेच्या कचाट्यात सापडण्याची शक्यता असल्याची चर्चा शिक्षकांचा वर्तुळात सुरु आहे. प्रशासनाने लवकरच कार्यक्रम घेऊन रखडलेल्या पुरस्कारांचे तातडीने वितरण करावे, अशी मागणी शिक्षकांमधून केली जात आहे.

> गेल्या तीन वर्षांपासून आदर्श शिक्षक पुरस्कारांचे वितरण करण्यात आलेले नाही. त्यामुळे ही संकल्पना पुसली गेली आहे का, असा सवाल त्यानिमित्ताने उपस्थित होता. आदर्श पुरस्कार प्राप्त शिक्षकांना आगाऊ वेतन श्रेणी लागू करु नये, असा शासन निर्णय ग्रामविकास विभागाने ४ सप्टेंबर २०१८ रोजी काढला आहे. याविरोधात विविध शिक्षक संघटना न्यायालयीन लढाई लढत आहेत. २०२२ पासून जिल्हा परिषदेवर प्रशासक आहे. त्यामुळे अन्य विकासाचे महत्त्वपूर्ण निर्णय घेतले जातात, तसेच आदर्श शिक्षक पुरस्कारांचे वितरण करणे गरजेचे आहे.
>
> – संदीप वारगे, उपाध्यक्ष, जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षक संघटना, महाराष्ट्र राज्य

# आक्षी, साखर गावाला उधाणाचा धोका

## धूप प्रतिबंधक बंधाऱ्याच्या मागणीकडे प्रशासनाचे दुर्लक्ष

| अलिबाग | प्रतिनिधी |

पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठिकाण असलेल्या आक्षी, साखर गावाला उधाणाचा धोका निर्माण झाला आहे. गावांमधील तीन हजारांहून अधिक नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. धूप प्रतिबंधक बंधारा बांधण्यात यावा, अशी मागणी वारंवार करूनदेखील प्रशासनाकडून त्याची दखल घेतली जात नसल्याचा आरोप आक्षीचे उपसरपंच आनंद बुरांडे यांनी केला आहे.

आक्षी हे गाव पर्यटनाच्या दृष्टी महत्त्वाचे असले, तरीही एक ऐतिहासिक भूमी म्हणूनदेखील आक्षीकडे पाहिले जाते. रायगड जिल्ह्यातील आक्षी गावात मराठी भाषेतील सर्वांच प्राचीन शिलालेख सापडला आहे. आक्षीला सुंदर असा समुद्रकिनारा लाभला आहे. अलिबागबरोबरच आक्षीतील पर्यटनाला पर्यटक अधिक पसंती देतात. त्यामुळे आक्षीमध्ये दर आठवड्याला साधारणतः पाचशेहून अधिक पर्यटक भेट देत असल्याची माहिती समोर येत आहे. वर्षाला दोन लाखांहून अधिक पर्यटक आक्षीमध्ये येतात. आक्षी गावासह साखर, रायवाडी परिसरात तीन हजारांहून अधिक नागरिक समुद्रकिनारी राहतात. मासेमारीबरोबरच इतर व्यवसाय करून ही मंडळी त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवित आहेत. परंतु, याच नागरिकांच्या सुरक्षेबाबत प्रशासन उदासीन असल्याचे दिसून येत आहे. उधाणाच्या काळात आक्षीसह साखर व रायवाडी किनाऱ्यांना

•> पान २ वर

> आक्षी, साखर, रायवाडीपर्यंत मोठ्या प्रमाणात जमिनीची धूप झाली आहे. उधाणाचे पाणी पावसाळ्यात गावात शिरण्याची भीती कायमच राहिली आहे. गावांच्या सुरक्षेसाठी जिल्हा प्रशासनाकडे धूप प्रतिबंधक बंधारा बांधण्याची मागणी गेल्या चार वर्षांपासून करीत आहोत. परंतु, अजूनपर्यंत त्याची दखल घेतली नाही. गावांच्या सुरक्षेच्या प्रश्न निर्माण झाला आहे. याबाबत प्रशासनाने दखल घ्यावी.
>
> – आनंद बुरांडे, उपसरपंच, आक्षी

> आक्षी, साखर येथील किनाऱ्यावरील होणारी धूप रोखण्यासाठी ग्रामपंचायतीकडून पत्र प्राप्त झाले आहे. किनाऱ्यावरील धूप प्रतिबंधक बंधारे उभारण्याची जबाबदारी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाची आहे. त्यानुसार संबंधित विभागाला मागणी पत्र पाठविण्यात आले असून, कार्यवाही करण्याची सूचनाही केली आहे.
>
> – संदेश शिर्के, निवासी उपजिल्हाधिकारी



# शाळांमध्ये मराठी सक्तीची

## राज्य सरकारचे शाळांना निर्देश

| मुंबई | प्रतिनिधी |

मराठी विषय खासगी तसेच सरकारी शाळेत सक्तीचा करण्यात आला आहे. राज्य शासनाचे यासंदर्भातील निर्देश दिले आहेत. मराठी विषयासाठी श्रेणी नाही तर थेट गुणांकन करा, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे शासनाचे मराठी भाषा सक्तीकडे पाऊल टाकल्याचं म्हणता येईल. याबाबतचा शासन निर्णय जाहीर करण्यात आला आहे.

२०२५-२६ या शैक्षणिक वर्षापासून सर्व माध्यमातील शाळांमध्ये मराठी विषयाची परीक्षा घ्यावीच लागणार आहे. या परीक्षेत मराठी विषयाला श्रेणी देऊन मूल्यांकन न करता मार्क्स देऊन मूल्यांकन केलं जाणार आहे. इतर माध्यमातील शाळांमध्ये मराठी भाषा विषय गांभिर्याने शिकवला जात नसल्याचे निदर्शनास आल्यानंतर राज्य सरकारकडून ही नवी नियमावली जाहीर करण्यात आली आहे. २०२५-२६ या शैक्षणिक वर्षापासून या नव्या पद्धतीची अंमलबजावणी होणार आहे.





शासन निर्णयात म्हणण्यात आलंय की, कोविड-१९ संसर्गाच्या पार्श्वभूमीवर ताळेबंदीच्या कालावधीत शाळा नियमित नसल्याने राज्य मंडळाच्या शाळा वगळून इतर परीक्षा मंडळाच्या शाळांमध्ये सन २०२२-२३ च्या आठवीची बॅच २०२३-२४ ला नववीमध्ये व २०२४-२५ ला दहावीला जाईल त्यांना एकवेळची बाब म्हणून मराठी विषयाची परीक्षा गुणांकनाची न ठेवता श्रेणी स्वरूपात मूल्यांकन करण्याबाबत दि. १९ एप्रिल २०२३ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे सवलत दिली आहे. सदर सवलत ही केवळ एका बॅचपुरतीच

•> पान २ वर

# गणेशमूर्तींचे पुनर्विसर्जन

## श्रीसदस्यांनी जपली सामाजिक बांधिलकी

| आगरदांडा | प्रतिनिधी |

गौरी गणपती विसर्जन थाटामाटात मुरुड समुद्रकिनारी व मजगाव पंचक्रोशी भागातील मजगाव खाडीत गणेशभक्तांकडून करण्यात आले. परंतु, दुसऱ्या दिवशी मुरुड समुद्रकिनारी तीन व मजगाव खाडीत २२० गणपती पुन्हा जसजसेच्या तसे किनाऱ्यावर वाहून आल्याची बातमी मिळताच डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या ३० श्रीसदस्यांनी या ठिकाणी येऊन मूर्तीचे पुन्हा खोल समुद्रात नेऊन विसर्जन केले.



मुरुड तालुक्यात काही गणेशभक्त शाडूच्या मातीची मूर्ती न आणता प्लास्टर ऑफ पॅरिसच्या गणेशमूर्ती आणतात. परंतु, प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती लवकर विरघळत नसल्याने त्या मूर्ती पुन्हा किनाऱ्यावर वाहून येत असतात. या मूर्तीचे पुन्हा श्रीसदस्यांकडून विसर्जन केले जाते. त्याचबरोबर किनाराही स्वच्छ चकचकीत केला जातो. हे अनेक वर्षे काम नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान सदस्यांकडून केले जात आहे. परंतु, ही वेळ गणेशभक्तांनी का आणावी, याचा विचार प्रशासनाने केला पाहिजे.

प्रदूषण आणि

•> पान २ वर

## एसटीची दुचाकीला धडक, दोघे जखमी

| माणगाव | प्रतिनिधी |

एसटी बसची पाठीमागून दुचाकीला धडक लागून झालेल्या अपघातात दोन जण जखमी होऊन दोन्ही वाहनांचे नुकसान झाले. सदरील अपघात गुरुवार, दि. १२ सप्टेंबर रोजी सायंकाळी ४.३० वाजण्याच्या सुमारास माणगाव येथील हॉटेल कार्तिकजवळ मुंबई-गोवा महामार्गावर घडला. या अपघाताची फिर्याद मंदार शंकर भद्रिके (३०) रा. जोर, ता. माणगाव यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली.

या अपघाताबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, अपघाताच्या गुन्ह्यातील आरोपी एसटी बस चालक देविदास पुंडलिक चव्हाण (३४) रा.बस डेपो, खेड, जि.

•> पान २ वर

# विद्यार्थ्यांना जेवणातून विषबाधा

## गणेशोत्सवानिमित्त भंडाऱ्याचे आयोजन; ११३ विद्यार्थ्यांवर उपचार सुरु

| जळगाव | प्रतिनिधी |

जळगावाच्या पारोळा तालुक्यातील शिवरे दिगर येथे सारंग माध्यमिक विद्यालयात गणपती विसर्जनानिमित्त भंडाऱ्याचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता. या भंडाऱ्यात शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी जेवण केले. मात्र, या जेवणातून तब्बल ११३ विद्यार्थ्यांना विषबाधा झाली आहे. या विद्यार्थ्यांना तामसवाडी प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले असून, त्यांच्यावर उपचार सुरु आहेत.

जळगावातील सारंग माध्यमिक विद्यालयात गणपती विसर्जनानिमित्त आयोजित केलेल्या भंडाऱ्यातून अनेक विद्यार्थ्यांना विषबाधा झाली आहे. या भंडाऱ्यात वरण-भात, गुलाब जामुन, भाजी असे जेवण होते. यावेळी



शिक्षक आणि विद्यार्थी मिळून हे जेवण जेवले. हे जेवण जेवल्यानंतर काही विद्यार्थी-विद्यार्थिनींना उलट्या, चक्कर, मळमळ होणे, हातपाय गळणे इत्यादी त्रास होऊ लागला. यानंतर त्यांना तामसवाडी येथून पारोळा या ठिकाणी उपचारासाठी पाठवण्यात आले. साधारण ५ वाजल्यापासून रात्री ९ वाजेपर्यंत या विद्यार्थ्यांवर उपचार सुरू होते. त्यानंतर केलेल्या तपासणीदरम्यान विद्यार्थ्यांना अन्नातून विषबाधा झाल्याची माहिती समोर आली. जेवणानंतरच विद्यार्थ्यांना विषबाधा झाल्याची माहिती समोर येताच जळगावातील नागरिकांना धक्का बसला आहे. विषबाधा झालेल्या १२ ते १५ वयोगटातील एकूण ७० विद्यार्थी व चार शिक्षकांचाही समावेश आहे.

सध्या पारोळा कुटीर रुग्णालयात विद्यार्थ्यांवर उपचार सुरू आहेत. तर दोन विद्यार्थिनींना उपचारासाठी धुळ्यात हलविण्यात आले आहे. या घटनेनंतर आ. चिमणराव पाटील, माजी मंत्री डॉ. सतीश पाटील, डॉ. हर्षल माने, डॉ. संभाजी पाटील यांनीही रुग्णालयात धाव घेत विद्यार्थ्यांची विचारपूस केली. यावेळी आ. पाटील यांनी जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांच्याशी संपर्क साधून रुग्णालयात डॉक्टर तसेच स्टाफ, वॉर्डची वाढ करावी, अशीही मागणी केली.

## दुचाकींची धडक, चौघे जखमी

| माणगाव | प्रतिनिधी |

दोन दुचाकींमध्ये धडक लागून झालेल्या अपघातात चार जण जखमी होऊन दोन्ही वाहनांचे नुकसान झाले. हा अपघात गुरुवार, दि. १२ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५.३० वाजण्याच्या सुमारास माणगावजवळील ढाळघर गावच्या हद्दीत महामार्गावर घडला. या अपघाताची फिर्याद स्नेहल चंद्रकांत दळवी (२४) रा. बोरिवली-मुंबई यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली.

या अपघाताबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, अपघाताच्या गुन्ह्यातील आरोपी आकाश शशिकांत गुगले (२६) रा. निळगुण, ता. माणगाव व त्यांच्या पाठीमागे बसलेला त्यांचा सहकारी असे

•> पान २ वर

## उत्सवाला चांगले वळण अन् चुकीच्या गोष्टींवर बंदी

# गणेशोत्सव मंडळांचे चलचित्रातून समाजप्रबोधन

| प्रमोद जाधव |
| अलिबाग |

गणेशोत्सव हा आता केवळ धार्मिक उत्सव राहिला नाही, तर तो एक सांस्कृतिक उत्सव बनला आहे. या उत्सवाला चांगले वळण लावण्यासाठी व चुकीच्या गोष्टी बंद होण्यासाठी प्रभावी जनप्रबोधन रायगड जिल्ह्यातील अनेक गणेशोत्सव मंडळांकडून करण्यात येत आहे. बेटी बचाव बेटी पढाव, झाडे लावा झाडे जगवा, प्लास्टिक मुक्ती, पाणी वाचवा अशा अनेक प्रकारचे देखावे, चलचित्रातून दाखवून जनजानगृती केली जात आहे. या चलचित्रांच्या माध्यमातून समाजप्रबोधनाचे काम होत असल्याचे चित्र दिसून येत आहे.



दरम्यान, या मंडळांचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात येत आहे.

कोकणासह रायगड जिल्ह्यात गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करतात. मुंबई, पुणेला नोकरीनिमित्त असलेले चाकरमानी सुट्टी काढून गावी येतात. आबालवृध्दांपासून सर्वच जण एकत्र येऊन हा सण आनंदमय व मंगलमय वातावरणात साजरा करतात. जिल्ह्यामध्ये घरगुती गणेशोत्सवाबरोबरच सार्वजनिक गणेशोत्सवमंडळाचीक्रेझदिवसेंदिवस वाढत आहे. ग्रामीण भागासह शहरी भागातील काही मंडळी एकत्र येऊन सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ निर्माण करून त्यांच्यामार्फत गणरायाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करतात. ही परंपरा आजही रायगड जिल्ह्यात जपली आहे.

जिल्ह्यात यावर्षी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांमार्फत २७३ गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना करण्यात आली. जिल्ह्यात अनंत चतुर्दशीपर्यंत ११४ गणेशमूर्तींचा समावेश आहे. मंडळांमार्फत कापडी पिशवी वाटप करून प्लास्टिकमुक्तीचा संदेश देण्याचे काम केले जात आहे. महिला,

•> पान २ वर

### आदर्श गणेशोत्सव मंडळाचा सामाजिक संदेश

सध्या संपूर्ण जगात पेटून उठलेला विषय म्हणजे महिलांवरील होणाऱ्या अत्याचाराबाबत मुलींनी, महिलांनी स्वतःचे रक्षण करण्यासाठी कोणती काळजी घ्यावी, याबाबतचा महत्त्व पटवून देणारा संदेश अलिबागमधील आदर्श गणेशोत्सव मंडळाने दिला आहे. समाजाला बोध घेता येईल असे सामाजिक संदेश देणारे चलचित्र देखाव्यातून समाजापुढे एक आदर्श निर्माण केला आहे. हा देखावा पाहण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी होत आहे.



# महामार्गावर मोकाट गुरांचे बस्तान

## मालकांचा निष्काळजीपणा ठरतोय प्रवाशांच्या जीवाशी खेळ

**। धाटाव । वार्ताहर ।**

**मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग ६६ वरील कोलाड, खांब, सुकेळी खिंड विशेषतः वाकणच्या पुलावर रस्त्यात गुरे उभी अथवा बस्तान मांडून बसलेली असतात. त्यामुळे वाहनचालकांसह प्रवाशांच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे. या महामार्गावर मोठ्या प्रमाणात मोकाट गुरांचे प्रमाण वाढले असून, अपघातांच्या प्रमाणातही वाढ होताना दिसते. संबंधित गुरांच्या मालकांचा निष्काळजीपणा येथील प्रवासीवर्गाच्या जीवाशी अक्षरशः खेळ खेळत असल्याने प्रवासी, वाहनचालक, दुचाकीस्वार मात्र चांगलेच त्रस्त आहेत.**



रोहा तालुक्यातील मोठ्या प्रमाणातशेतकऱ्यांनीआपल्याजवळील शेतजमिनी मुंबई, पुणे, दिल्लीकडील धनिकांना विकल्या असून, गेली दहा ते बारा वर्षांपासून जमिनी विकण्याचा व्यवसाय जोमाने सुरु आहे. जमिनीच्या पैशांमुळे जनावरांकडे दुर्लक्ष होत असून, आपल्याकडील शेती, जमीन विकलेल्या शेतकऱ्यांनी गुरांना मात्र वाऱ्यावर (मोकाटच) सोडले आहे. जमिनी घेतलेल्या मालकांनी चहूबाजूने कंपाऊंड करून घेतल्यामुळे गुरांना वेळेवर खाण्यासाठी चारा आणि चरण्यासाठी जागाच उरली नसल्यामुळे ही गुरे मुंबई-गोवा महामार्गावरील रस्त्याच्या मधोमध बस्तान मांडून बसत आहेत, तर रस्त्यालगत असलेल्या हॉटेलच्या बाजूला फिरत असताना दिसत आहेत. यामुळे वाहतुकीसाठी अडथळा निर्माण होत आहे, तर वाहतूक कोंडी निर्माण होऊन अंधारात ही गुरे झटकन लक्षात न आल्याने अपघात होत आहेत.

गुरांना अपघात झाल्यास गुरे जखमी झाल्यानंतर त्यांच्या मालकांना जाग येते. नंतर अपघात झालेल्या वाहन चालकाकडून मग जबरदस्तीने भरपाई मागण्याचे प्रकार घडत आहेत.रस्त्यावर बसलेल्या गुरांमुळे अपघातग्रस्त एखादा प्रवासी जखमी झाला तर गुरांचे मालक मात्र हेतुपुरस्सर कानाडोळा करताना दिसतात. दरम्यान, रस्त्यावरील मोकाट गुरे चोरण्याच्या असंख्य घटना ताज्या असताना हीच मोकाट गुरे मालकांनी चोरट्यांना आंदण तर दिली नाहीत ना, असाही प्रश्न समोर येत आहे.

दरम्यान, रस्त्यावर जागोजागी बस्तान मांडून बसलेल्या मोकाट गुरांचा बंदोबस्त संबंधित प्रशासनाकडून करण्यात यावा, अशी मागणी प्रवासीवर्गातून केली जात आहे. मात्र, याकडे संबंधितांनी लक्ष देण्याची गरजही निर्माण झाली आहे.

> **“ या रस्त्यावरून नेहमी आम्ही टेम्पो, ट्रक, कंटेनर अशी वाहने चालवत असतो. रस्त्यात बसलेली गुरे वाहने हॉर्न वाजवूनसुद्धा उठत नाहीत, त्यामुळे वाहतूक कोंडी निर्माण होते. हा महामार्ग आहे की गुरांच्या आंदोलनाचा महामार्ग, असा प्रश्न पडतो.**
> **- प्रतिक करंजे, वाहन चालक (रोहा) ”**

> **“ मुंबई-गोवा महामार्गावर वाकणपासून कोलाडपर्यंत मोकाट गुरांचे कळप रस्त्यावर वाट अडवून बसलेले असतात. याठिकाणी रस्त्यावरून प्रवास करताना गुरांचा प्रचंड त्रास होत आहे. गुरांच्या मालकांनी आपापल्या गुरांची काळजी घेऊन रस्त्यावर सोडू नये, तर संबंधितांनी याकडे लक्ष द्यायला हवे.**
> **- गणेश म्हस्के, प्रवासी (कोलाड) ”**

## पोलिसांनी साधला जनतेशी संवाद

**पनवेल :** गणेश विसर्जनाच्या माध्यमातून गणेश भक्तांशी संवाद साधण्याचे व त्याद्वारे जास्तीत जास्त नागरिकांनी व्हॉट्सअप ग्रुपमध्ये सामील होण्याचे आवाहन व मार्गदर्शन पनवेल शहर पोलिसांच्या माध्यमातून करण्यात आल्याने त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. पनवेल शहरात व परिसरात असलेल्या विविध विसर्जन स्थळी मोठ्या प्रमाणात गणेशभक्त सहकुटुंब बाप्पाला निरोप देण्यासाठी येत असतात. येणाऱ्या भाविकांमध्ये जनजागृती करावी, या उद्देशाने वपोनि नितीन ठाकरे यांनी शहरातील सर्वच विसर्जन ठिकाणी जनजागृती बॅनर लावले आहेत. त्याचप्रमाणे सर्व सार्वजनिक मंडळांच्या परिसरात अशा प्रकारे पोलीस व्हॉट्सॲप ग्रुपमध्ये सामील होण्याचे आवाहन करणारे बॅनर लावण्यात आले आहेत. एवढे करून न थांबता त्यांच्या मार्गदर्शनाखाली प्रवीण भगत यांनी गणेशभक्तांना नवी मुंबई पोलीस आयुक्तालयामार्फत सुरू करण्यात आलेल्या व्हॉट्सॲप ग्रुपची माहिती देण्यात आली.

# गणपती दर्शनानिमित्त पुढाऱ्यांचे दौरे

### कार्यकर्त्यांच्या भेटीगाठीने प्रचाराचा प्रारंभ

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण मतदारसंघात गणेशोत्सवादरम्यान गणपती दर्शनानिमित्त राजकीय पुढाऱ्यांचे दौरे आणि उद्‌घाटनाचे कार्यक्रम पाहता नोव्हेंबर महिन्यात विधानसभा निवडणूक होणार असल्याचे निश्चित आहे. त्यामुळे सणाच्या काळात जमा होणाऱ्या शेकडो नागरिकांपर्यंत आपला प्रचार करता यावा यासाठी इच्छुकांनी गणेशोत्सवानिमित्त गणपती दर्शन घेऊन प्रचाराला सुरुवात केली आहे. यामध्ये सार्वजनिक मंडळांना जाहिराती देऊन त्याच्या कमानी शहरात उभारण्यात आल्या आहेत. तर, काहींनी उत्सव काळात म्हटल्या जाणाऱ्या आरतीच्या पुस्तकांचे वाटप केले आहे.


विधानसभा निवडणुकीची जोरदार तयारी सुरू झाली आहे. २० नोव्हेंबर २०२४ पर्यंत विधानसभेची मुदत असल्याने विविध पक्ष व आघाड्या आपापल्या प्रचाराला लागल्या आहेत. अनेकांचे राज्य दौरेही सुरू आहेत. राज्यात प्रामुख्याने सत्ताधारी महायुती व महाविकास आघाडी अशी लढत होणार आहे. मात्र, या दोन्ही युती आणि आघाडीतील घटक पक्षातील अनेक इच्छुकांनी यावेळी आपल्यालाच उमेदवारी मिळावी यासाठी अनेक महिन्यांपासून तयारी सुरू केली आहे. मात्र, सध्या गणेशोत्सव सुरू असल्याने याची संधी घेण्यासाठी इच्छुक उमेदवार सरसावल्याचे चित्र आहे. आदर्श आचारसंहिता लागू झाल्यानंतर सार्वजनिक ठिकाणी फलक झळकावता येणार नसल्याने गणेशोत्सवाची संधी घेत विविध राजकीय पक्षांच्या इच्छुकांनी मंडळाच्या मंडपात कमानी उभारल्या आहेत. त्याचबरोबर शहर आणि परिसरातील मुख्य नाके, रस्ते आणि सार्वजनिक ठिकाणीही फलक लावून विद्रुपीकरण केले आहे.

# पर्यावरण संवर्धन संदेश देणारा बाप्पा

**। पेण । प्रतिनिधी ।**

पर्यावरणाचे रक्षण आणि संवर्धन ही काळाची गरज आहे. पेण तालुक्यातील जोहे येथील मूर्तीकार अभय म्हात्रे यांच्या निवासस्थानी पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा बाप्पा साकारला आहे. कलाधिपती श्रीगणेशाची आमराईतील झुल्यावर बसलेली ही आकर्षक बाळ रुपातील गणेशमूर्ती सोबतीला मयूर व अन्य पक्षी वनात निर्धास्तपणे विहार करताना दिसत आहेत.

हवा, पाणी, जमीन, जंगल सुरक्षित तर संजीव सुरक्षित. महाराष्ट्र राज्य गणेशमूर्ती संघटनेचे अध्यक्ष आणि कला ग्राम जोहेमधील मूर्तीकार अभय म्हात्रे हे गेले दशकभर मूर्तिकारांच्या समस्या सोडविण्यासाठी सतत प्रयत्नशील आहेत. कार्यशाळेत पाच, आठ, दहा, बारा फूट उंचीच्या मूर्ती साकारणारे म्हात्रे यांनी निसर्ग वाचवा हा पर्यावरणपूरक संदेश या संकल्पनेतून दिला आहे. गणपती बाप्पा वनात झाडाला बांधलेल्या हिंदोळ्यावर मस्त विराजमान होऊन सोबत मोर, अन्य पक्षी व झरे वाहतात. अशा पद्धतीने प्रदूषणमुक्त परिसर आणि पर्यावरण संवर्धन करणे, हा संदेश या बालगणेशाच्या साक्षीने दिला आहे. सदरचा देखावा पाहण्यासाठी परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने गर्दी करत आहेत.



# मुलुंडमधील नवसाच्या गणपतीचा शतक महोत्सव

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

एकेकाळी थर्माकॉल सीटवर बारीक नक्षीकाम करून गणपतीची सजावट करणाऱ्या म्हात्रे बंधू यांची विलेपार्ल्यात नव्हे तर महाराष्ट्र आणि गुजरात राज्यातही त्यांची ख्याती असायची. त्यांची कोरीव, सूक्ष्म नक्षीकाम केलेली सजावट पाहण्यासाठी गणेशभक्तांची वर्दळ सुरू असे. सन १९२४ साली त्यांचे आजोबा म्हणजेच पांडुरंग गणेश म्हात्रे यांना अर्धांगवायूचा झटका आला होता. त्यावेळी त्यांनी श्रीगणेशजींना साकडे घालून नवस केला होता की, माझ्या अर्धांग वायुचा आजार तू जर बरा केलास तर मी तुझी सेवा अखंड चालू ठेवीन आणि त्याचा आजार बरा झाला. तेव्हापासून म्हात्रे घराण्यात गणेशोत्सव सुरू झाला. प्रारंभाच्या काळात चुन्याचे रंग वापरून पडद्यावर रंगछटा होत असे.

सन १९७१ ते १९७३ या कालावधीत पॅकिंगसाठी लागणारा थर्माकॉल पेपर आणून त्यावर नक्षीकाम करून सजावट करण्यात येत होती. मात्र १९७४ मध्ये थर्माकॉलच्या सहाय्याने केलेला एक सुंदर रथ गणेश भक्तांचे लक्ष वेधून गेला. त्यासाठी तत्कालीन मंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी म्हात्रे बंधुच्या गणेश दर्शनाप्रित्यर्थ भेट दिली होती. शिंदेसाहेबांना सजावट व मुर्ती इतकी आवडली की त्यांनी १९७५ सालापासून म्हात्रे बंधुंना त्यांच्या घरच्या गणपती सजावट करण्यास सांगितले. गानकोकीळा लता मंगेशकर यांच्या घरीही दोन वर्ष म्हात्रे बंधुंना सजावट करण्याचे भाग्य लाभले आहेत.



आपल्या चित्ताकर्षक सजावटींसाठी पार्लेकरांच्या कौतुकाचा विषय असलेल्या म्हात्रे कुटुंबाच्या या गणपतीची दखल अनेक मोठमोठ्या दिग्दजांनी घेतली आहे. कलेचा वारसा लाभलेला म्हात्रे कुटुंबातील यंदाची पाचवी पिढीही तेवढ्याच जोमाने जोपासत आहे. यंदा त्यांनी अयोध्येतील श्रीराम मंदिराच्या गाभाऱ्यांनी प्रतिकृती उभारली आहे.आम्ही सर्व भाऊ गणपतीच्या दहा-बारा दिवसांपासूनच सजावटीला लागायचो.

किशोर आणि चंद्रकात हे दोघे माझे भाऊ. सगळ्यात धाकटा किशोर यांच्या संकल्पनेतून आम्ही विविध देखावे किंवा सजावट करायचो, असे नरेंद्र म्हात्रे यांनी यावेळी आमच्या प्रतिनिधीला सांगितले. कलेचे कोणतेही अधिकृत शिक्षण न घेताही हे सर्वच बंधू भन्नाट कलाकुसर केलेले देखावे तयार करतात.

२००७ मध्ये पार्ल्यातील ती टुमदार दुमजली इमारत तोडली आणि म्हात्रे कुटुंबीय इतस्ततः विखुरले. गणपती नरेंद्र म्हात्रे यांच्यासह मुलुंडमध्ये ११०१, सेलेस्टिया बिल्डींग, मराठा मंदिर हॉलजवळ, ९० फूट रोड, मुलुंड (पूर्व), मुंबई येथे आला. तेव्हापासून नरेंद्र म्हात्रे यांचे बंधू, भगिनी, त्यांची मुले, नातवंडे असे सगळे एकत्र येऊन मुलुंडला हा गणपती साजरा करतात.

यंदा शतक महोत्सवानिमित्त कुटुंबातील १५ जणांनी मिळून अयोध्येतील श्रीराम मंदिरातील गाभाऱ्याचा देखावा उभारला आहे. किशोर, चंद्रकांत, तन्मय, अरूण अनिश, पियुष, रिद्धी, कोमल, कुणाल, निहित, भुषण, गौरी, विभावरी, रश्मीन, प्रणव, गरीमा अशा म्हात्रे कुटुंबातील सदस्यांचे हात सजावटीला लागले आहेत. त्याशिवाय नरेंद्र म्हात्रे यांचा धाकटा मुलगा पीयुष दरवर्षी श्री गणेशाची मूर्ती विविध खड्यांनी सजवतो. यंदाही त्याने मूर्तीवरील मुकूट विविध खड्यांनी साकारला आहे.

## लोखंडी सळईने मारहाण

**नवीन पनवेल :** भांडण सोडवण्यासाठी गेलेल्या २७ वर्षीय तरुणाला लोखंडी सळईने मारहाण केल्याप्रकरणी सुरज कांबळे आणि दत्ता कांबळे यांच्या विरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

सचिन खंडागळे हा आकुर्ली ग्रामपंचायत जवळ राहत असून ११ सप्टेंबर रोजी तो रिक्षाने मित्र अंकुश व संजय हे गणपतीचे दर्शन घेण्यासाठी सेक्टर १७, नवीन पनवेल येथील सागर कांबळे यांच्या घरी गेले होते. त्यावेळी सागरचा भाऊ सुरज आणि वडील दत्ता कांबळे यांचे एका व्यक्तीसोबत वाद सुरू होते. सचिन त्यांचे भांडण सोडवण्यास गेला असता सुरजने डोक्यात लोखंडी सळीने मारून दुखापत केली. त्यावेळी अंकुश आणि संजय हे त्यांना पकडण्यासाठी आले असता दत्ता कांबळे यांनी दोन्ही मित्रांना लाथाबुक्याने मारहाण केली. त्यानंतर जखमी दोघांना अष्टविनायक हॉस्पिटल, खांदा कॉलनी येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले.

## मारहाण करुन लुटले

**। नवीन पनवेल । वार्ताहर ।**

मोटारसायकलची कारला ठोकर लागल्याने कारमधील तीन ते चार इसम खाली उतरले आणि मोटर सायकल चालकाला मारहाण केली. त्यानंतर त्याच्याकडून ९२ हजार रुपये आणि मोबाईल घेऊन ते वैद्यकीय मदत न करता पळून गेले. याप्रकरणी कारचालक आणि मारहाण केलेल्या इसमाविरोधात तळोजा पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला.

मोहम्मद मुनोवर नूर मोहम्मद सय्यद हा घोटगाव येथे राहात असून तो कुत्र्यांना जेवण वाटप करत येत असताना तळोजा हायवे रोड धानसर ठाकूरपाडा येथे आला असता पेट्रोल पंपासमोर सफेद रंगाच्या कारला मोटारसायकलची ठोकर लागली. त्यामुळे तो खाली पडला. यावेळी कारमधून तीन ते चार इसम खाली उतरले व दमदाटी करून कारचे नुकसान झाले आहे असे बोलून भरपाई दे असे बोलले. आणि त्याच्याकडून ९२ हजार रुपये आणि ओप्पो कंपनीचा मोबाईल घेतला. त्यावेळी त्यांना पोलिसांकडे चला असे सांगितले असता ते कारमधून निघून गेले. यावेळी जखमी मोहम्मद मुनोवर याला वैद्यकीय मदत न करता ते निघून गेले. याप्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

पान १ वरुन

## शाळांमध्ये मराठी सक्तीची

मर्यादित होती. सवलत देण्यात आलेल्या इतर परीक्षा मंडळाच्या शाळांमधील शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील आठवीची बॅच आता शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये इयत्ता दहावीमध्ये गेलेली आहे. श्रेणी स्वरूपात मूल्यांकनाची सवलत ही या बॅचपुरतीच मर्यादित असल्याचे व सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षापासून संपुष्टात येत असल्याचे या शासन परिपत्रकान्वये स्पष्ट करण्यात येत आहे. इतर कोणत्याही बॅचसाठी ही सवलत लागू असणार नाही. सदर सवलत दिली असली तरीही राज्यातील सर्व माध्यमांच्या शासकीय व खासगी व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये मराठी भाषेचे अध्यापन व अध्ययन सक्तीचे आहे. तसेच इयत्ता ११ वी व १२ वी करितादेखील मराठी भाषेचे अध्यापन व अध्ययन सक्तीचे करण्यात आले आहे.

## आक्षी, साखर गावाला उधाणाचा धोका

मोठ्या प्रमाणात लाटांचा मारा बसत आहे. परिणामी, येथील किनाऱ्याची धूप होऊ लागली आहे. भविष्यात किनाऱ्यावरील गावांना त्या उधाणाचा धोक निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. धूप प्रतिबंधक बंधारा उभारण्यासाठी शासनाकडे गेल्या चार वर्षांपासून मागणी केली जात आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात या मागणीचा प्रस्ताव धूळ खात आहे. परंतु, त्याची दखल प्रशासनाकडून घेतली जात नसल्याने नाराजी व्यक्त केली जात आहे.

आक्षीला सुंदर असा समुद्रकिनारा लाभला आहे. मोठ्या प्रमाणात पर्यटक किनारी येतात. साखर, आक्षी, रायवाडी ही किनाऱ्यालगत गावे आहेत. सतत उधाणाबरोबरच लाटांच्या माऱ्यामुळे किनाऱ्याची धूप होऊ लागली आहे. प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, असे सरपंच रश्मी पाटील यांनी सांगितले.

## गणेशमूर्तींचे पुनर्विसर्जन

पर्यावरणाचा ऱ्हास टाळण्यासाठी प्रत्येकाने शाडूच्या मातीची मूर्ती आणून गणेशोत्सव साजरा करावा, याची जाणीव प्रत्येकाला असूनही याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचे चित्र आजही दिसून येत आहे. प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती विसर्जनामुळे मोठ्या प्रमाणात जलप्रदूषण होऊन मानवी आरोग्याला धोका पोहोचत आहे. पर्यावरणाचे महत्त्व लक्षात घेऊन पर्यावरणपूरक व प्रदूषणमुक्त गणेशोत्सव साजरा करणे काळाची गरज बनली आहे. परंतु, पर्यावरणपूरक गणेशोत्सवाच्या जनजागृतीसाठी प्रशासनाची अनास्था दिसून येत आहे.

## एसटीची दुचाकीला धडक, दोघे जखमी

रत्नागिरी यांनी त्यांच्या ताब्यातील नालासोपारा ते खेड ही एसटी बस क्र.एम.एच.०८/ए.पी-५८२५ मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाने भरधाव वेगाने चालवीत घेऊन जात असताना पाठीमागून बुलेट मोटारसायकल क्र.एम.एच.४७/एम-२६१५ या गाडीला धडक दिल्याने अपघात घडला. या अपघातात दुचाकीवरील शंकर नामदेव भद्रिके (७०) व अंकुश शंकर भद्रिके (३०) दोन्ही रा.जोर ता.माणगाव हे दोघे जखमी होऊन दोन्ही वाहनांचे नुकसान झाले. या अपघाताची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात करण्यात येऊन एसटी बस चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या अपघाताच्या गुन्ह्याचा अधिक तपास पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार सानप हे करीत आहेत.

## दुचाकींची धडक, चौघे जखमी

त्यांच्या ताब्यातील मोटारसायकल ही मुंबई-गोवा महामार्गावरून भरधाव वेगाने चालवीत घेऊन जात असताना अपघात ठिकाणी आल्यावर स्कुटीला पाठीमागून धडक देऊन अपघात घडला. या अपघातात स्नेहल चंद्रकांत दळवी (२४) रा. बोरिवली मुंबई, साक्षी बबन शेलार (२२) रा. पाचोळे, ता. माणगाव, सागर लक्ष्मण झूमरे (२८) रा. जोर, ता. माणगाव, प्रकाश शशिकांत गुगले (२६) रा.निळगुण, ता. माणगाव हे चार जण जखमी होऊन दोन्ही वाहनांचे नुकसान झाले. या अपघाताची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. या अपघाताच्या गुन्ह्याचा अधिक तपास पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक काळे करीत आहेत.

## गणेशोत्सव मंडळांचे चलचित्रातून समाजप्रबोधन

तरुणींवरील अत्याचार रोखण्यासाठी बेटी बचाव, बेटी पढावसारखे उपक्रम राबवून महिलेचे महत्त्व पटवून देण्याचा प्रयत्न चलचित्रातून केला आहे. काही मंडळांनी जातीय सलोखादेखील राखण्याचे काम केले आहे. त्यामध्ये अलिबाग शहरातील जुन्या बाजारपेठमधील सन्मित्र गणेशोत्सव मंडळाचा समावेश आहे. कारण, या मंडळामध्ये सर्व जाती-धर्माची मंडळी एकत्र येऊन गणेशोत्सव साजरा करीत आहेत. जिल्ह्यात पाण्याच्या प्रश्नाबरोबरच पर्यावरणाचा समतोल बिघडण्याचा धोका निर्माण झाला आहे. पाणी जपून वापरा, झाडे लावा झाडे जगवा असा संदेश देत समाजप्रबोधनाचे काम अनेक मंडळांकडून करण्यात आले आहे. मंडळाकडून होत असलेल्या समाजप्रबोधनामुळे समाजात परिवर्तन घडविण्याचा प्रयत्न कायमच होत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

## मुरुडमध्ये पोलिसांचा रुट मार्च



**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

सण-उत्सवादरम्यान शहरात कुठलाही अनुचित प्रकार घडू नये, तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, नुकतीच गौरी गणपती विसर्जन मिरवणुकीवर झालेली दगडफेक असे प्रकार होऊ नये, पोलिसांचा धाक असावा यासाठी शहरातील रॅपिड ॲक्शन फोर्स पोलिसांचा रुट मार्च काढण्यात आला.

यावेळी अलिबाग विभागीय पोलीस अधिकारी विनित चौधरी, मुरुड पोलीस निरीक्षक उदय झावरे, पोलीस उपनिरीक्षक अविनाश ढाकरे, मकरंद पाटील, विक्रांत बांधणकर, प्रशांत लोहार,क्यूआरटी पथक, एसआरपीएफ प्लाटून, स्ट्रायकिंग फोर्स आदींसह पोलीस कर्मचारी सहभागी झाले होते.

यावेळी पोलीस ठाण्यांतर्गत मुरुड शहरातील भोगेश्वर पाखाडी, बाजारपेठ, दत्तवाडी, गणेश आळी, पेठ मोहल्ला, लक्ष्मीखार आदींसह संवेदनशील भागात रुट मार्च काढण्यात आला.

# सेवानिवृत्त कर्मचारी आर्थिक लाभापासून वंचित

**। तळा । वार्ताहर ।**

रायगड जिल्ह्यातील उपशिक्षक, मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी २०२१ पासून गटविम्यापासून वंचित आहेत. १८ जून २०२४ मध्ये झालेल्या पेन्शन अदालतमध्ये एका महिन्यात गट विमा, सातव्या वेतन आयोगातील राहिलेले हप्ते याची सोडवणूक करण्यात येईल, असे आश्वासन जिल्हा परिषदेतील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना दिले गेले होते. यापूर्वी काही कर्मचाऱ्यांचे सातव्या वेतन आयोगाचे दोन, तीन, चार हप्तेही मिळालेले नाहीत. पाचवा हप्ता सरसकट सर्वांना देय आहे. याची रक्कम शासनाने जिल्हा परिषदेकडे वर्ग केल्याचे समजते. मात्र, मागील जून महिन्यापासून महाराष्ट्र राज्य शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व सर्व अधिकारी ही संघटना पाठपुरावा करत आहे. शिक्षण अधिकारी यांच्या यासंदर्भात दोन सभा झाल्या. काही तारखा दिल्या. गेल्या आज रोजी गणपतीपूर्वी रक्कम मिळेल या अशेने सर्व कर्मचारी वाट पाहात होते. शिक्षण विभागातील संबंधित यंत्रणा वेगवेगळी कारणे सांगत आहेत. पंचायत समितीची माहिती वेळेत आली नाही, माहिती चुकली आहे? असे सांगून प्रत्येक वेळी वेगवेगळे कारणे देऊन वेळकाढूपणा चाललेला आहे. सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना जिल्हा परिषद वेळोवेळी केराची टोपली दाखवीत आहे.

याबाबत शिक्षण विभाग अर्थ विभागाकडे, तर अर्थ विभाग शिक्षण विभागाकडे बोट दाखवीत आहेत. वरील संघटना मुख्य कार्यकारी अधिकारी, आयुक्त, संचालक, यांच्या भेटी घेऊन वस्तुस्थिती मांडणार आहेत.



### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक हितेंद्र बलदेव दास सोमैया यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :- मौजे पळसवरी तालुका कर्जत, जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत

| भूमापन क्रं व उपविभाग/ सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ५५/२ | एकुण क्षेत्र ०-१५-०० हे आर पॉ या एकुण क्षेत्रापैकी मालक यांचा अर्धा अविभक्त हिश्याचे क्षेत्र ०-०७-५० हे आर पॉ एवढे क्षेत्र | ०-०९ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक १५/०९/२०२४ **ॲड. निलेश कान्हु मोरे** मोबा. ९८२२६९११०९
ऑफिस पत्ता- शॉप नं.२९, तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर,
अमराई रोड, कर्जत ता- कर्जत, जि. रायगड ४१०२०१

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे पालव, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक एन.के. कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमीटेड तर्फे संचालक व अधिकृत सहीकर्ता श्री. अंबालाल सेन्याभाई पटेल यांचेकडून घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे सविस्तर वर्णन खालीलप्रमाणे,

**:: मिळकतीचे वर्णन ::**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | जुना सर्व्हे नं. | क्षेत्र (आर.चौ.मी.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|---|
| पालव | ५ | १९५ (रेवदंडा ) | १०७-००-०० | १०७०.०० |

सदरहू मिळकतीपैकी ६-८३-०० (आर.चौ.मी.) क्षेत्रफळ असलेली बिनशेती मिळकत व सदर मिळकतीत बांधण्यात आलेली ग्रुप ग्रामपंचायत रेवदंडा मालमत्ता क्रमांक २९०४/अ, क्षेत्रफळ ४०X२०=८०० चौ. फुट, घरपट्टी रू. २५९४/- ही आर.सी.सी. बांधकामाची इमारत, किचन रूम, स्विमींग पुल सहीत असलेली सर्व मिळकत

सदरहू वर्णन केलेली मिळकत निर्वेध, बोजारहीत असल्याची व सदर मिळकत आमचे अशिलांस कायमस्वरूपी विकण्याचा पुर्ण हक्क व अधिकार असल्याची हमी सदर मिळकतींचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेली आहे. तथापी सदर मिळकतीत अन्य कुणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्र, अन्नवस्त्र, जप्ती, लिज, कर्जाचा बोजा, जामिनकी, कुळहक्क, कब्जा, वारसाहक्क, मालकी, एम.ओ.यु.करार, ताबे कब्जा वहीवाटी, रस्ता वहीवाट, कोर्टकचेरी वगैरे संबंधी कसल्याही प्रकारचे हक्क अगर हितसंबंध अगर तक्रार/हरकती असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ०७ दिवसांचे मुदतीत लेखी स्वरूपात, प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे सादर कराव्यात. तशी लेखी हरकत वा तक्रार दिलेल्या मुदतीत आली नाही, तर सदर मिळकतीवर विद्यमान मालकाशिवाय अन्य कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध अधिकार नाही. वा असल्यास तो त्यांनी स्वेच्छेने सोडुन दिला आहे असे समजुन, गुहीत धरून सदरचा व्यवहार नोंदणीकृत दस्त करून पूर्ण केला जाईल व या मुदतीनंतर आलेल्या हरकती व तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : १३/०९/२०२३

सही / -
**ॲड. सचिन सदानंद पाटील**
रा. कुरूळ, ता. अलिबाग, जि. रायगड
ऑफीस : ऋग्वेदा अपार्टमेंट, श्रीबाग नं.३,
ता. अलिबाग, जि. रायगड
फोन नं. : ९८८१६३७९२४/८८८८८६७६५०

# कृषीवल गणेश दर्शन स्पर्धा २०२४


● मुरुड कोळीवाडा येथील श्री. संजय हरेश चोगले यांच्या निवासस्थानी बसलेला गणपती बाप्पा (लकी ड्रॉ) (छायाचित्र : गणेश चोडणेकर)



● मुरुड कोळीवाडा येथील श्री. प्रयाग अनंता केंडू यांच्या निवासस्थानी बसलेला गणपती बाप्पा (लकी ड्रॉ). (छायाचित्र : गणेश चोडणेकर)


● पेणचे सुप्रसिद्ध कॉन्ट्रॅक्टर श्री. राजु पिचिका यांचा घरचा गणपती. (छायाचित्र- सेजल किशोर जाधव)


● श्री. नरेश मिनमिने, मु. अंजप, ता. कर्जत यांच्या घरी विराजमान गणपतीचे दर्शन घेताना घाडी बंधू आणि मित्रपरिवार. (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)


● श्री. जगन्नाथ बाळकृष्ण घरत, मु. मधलापाडा-खंडाळे, ता. अलिबाग यांच्या निवासस्थानी अनंत चतुर्थीच्या निमित्ताने प्राणप्रतिष्ठा करण्यात आलेली श्रींची मूर्ती. (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)



● किहीम ग्रामपंचायत उपसरपंच मिलिंद पडवळ, यांच्या घरी विराजमान गणपतीचे दर्शन घेताना सरपंच पिंट्या गायकवाड व इतर ग्रामपंचायत सदस्य व सदस्या. (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)


● श्री. किरण फाटे, मु. मुशेत, ता. अलिबाग यांच्या घरी विराजमान गणपती. (छायाचित्र- अब्दुल सोगावकर)


विजय वसंत ठाकूर चौल सागमळा यांचे निवासी श्री गणेशाची आकर्षक सजावट. (छायाचित्र : सुरेश खडपे)


● श्री. आकाश शिंदे, मु. मुशेत, ता. अलिबाग यांच्या घरी विराजमान गणपती. (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)


● उदय रामदास घरत वरसोली, ओमकार आळी, अलिबाग. मूर्तीकार- श्याम घरत.


सजावटकार निलेश लक्ष्मण ठाकूर यांच्या चिरनेर मुळपाडा येथील निवासस्थानी विराजमान झालेल्या गणरायाचे दर्शन घेताना, चिरनेर ग्रामपंचायतीचे उपसरपंच सचिन घबाडी व माजी ग्रा.प. सदस्या शितल घबाडी छायाचित्रात दिसत आहे. (छायाचित्र : काव्य म्हात्रे)


● दिलखुश बासरीवाले प्रल्हाद कोटकर मु. न्हावे-रोहा यांच्या निवासस्थानी गणेशमूर्ती. (छायाचित्र : सत्यप्रसाद आडाव, चणेरा)


● परेश परशुराम म्हात्रे, मु. भुते, ता. अलिबाग.


आई फाऊंडेशनचे श्री. सागर पवार, मु. साईनगर-किहीम यांच्या निवासस्थानी विराजमान गणरायाचे दर्शन घेताना सरपंच पिंट्या गायकवाड. (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)


नेरळ- नेरळ परिसरातील हजारे नगर मित्र मंडळ बोपेले रोड नेरळ आयोजित गणेशोत्सवानिमित्त मंडळाचे अध्यक्ष सतिश जाधव यांच्या संकल्पनेतून उभारला कड्यावरचा गणपती सोबतच माथेरानची राणी टॉय ट्रेन चा देखावा साकारण्यात आला आहे. कलाकार चित्रकार प्रथमेश यंदे व बबल्या खंडवी यांनी हा देखावा उभारण्यास खूप मेहनत घेतली. सोबतच मंडळाचे कार्याध्यक्ष कुंडलिक सोळसे, उपाध्यक्ष प्रमोद गायकवाड, अमिताभ भट्टाचार्य, सेक्रेटरी गिरीश इंगळे, खजिनदार सचिन देवकारे, अशोक गायकवाड, अभिषेक पंचभाई, कैलास पंचभाई, सुधाकर यंदे, रुपेश कोळी, गुरुनाथ मालभागे, सचिन यंदे, किरण ढेंगळे, मुन्ना, टीटू प्रधान तसेच सर्व सदस्य दहा दिवस मेहनत घेत आहेत. तसेच नवव्या दिवशी मंडळाकडून महाप्रसादाच आयोजन केले आहे. मंडळाच्या वतीने दरवर्षी वृक्षारोपण, रक्तदान शिबिर असे अनेक सामाजिक उपक्रम राबवले जातात.

## 'रसायनीसाठी एनएमएमटी बससेवा सुरु करावी'

**पनवेल :** नवी मुंबईतून रसायनीकडे प्रवास करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या अधिक आहे. रसायनीकडे जाण्यासाठी अपूऱ्या सेवेमुळे या विद्यार्थ्यांचे हाल होत आहेत. बेलापूर, खारघर, कामोठे, खांदा कॉलनी, पनवेल ते रसायनी अशी बस सेवा सुरु करावी. अशी मागणी नवी मुंबई महानगरपालिकेच्या परिवहन विभागाकडे केली आहे.

रसायनी येथे मोठया प्रमाणावर विद्यार्थी शिक्षण घेतात. यासाठी विद्यार्थ्यांना खासगी वाहतुकीचा वापर करावा लागतो. त्यामुळे विद्यार्थ्यांना नाहक भुर्दंड द्यावा लागतो. खासगी वाहतूकदार जादा भाडे आकारत असल्याने विद्यार्थ्यांना आर्थिक भूर्दंड बसत आहे. एसटी महामंडळाच्या गाड्याही अपूऱ्या आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे.

# भिराच्या पाणी प्रस्तावाला गती

## शासन मंजुरीनंतर पनवेल महापालिकेचा ३४०० कोटींचा खर्च

**। पनवेल । वार्ताहर ।**

दोन वर्षांपासून भिरा येथील टाटा वीज प्रकल्पातील वीजनिर्मितीनंतर विसर्ग होणाऱ्या पाण्यापैकी ५०० दशलक्ष लिटर पाणी दरदिवशी पनवेलकरांना मिळण्यासाठीच्या प्रस्तावाला कोकण पाटबंधारे विकास महामंडळाच्या कार्यकारी संचालकांनी मंजुरी देऊन तो शासनाकडे पाठविला आहे. या प्रस्तावाला शासनाची मंजुरी मिळाल्यानंतर पनवेल महापालिका ३४०० कोटी रुपये खर्च करून ९० किलोमीटर अंतरावरून हे पाणी पनवेलकरांसाठी आणणार आहे.

पनवेल महापालिकेचे तत्कालीन आयुक्त गणेश देशमुख यांनी २०२२ ऑगस्ट महिन्यात संबंधित प्रस्तावाला प्रशासकीय सर्वसाधारण सभेत मंजुरी दिल्यानंतर या प्रस्तावाला गती मिळाली. पनवेल महापालिका क्षेत्राची सध्याची मागणी २२५ दशलक्ष लिटर असली तरी भविष्यात पनवेलची मागणी ६७६ दशलक्ष लिटर होणार असल्याने पालिकेने २०२२ मध्ये जलसंपदा विभाग, पाटबंधारे विभागाकडे याबाबतची मागणी प्रस्ताव पाठविला. पाटबंधारे विभागाने जलसाठ्यातील विसर्गानंतर उरलेल्या पाण्याचे मोजमाप केल्यावर त्याविषयी इतर कोणाची मागणी प्रस्ताव नसल्याची खात्री केल्यावर संबंधित पाणी देण्याची तयारी दर्शविली. याच प्रस्तावामध्ये तत्कालीन पालिका आयुक्त देशमुख यांनी संबंधित प्रकल्पासाठी लागणारा खर्च पनवेल पालिका करण्याची तयारी दर्शविल्याने पाटबंधारे विभागाच्या मुख्य अभियंत्याकडून संबंधित प्रस्तावाला मंजुरी मिळाल्यानंतर संबंधित प्रस्ताव या विभागाच्या कार्यकारी संचालकांकडे गेला.

विद्यामान पनवेल पालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांनी संबंधित प्रस्तावाला चालना मिळण्यासाठी पालिकेचे पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अधिकारी विलास चव्हाण यांना याबाबत पाठपुराव्यासाठी नेमले आहे. नुकताच या पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी संचालक कार्यालयाने संबंधित प्रस्तावाला शासनाकडे पाठविल्याची माहिती जलसंपदा विभागाच्या विश्वसनीय सूत्रांकडून मिळाली. शासनाकडे संबंधित प्रस्ताव असल्याने महिन्यात एकदा तरी मंत्रिमंडळाच्या उपसमितीची बैठक होते.

ऑगस्टमध्ये मंत्रिमंडळाच्या उपसमितीच्या बैठकीसमोर संबंधित प्रस्ताव मांडला जाण्याची शक्यता आहे. या मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष राज्याचे उपमुख्यमंत्री असतात. तसेच या समितीमध्ये पाण्याशी संबंधित असलेल्या उद्योग, कृषी, जलसंपदा अशा विविध खात्यांचे पाच मंत्री या समितीचे सदस्य असतात. सध्या या उपसमितीच्या बैठकीत संबंधित मंत्र्यांच्या निर्णयाकडे पनवेलकरांचे लक्ष लागले आहे.



### माझी वसुंधरा अभियान

# वाशी येथे बाप्पाचे कृत्रिम तलावात विसर्जन



**। हमरापूर । वार्ताहर ।**

माझी वसुंधरा अभियान अंतर्गत पेण तालुक्यातील वाशी येथे ग्रामपंचायतीने तयार केलेल्या कृत्रिम तलावात गणपती बाप्पांचे विसर्जन करण्यात आले.

याप्रसंगी ग्रामपंचायतचे सरपंच संदेश ठाकूर, तशेच उपसरपंच कोमल म्हात्रे, माजी उपसरपंच सुरेखा पाटील, ग्राम पंचायतीचे सदस्य सुनील पाटील, प्रियांका पाटील, ग्रामविकास अधिकारी राजेंद्र गडदे व सर्व सदस्य तसेच मंदिराचे ट्रस्टी आणि श्रीसेवक उपस्थित होते.

गेल्या अनेक वर्षापासून चालू असलेली तलावात विसर्जन करण्याची पद्धत ग्रामपंचायत वाशी यांनी मोडीत काढुन जलप्रदूषण थांबविण्याचे पाऊल टाकले. ग्रामपंचायतीतील सर्व भाविकांना आवाहन करून माझी वसुंधरा अभियान ५.० मध्ये जलप्रदूषण थांबवण्यासाठी सहभाग घेऊन पाच दिवसाचे गणपतीचे विसर्जन मोठ्या भक्तीभावाने ग्रामपंचायतीने तयार केलेल्या कृत्रिमसाठा विहिरीत गणेश विसर्जन करण्यात आले.

ज्या भाविकाने गणेश विसर्जन कृत्रिम साठा विहिरीत केले त्यांना मान्यवराच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. अनेक भाविकांनी कृतिमसाठा विहिरीत विसर्जन करुन पर्यावरण समतेल राखला. सदर प्रसंगी सरपंच, उपसरपंच आणि ग्रामपंचायतीचे सर्व सदस्य तसेच ग्रामपंचायतीचे कर्मचारी यांनी विशेष मेहनत घेऊन सहकार्य केले.

# आखाडावाडी रस्ता खड्ड्यात

। नेरळ । प्रतिनिधी ।

**कर्जत तालुक्यातील नेरळ विकास प्राधिकरणमध्ये असलेल्या ममदापुर ग्रामपंचायतीमधील प्राधिकरणाच्या रस्त्याची दुरवस्था झाली आहे.नेरळ विकास प्राधिकरणमध्ये करोडोंचा निधी पडून असतानादेखील ममदापुर आखाडा वाडीपर्यंतच्या रस्त्यावर खड्डे पडले आहेत. या रस्त्यासाठी नेरळ विकास प्राधिकरणमधून निधी देण्यात आल्याची अनेकदा घोषणा झाली आहे. मात्र अद्याप निधी पोहचला नसल्याने ममदापुर आखाडा वाडी कॉलेज रस्त्यावर प्रचंड खड्डे पडले आहेत.**



नेरळ विकास प्राधिकरणमध्ये ममदापुर ग्राम पंचायत असून त्या गावात मोठ्या प्रमाणात नागरी वस्ती वाढत आहे. त्यामुळे आठ वर्षांपूर्वी तेथील अनेक रस्त्याची कामे नेरळ विकास प्राधिकरणकडून करण्यात आली होती. त्यानंतर या भागात अनेक रस्त्यांची कामे मंजूर करण्यात आली असल्याचे जाहीर घोषणा अनेकदा करण्यात आली होती.मात्र सध्या ममदापुर नवीन वसाहतीमध्ये असलेल्या अनेक रस्त्यांवर खड्डे पडले आहेत.त्यामुळे या भागातील रस्त्यांची कॉंक्रिटीकरण करण्यात यावे अशी मागणी स्थानिक ग्रामस्थांनी केली आहे.

रस्त्यांची कामे करण्यात येत नसल्याने ममदापुर नवीन वसाहत भागातील रस्त्यांची दुरवस्था झाली आहे. त्या रस्त्यावर आखाडा वाडीकडे जाणाऱ्या रस्त्यावर अभियांत्रिकी महाविद्यालय आहे. त्या महाविद्यालयात शेकडो विद्यार्थी यांची ये-जा सुरु असते. त्यात रस्त्यावर पडलेले खड्डे यामुळे रस्त्याने ये-जा करणारी वाहने कोसळण्याची शक्यता आहे. त्यामुळे अपघातदेखील होऊ शकतो आणि त्यामुळे रस्त्यावर पडलेल; खड्डे लक्षात घेऊन नेरळ विकास प्राधिकरणकडून रस्त्यांची कामे करावी अशी मागणी आदिवासी बांधवांनी केली आहे.

# चहाच्या दुकानात चोरी

**। पनवेल । वार्ताहर ।**

चहाच्या दुकानात अज्ञात चोरट्यांनी चोरी करून तेथील बिस्किटचे पुडे व गॅस सिलेंडर चोरुन नेल्याची घटना तळोजा पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे. तळोजा औद्योगिक वसाहतीमधील हिंदालको कंपनीच्या गेट नं.२ जवळ सत्यवान शिंदे यांचे चहाच्या टपरीचे दुकान आहे. सदर दुकानात अज्ञात चोरट्यांनी चोरी करून दुकानाचा दरवाजा तोडून आतील गॅस सिलेंडर व बिस्किटचे पुडे असा मिळून जवळपास १८ हजार रुपये किंमतीचा ऐवज चोरुन नेल्याने याबाबतची तक्रार तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# परदेशी पर्यटनाच्या नावाखाली फसवणूक

**। पनवेल । वार्ताहर ।**

विदेशात खासकरून युरोप आणि सिंगापूर येथे स्वस्तात पर्यटनाच्या नावाखाली १९ जणांची ३९ लाख ७ हजार ७४ रुपयांची फसवणूक झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी वाशी पोलीस ठाण्यात संबंधित एजन्सी चालक-मालक यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या प्रकरणात १९ जणांनी फिर्याद दिली असली तरी ती संख्या वाढू शकते. ज्यांची फसवणूक झाली त्यांनी वाशी पोलिसांशी संपर्क करून तक्रार द्यावी, असे आवाहन पोलिसांनी केले आहे. विकी ऊर्फ भूपेश ठक्कर असे यातील आरोपीचे नाव आहे.

विकीने वाशीतील हावरे फँटसीया पार्क या व्यावसायिक इमारतीत ट्रॅव्हल्स एक्स्प्रेस नावाची एजन्सी सुरू केली. विदेशात हवे तिथे पर्यटन करा आम्ही सर्व सोय करतो अशा आशयाची जाहिरात समाजमाध्यमातून केली होती. त्याला बळी पडून अनेकांनी युरोप-अमेरिका-सिंगापूर येथे पर्यटनाला जाण्यासाठी बुकिंग केले. मात्र जेव्हा तिकीट आणि हॉटेल बुकिंग पावती व इतर आवश्यक कागदपत्रे घेण्यासाठी पर्यटक आले, त्यावेळी सुरुवातीला कारणे सांगून टाळण्यात आले. मात्र काही दिवसांपूर्वी कार्यालयास टाळे लावून आरोपी पळून गेला. हे जेव्हा बुकिंग केलेल्या लोकांना कळले, त्यावेळी त्यांनी वाशी पोलीस ठाण्यात तक्रारी दाखल केल्या. यात मुख्य तक्रार नवीन ठक्कर या ज्येष्ठ नागरिकांच्या नावे नोंद करण्यात आली आहे. त्यांच्याप्रमाणेच अन्य १८ असे एकूण १९ जणांची ३९ लाख ७ हजार ७४ रुपयांची फसवणूक करण्यात आली आहे. याप्रकरणी पोलीस उपनिरीक्षक रमेश पाटील हे तपास करीत आहेत. ट्रॅव्हल्स एक्स्प्रेस एजन्सीमार्फत कोणी बुकिंग केले असेल तर वाशी पोलीस ठाण्याशी संपर्क करावा, असे आवाहन वाशी पोलिसांनी केले आहे.

# प्रमोद दिक्षितांच्या कुंचल्यातून अप्रतिम कल्पनाविष्कार

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

कमर्शियल आर्टसमध्ये जागतिक ख्याती प्राप्त चित्रकार आणि पोलादपूरचे सुपुत्र प्रमोद दिक्षित यांच्या वैविध्यपूर्ण चित्रांचे प्रदर्शन पोलादपूर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या श्रीगणेशासमोरील स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे सभागृहामध्य सोमवारी (दि. १६) आयोजित करण्यात आले आहे. जागतिक स्तरावरील जाहिरात कंपन्यांच्या मागणीनुसार चित्राद्वारे संकल्पना सादर करणाऱ्या प्रमोद दिक्षित यांना गेल्या काही वर्षांपासून पोलादपूर तालुक्यातील ग्रामीण जनजीवनाने घातलेली भुरळ त्यांच्या अनेक चित्रकृतींद्वारे स्पष्ट होत आहे. चित्रकलाप्रेमींसह सर्वांनीच जागतिक ख्यातीचे चित्रकार प्रमोद दिक्षित यांचा कलाविष्कार पाहण्यासाठी आवर्जून चित्रप्रदर्शनाला भेट देण्याचे आवाहन गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष अमरदीप नगरकर यांनी केले आहे.



ग्रामीण जनजीवनाचे यथार्थ चित्रण करणाऱ्या प्रमोद दिक्षितांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, माजी सैनिक, फडप्रमुख आजरेकर महाराज, आईमुल, गुरे चरायला सोडून मोबाईल बघणारी युवती,करवंद बोरं जांभळं फणसाचे गरे विकायला बसलेली महिला, पहाटे अंगण शेणाने सारवणारी महिला, तांदूळ पाखडणारी गृहिणी, कपडे आपटून धुणारी महिला, विचारमग्न पुरूष, स्नान करणारी तरूणी, केशरी व काळया रंगात साकारलेली अंबाड्यात वेणी माळणारी महिला, मासेमारी करणारा बालक, डोक्यावर ओझे घेऊन हातात काठी धरलेली महिला, वाहत्या पाण्यात पाय आपटून आनंदीत झालेली तरूणी, तीरकमठा हाती धरलेला आदिवासी, पावा वाजविणारा गुराखी, बाळाला पाजणारी आई, पारंब्या आणि वटवृक्ष, कमळ काढण्यासाठी तलावात झुकलेली तरूणी, नांगरणी करणारा शेतकरी, चुलीसाठी लाकडे गोळा करणारी महिला, वृध्द, बालक, बालिका, तरूणी, विविध पक्षी, पशू, वाहने, कुडपणची भीमाची काठी आणि छोटी कौलारू घरे, ग्रामीण बालक्रिडांची दृश्य, छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातील महत्वाचे प्रसंग, कमळ, संध्याकाळ, मधमाश्यांचे घोंगावणे, नंदी, मंदिर, गणपती, श्रीकृष्ण, लीओ नार्दो द व्हिन्सीच्या कलाकृतींसारखी मराठमोळी दृश्य अशी अनेक चित्रं जलरंगातून साकारली आहेत.सोमवारी प्रमोद अनंत दिक्षित या पोलादपूरच्या भुमिपुत्राची जागतिक स्तरावरील चित्रकला तालुक्यातील जनतेसाठी खुल्या प्रदर्शनातून पाहण्याची पर्वणी उपलब्ध झाली आहे.



## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे मुशेत, ता. अलिबाग, जि. रायगड येथील श्री.चंद्रशेखर वामन सुर्वे यांच्या मालकीच्या खालील वर्णनाच्या मिळकतीमधून वहिवाटीच्या रस्त्याचा निरंतर व कायम स्वरूपी हक्क घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे. आर) | आकार (रु. पै.) |
|---|---|---|---|
| मुशेत | २२ | ०-६३-४० | १५.२० |
| | | पो.ख. ०-११-२० | |
| | | ०-७४-६० | |

पैकी चंद्रशेखर वामन सुर्वे यांच्या मालकीची ० हे ५७.६० आर(पोट खराब्यासह), आकार ११ रूपये १२ पैसेही मिळकत.

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्कांची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसा हक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा आमचे अशिलांनी सदर मिळकतींतून कायम स्वरूपी व निरंतर वहिवाटीच्या रस्त्याचा हक्क घेण्यास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही असे गृहित धरून आमचे अशिल सदर मिळकतींतून वहिवाटीच्या रस्त्याचा निरंतर व कायम स्वरुपी हक्क घेतील व तसा दस्त ऐवज रजिस्टर्ड करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग — सही/-
तारीख : १५/९/२०२४
**अॅड. गणेश गोविंद पाटील.**
अे/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हा. सोसायटी,
युनियनबँकेसमोर, ब्राम्हणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

## जहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे चेंढरे, शिवाजीनगर, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णनाची सदनिका मिळकत विद्यमान मालक श्री. अमित शिवाजीराव शेवाळे व सौ. ममता अमित शेवाळे यांचेकडुन कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे चेंढरे, शिवाजीनगर, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत :-**

| सोसायटीचे नाव | क्षेत्र (चौ. फुट / चौ.मी) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|
| ओकॉन्स मरीना को.ऑप. हौसिंग सोसायटी, पहिला मजला, फ्लॅट नं. २०२, ग्रामपंचायत मिळकत क्र. १५८५/३ | ५७.८१<br>२१.६७<br>चौ.मी<br>६२२.००<br>२३३.००<br>चौ. फुट | २३४५ |

तरी वर नमुद सदनिका मिळकतीवर विद्यमान मालकांशिवाय अन्य कोणाही इसमांचा संस्थांचा साठेकरार, खरेदीखत, कुळवहिवाट, बक्षीसपत्र, मृत्युपत्र, वारसाहक्क, पोटगी, गहाण, तारण, बोजा, भाडेपट्टा, अदलाबदलीचा करारनामा, जाणे-येणेचा वहिवाटीचा मार्ग, इजमेंट हक्क वगैरे अथवा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन सात (०७) दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांच्याकडे सादर कराव्यात उक्त मुदतीत अशाप्रकारच्या कोणत्याही हरकती न आल्यास सदरची मिळकत ही निर्वेध व बोजा विरहीत असुन सदनिकेचे टायटल मार्केटेबल क्लिअर आहे असे समजुन आमचे अशिल मिळकतीचे विद्यमान मालकांबरोबर सदर मिळकतीच्या खरेदीविक्रीचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही. तसेच अशा प्रकारचा कोणताही हक्क असल्यास तर तो जाणीवपुर्वक आमचे अशिलांच्या लाभात सोडुन दिलेला आहे असे समजण्यात येईल याची याव्दारे नोंद घ्यावी.

अलिबाग, — सही/-
दिनांक : १४/०९/२०२४
**अॅड. परेश अ. देशमुख**
जिल्हा न्यायालय अलिबाग-रायगड
Adv. Paresh A. Deshmukh
B.S.L. LL.B.
Regi. No. Mah/2984/2000
Alibag - Raigad.

## जाहीर सूचना

तमाम जनतेला याद्वारे सूचना देण्यात येते की, आम्ही याखालील लिखित अनुसूचीमध्ये अधिक स्वरूपात वर्णन केलेल्या मालमत्तेच्या (यापुढे ''मालमत्ता'' असे उल्लेखित) संदर्भामध्ये मिलींद गजानन चव्हाण व सुचिता मिलींद चव्हाण (''मालक'') यांचे मालकी हक्क तपासत आहोत, जसे आमचे अशील हे मालकांकडून सदर मालमत्ता खरेदीसाठी इच्छुक आहेत.

सर्व किंवा कोणत्याही व्यक्तीला सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये/विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्यकाही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळविणे आवश्यक आहे, कसूर केल्यास, तसा दावा, मागणी किंवा आक्षेप अस्तित्वात नसल्याचे मानण्यात येईल आणि जरी तसा दावा, मागणी किंवा आक्षेप कायद्यात किंवा अन्यथा अस्तित्वात असल्यास, दावेदारानी तसा दावा, मागणी किंवा आक्षेप रद्द केल्याचे मानण्यात येईल आणि/किंवा तसा दावा, मागणी किंवा आक्षेपाचा कोणताही हक्क त्याग केला असे समजण्यात येईल आणि कोणताही असा दावा, मागणी किंवा आक्षेप आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाही आणि आमचे अशील वर नमूद केल्याप्रमाणे सदर मालमत्ते संदर्भात खरेदीव्यवहार करू शकतात.

**अनुसूची**
**(मालमत्तेचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव - टेकाळी तालुका -अलिबाग, जिल्हा - रायगड येथे स्थित गट क्रमांक व उपविभाग ८९, एकूण क्षेत्र ०-१३-३० (हे.आर.चौ.मी.) आकार ० रु.३९ पै.

ठिकाण: अलिबाग — **झुंजारराव आणि कं. करीता**
दिनांक : १५/०९/२०२४ — सही/-
**विक्रांत झुंजारराव**

## जाहीर सूचना

तमाम जनतेला याद्वारे सूचना देण्यात येते की, आम्ही याखालील लिखित अनुसूचीमध्ये अधिक स्वरूपात वर्णन केलेल्या मालमत्तेच्या (यापुढे ''मालमत्ता'' असे उल्लेखित) संदर्भामध्ये मिलींद गजानन चव्हाण व सुचिता मिलींद चव्हाण (''मालक'') यांचे मालकी हक्क तपासत आहोत, जसे आमचे अशील हे मालकांकडून सदर मालमत्ता खरेदीसाठी इच्छुक आहेत.

सर्व किंवा कोणत्याही व्यक्तीला सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये/विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्यकाही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळविणे आवश्यक आहे, कसूर केल्यास, तसा दावा, मागणी किंवा आक्षेप अस्तित्वात नसल्याचे मानण्यात येईल आणि जरी तसा दावा, मागणी किंवा आक्षेप कायद्यात किंवा अन्यथा अस्तित्वात असल्यास, दावेदारानी तसा दावा, मागणी किंवा आक्षेप रद्द केल्याचे मानण्यात येईल आणि/किंवा तसा दावा, मागणी किंवा आक्षेपाचा कोणताही हक्क त्याग केला असे समजण्यात येईल आणि कोणताही असा दावा, मागणी किंवा आक्षेप आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाही आणि आमचे अशील वर नमूद केल्याप्रमाणे सदर मालमत्ते संदर्भात खरेदीव्यवहार करू शकतात.

**अनुसूची**
**(मालमत्तेचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव - टेकाळी तालुका -अलिबाग, जिल्हा-रायगड येथे स्थित गट क्रमांक व उपविभाग ११८, एकूण क्षेत्र ०-०७-३० (हे.आर.चौ.मी.) आकार ० रु.१५ पै.

ठिकाण: अलिबाग — **झुंजारराव आणि कं. करीता**
दिनांक : १५/०९/२०२४ — सही/-
**विक्रांत झुंजारराव**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत त्यांच्या मालकाकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे मूद्रे बुद्रुक, तालुका - कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे आर. पाँ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| जगदीश शंकर म्हसे | ९ | ३ | ०-१९-०० | १-१९ |

सदरची जमीन मिळकत ही वरील मालकाच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून ती विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकत ही तद्ंगभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेली जमीन मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्ज लिन, ताबेकब्जा वगैर कोणतेही प्रकारचा हक्कहित संबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाले पासून २१ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे अॅडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदती नंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत — खरेदीदारा तर्फे वकील
दि. १५/०९/२०२४
**अॅड. स्वप्निल बाबूराव देशमूख**
पत्ता. मार्वल क्षिप्रा रेसीडेन्सी, शॉप नं. २४,
डी विंग, मुद्रे बुद्रक, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९२७३२२४६८०/८८३०५६०९६२

## जाहीर सूचना

तमाम जनतेला याद्वारे सूचना देण्यात येते की, आम्ही याखालील लिखित अनुसूचीमध्ये अधिक स्वरूपात वर्णन केलेल्या मालमत्तेच्या (यापुढे ''मालमत्ता'' असे उल्लेखित ) संदर्भामध्ये लक्ष्मी लक्ष्मण भोईर, सतीश लक्ष्मण भोईर, ललिता लक्ष्मण भोईर, लता दयाराम पेढवी, सोहनी हरिभाऊ भोईर, दत्ताराम लक्ष्मण भोईर, बबन हरी भोईर, सुनिता महादेव भोईर, संगीता महादेव भोईर, अश्विनी महादेव भोईर, कामिनी महादेव भोईर, मिल्का महादेव भोईर, नीला महादेव भोईर, निवासिनी महादेव भोईर (''मालक'') यांचे मालकी हक्क तपासत आहोत, जसे आमचे अशील हे मालकांकडून सदर मालमत्ता खरेदीसाठी इच्छुक आहेत.

सर्व किंवा कोणत्याही व्यक्तीला सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये/विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्यकाही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळविणे आवश्यक आहे, कसूर केल्यास, तसा दावा, मागणी किंवा आक्षेप अस्तित्वात नसल्याचे मानण्यात येईल आणि जरी तसा दावा, मागणी किंवा आक्षेप कायद्यात किंवा अन्यथा अस्तित्वात असल्यास, दावेदारानी तसा दावा, मागणी किंवा आक्षेप रद्द केल्याचे मानण्यात येईल आणि/किंवा तसा दावा, मागणी किंवा आक्षेपाचा कोणताही हक्क त्याग केला असे समजण्यात येईल आणि कोणताही असा दावा, मागणी किंवा आक्षेप आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाही आणि आमचे अशील वर नमूद केल्याप्रमाणे सदर मालमत्ते संदर्भात खरेदीव्यवहार करू शकतात.

**अनुसूची**
**(मालमत्तेचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव-नांदईपाडा, तालुका रायगड येथे स्थित भूमापन क्रमांक व उपविभाग ८४, एकूण क्षेत्र ०-६५-३०(हे.आर. चौ.मी.) आकार ८ रु.७५ पै. पैकी क्षेत्र ०-३७-०० (हे.आर.चौ.मी.)

ठिकाण: अलिबाग — **झुंजारराव आणि कं. करीता**
दिनांक : १५/०९/२०२४ — सही/-
**विक्रांत झुंजारराव**

## जाहीर सूचना

तमाम जनतेला याद्वारे सूचना देण्यात येते की, आम्ही याखालील लिखित अनुसूचीमध्ये अधिक स्वरूपात वर्णन केलेल्या मालमत्तेच्या (यापुढे ''मालमत्ता'' असे उल्लेखित) संदर्भामध्ये शालिनी संजय परसरामपुरीया (''मालक'') यांचा सदर मालमत्ते संदर्भात मालकी हक्क तपासत आहोत, जसे आमचे अशील है मालकाकडून सदर मालमत्ता खरेदीसाठी इच्छुक आहेत.

सर्व किंवा कोणत्याही व्यक्तीला सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये/विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्यकाही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई- ४०० ००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सुचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळविणे आवश्यक आहे, कसूर केल्यास, तसा दावा, मागणी किंवा आक्षेप अस्तित्वात नसल्याचे मानण्यात येईल आणि जरी तसा दावा, मागणी किंवा आक्षेप कायद्यात किंवा अन्यथा अस्तित्वात असल्यास, दावेदारानी तसा दावा, मागणी किंवा आक्षेप रद्द केल्याचे मानण्यात येईल आणि/किंवा तसा दावा, मागणी किंवा आक्षेपाचा कोणताही हक्क त्याग केला असे समजण्यात येईल आणि कोणताही असा दावा, मागणी किंवा आक्षेप आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाही आणि आमचे अशील वर नमूद केल्याप्रमाणे सदर मालमत्ते संदर्भात खरेदीव्यवहार करू शकतात.

**अनुसूची**
**(मालमत्तेचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव सुरेखार, तालुका अलिबाग, जिल्हा-रायगड येथे स्थित भूमापन क्रमांक व उपविभाग १३/२, एकूण ०१.४०.०० (है.आर.चौ.मी.) पैकी क्षेत्र क्षेत्र ०१.३६.०० (है.आर.चौ.मी.) आकार ०८ रु. ९८ पै. धारक जमिनीचे सर्व ते भाग आणि विभाग.

ठिकाण: अलिबाग — **झुंजारराव आणि कं. करीता**
दिनांक : १५/०९/२०२४ — सही/-
**विक्रांत झुंजारराव**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, खालील वर्णन केलेल्या शेतजमिन मिळकतीचे मालक श्री. रघुनाथ पांडू बार्शी, श्री. रामभाऊ पांडू बार्शी, अलका पांडू बार्शी, श्रीमती. सोनाबाई पांडू बार्शी, सौ. नर्मदा मंगल घारे, सौ. जाईबाई श्रीराम माळी, श्री. रविंद्र हरिश्चंद्र बार्शी, श्री. सोपान हरिश्चंद्र बार्शी, सौ. बेबी रमेश डायरे, सौ.मुक्ता हरिश्चंद्र बार्शी, सौ. सुरेखा गजानन बार्शी, श्री. कमलाकर गजानन बार्शी, श्री. योगेश गजानन बार्शी, सौ. वंदना लोमेश भोईर, श्री. रामदास मंगळ भोईर, श्री. सुर्यकांत मंगळ भोईर, श्री. संतोष मंगळ भोईर, श्री. रोहीदास मंगळ भोईर, सौ. शोभा राजेश ठाकूर यांनी त्यांचे वडीलोपार्जित मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील मिळकत आमचे अशिल श्रीमती. सुवर्णा सुभाष सोनावळे यांना कायम स्वरूपी खरेदीखताने विकत देण्याचे ठरविले असून तशी बोलणी आमचे अशिलांबरोबर केलेली आहेत. मौजे हुमगाव तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड ४१०२०१ येथील मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे

| भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी) | आकार (रू.पै) |
|---|---|---|
| ७०/९/ क | ०-६३-७०<br>०-०१-३० पो. ख<br>०-६५-०० एकूण पैकी<br>खरेदी घेत असलेले क्षेत्र<br>०.४२.०० (हे.आर.चौ.मी) | ०.५९ |

तरी मिळकतीच्या बाबतीत कोणाचाही कुळवहिवाट, ताबा, बयाणा, पावती साठेकरार, गहाण, बोजा, बक्षीस, दान, जप्ती, लिज, अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशिर हक्क, भारतातील कोणत्याही कोर्टाचे मनाईहुकूम, करारनामा व इतर हितसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत खाली सही करणार वकील यांच्या नमुद केलेल्या कार्यालयाचे पत्त्यावर आपल्या हरकती लेखी पुराव्यासह देण्यात यावे. दिलेल्या मुदतीनंतर कोणाचीही हरकत आली तर ती हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्व जनतेने नोंद घ्यावी.

कर्जत — सही /
तारीख १४/०९/२०२४
**अॅड.जगदिश पांडूरंग कराळे**
कार्यालय गाळा नं. १०, पंकज रेसिडेन्सी, साई हॉस्पीटल जवळ, आगरी समाज हॉलच्या बाजूला, धामोते, नेरळ, ता.कर्जत, जि.रायगड ४१०१०१, मो. नं ८३६९२१७३१३



## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही,याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

-मुख्य संपादक



# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

## क्लासिफाईड

जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- सर्वप्रकारचे आजार, संतानप्राप्ती आर्युवैदिक निसर्गोपचाराने/ विवाहनोंदणी/कर्ज/ठेवींवर लाखास दरमहा ३०००/- घरबसल्या कामासाठी डॉ.नथुराम शिहू/रायगड ४०२१०६ (पोयनाड-नागोठणा) ७०२००८५२०९
- अलिबाग एस.टी.स्टॅन्ड समोर 'अलिबाग प्राईड' येथे पहिला माळा, 'रोड फेसिंग' सेमी कमर्शिअल फ्लॅट भाडेतत्वावर देणे/ विकणे आहे. Area1000 sq.ft (2BHK Flat) Contact : 9579548535 ( स.९ ते सं.६)
- दुकान भाड्याने मिळेल बेवुड, गोंधळपाडा अलिबाग ९४२३३७५१९८/८४११०१६४४४
- घरात घरकाम व मुलाची देखभाल करण्यासाठी केअर टेकर पाहिजे आहे. ठिकाण नागाव. कामाची वेळ सकाळी ९ ते संध्याकाळी ६ , पगार १००००. संपर्क- ७८७५८५६५५५.
- वरसोली समुद्राजवळ २½ हजार sq.ft. ची जागा हॉटेल सुसज्ज फर्निचरसह पाणी २४ तास आणि इतर व्यवसायासाठी जागा योग्य भाड्याने देणे आहे. संपर्क - ९४२३३७७४२२/९१३०२८३६७५

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# जीव धोक्यात घालून बाप्पाला निरोप

## रस्ता गायब झाल्याने गणेशभक्तांचे हाल; मंजूर विसर्जन घाट दोन वर्षांपासून प्रलंबित

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

**माणगाव शहरातील आणि नगरपंचायत हद्दीतील मोर्बा मार्गाजवळील गोंद नदी पुलाखालील गणेश विसर्जन घाट दोन वर्षांपूर्वी मंजूर झाला आहे. परंतु, हा घाट न झाल्याने मोर्बा रोड आणि खांदाड आदिवासीवाडी येथील गणेशभक्तांना नदीजवळील पात्रात जाण्यासाठी आणि गणपती विसर्जन करताना तारेवरची कसरत करावी लागली.**



प्रसंगी जीव धोक्यात घालून धोकादायक खडकाळ आणि मातीच्या ढिगाऱ्यावरुन एकमेकांना धरून आणि सावरुन नदी पात्रात जावे लागत होते.

याच अडथळ्यातून वाट काढत खांदाड आदिवासी वाडीतील गणपती बाप्पांच्या मूर्ती जीवापाड जपत विसर्जन करताना धोका पत्करून जावे लागत होते. विसर्जन ठिकाणी कचऱ्याचे मोठ मोठे ढिगारे साचले होते. त्यामुळे दुर्गंधी येत होती. याबाबत वारंवार तक्रार करूनही कचऱ्याचे टोपली दाखवली आहे. तसेच साफसफाईदेखील केली नव्हती. दरवर्षी येथील सफाई केली जात होती. निदान यावर्षी गणेशोत्सवाच्या काळात तरी येथील स्वच्छता राखणे आवश्यक होते. परंतु, नगर पंचायतीकडून अक्षम्य दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे या भागातील नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे.

पूर्वी येथे बऱ्यापैकी पायवाट होती. मात्र, या पायवाटेवरच माती आणि कचऱ्याचे ढिगारे साचले असून, दुर्गंधी येत आहे. या ढिगाऱ्यांमुळे रस्ता अदृश्य झाला आहे. गणेशभक्तांनी झाडा झुडुपांमधून वाट काढत जीव धोक्यात घालून गणपती बाप्पांचे विसर्जन केले. तसेच नगरपंचायतीचे कर्मचारी नेहमीप्रमाणे हजर नव्हते. पोलीसही दिसले नाहीत. कोणतीही सुविधा केलेली नव्हती. जीव संरक्षक आणि पट्टीचे पोहणारे उपलब्ध नव्हते. निर्माल्य जमा करण्याची सोय करण्यात आली नव्हती. गोद नदीच्या दोन्ही बाजूचे पात्र दुथडी भरून वाहत होते. सुर्दैवाने कोणतीही दुर्दैवी घटना गणपती बाप्पांच्या कृपेने घडली नाही. लवकर हा घाट झाला नाही तर येथील गणेशभक्तांनी मोर्चा काढण्याचा इशारा दिला आहे.




# चाकरमान्यांची परतीच्या प्रवासाची लगबग

### तळा बसस्थानक प्रवाशांनी हाऊसफुल्ल

**। तळा । वार्ताहर ।**

आपल्या लाडक्या बाप्पाला भावपूर्ण निरोप दिल्यानंतर गणेशोत्सवासाठी गावाला आलेले चाकरमानी पुन्हा परतीच्या प्रवासाला लागले आहेत. यामुळे तळा बसस्थानकात प्रवाशांची गर्दी झाल्याचे चित्र पहायला मिळाली.

गणेशोत्सव काळात पाच दिवस गणरायाची मनोभावे पूजाअर्चा, आरती, भजन करून शेवटच्या दिवशी बाप्पाला भावपूर्ण वातावरणात निरोप देऊन पुढच्या वर्षी लवकर या असा आग्रह धरून चाकरमानी पुन्हा आपल्या परतीच्या प्रवासाला लागले आहेत. यासाठी तळा बसस्थानकात बसमध्ये आपली आरक्षित केलेली जागा शोधण्यासाठी प्रवाशांची लगबग पाहायला मिळाली. चाकरमानी प्रवाशांची गैरसोय होऊ नये यासाठी एसटी प्रशासनाकडून बसस्थानकातून एसटीची जादा वाहतूक व्यवस्था करण्यात आली होती.

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**१५ सप्टेंबर**

१) श्री.जयवत कृष्ण म्हात्रे आवास, दि.१५-९-१९४६
२)श्री.अशोक जयराम भेडकर ब्राम्हणआळी अलिबाग, दि.१५-९-१९४४
३)श्रीम.संगीता सुमत म्हात्रे थळ आगार, अलिबाग दि.१५-९-१९४८
४)श्री.श्रीकांत गोविंद वैद्य चोंढी, दि.१५-९-१९५४
५)श्री.अनिल मारूती गोळे पिंपळभाट अलिबाग, दि.१५-९-१९५६
६)श्री.मसणाजी नारायण पाटील चाळमळा, अलिबाग दि. १५-९-१९५५


## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद) - मुख्य संपादक, कृषीवल**


# वासुदेव म्हात्रे सेवानिवृत्त



**। भाकरवड । वार्ताहर ।**

अलिबाग तालुक्यातील ग्रामपंचायत श्रीगाव हद्दीतील भाकरवड गावचे रहिवासी वासुदेव श्रीधर म्हात्रे बी.एम.सी मेरीव्हेदर कुलाबा पंपिंग येथे कर्मचारी म्हणून सेवानिवृत्त झाले. त्यांनी आपल्या वयाच्या ३५ वर्षे सेवा केली

१७ ऑक्टोबर १९८९ रोजी त्यांची नियुक्ती बृहन्मुंबई महानगर पालिका येथे करण्यात आली होती. भाकरवड गावाशी नाळ जुळलेले वासुदेव म्हात्रे आपल्या लहान वयात वडिलांचे छत्र हरपल्यानंतर संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी पडल्याने त्यांनी मुंबईस नोकरीसाठी प्रयत्न केले आणि आपल्या गुणवत्तेवर बृहन्मुंबई येथे कामावर रुजू झाले. आपल्या प्रामाणिक सेवेत त्यांनी अधिकाऱ्यांची मने जिंकली. कधीही कामचुकारपणा केला नाही. दरम्यान, वासुदेव म्हात्रे यांचा सेवानिवृत्तीचा कार्यक्रम मोठ्या दिमाखात कुलाबा पंपिंग मुख्य शाखा वरळी येथे आयोजित करण्यात आला होता. यावेळी कार्यक्रमासाठी बी.एम.सी.चे वरिष्ठ कार्यकारी अभियंता मोहन बापट, दुय्यम अभियंता वाजीत पठाण, कर्मचारी परेश पाटील, समीर पाटील, प्रमोद मानकर, रामचंद्र पाटील, रामचंद्र कर्वे, विवेक म्हात्रे, रवींद्र म्हात्रे, उल्हास ठाकूर, मनोज म्हात्रे, दिनेश देवघरे आदी मान्यवर उपस्थित होते.

## वीजपुरवठा खंडित; गणेशभक्तांची नाराजी



**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मुरुड शहरात अचानक वीजपुरवठा खंडित झाल्याने रस्त्यावर पूर्णतः काळोख पडल्याने गणेशभक्तांनी नाराजी दर्शवली आहे. गौरी गणपती विसर्जनकरिता मुरुड शहरातील शेकडो गणपती विसर्जनाकरिता हातगाडीवरून निघत असतात. परंतु, संध्याकाळच्या दरम्यान वीजपुरवठा अचानक खंडित झाल्याने अनेक गणेशभक्तांची तारांबळ उडाली. गणेशभक्तांनी आपल्या गणपतीवर काळोख पडत असल्याने मोबाईलच्या टॉर्चवरुन, कोणी जनरेटर लावून गणपती बाप्पा विसर्जनासाठी समुद्रकिनारी आणण्यात आले.

# साडेचोवीस किलो गांजासह ब्रिझा कार जप्त

### पोलादपूर पोलिसांसह स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचा छापा

### पोलिसांची चाहूल लागताच ‘छोट्या’ पसार तर दुसरा अटकेत

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वरील पोलादपूर तालुक्यातील धामणदेवी गावाजवळील हॉटेल अन्नपूर्णा येथे पांढऱ्या रंगाच्या मारुती ब्रिजा कारमध्ये गांजा हा अंमली पदार्थ विक्रीसाठी आलेल्या तरूणास पोलादपूर पोलिसांसह स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या पोलिसांनी कारवाई केली. या कारवाईत ब्रिझा कारसह गाडीतील सुमारे साडेचोवीस किलो गांजा जप्त करण्यात आला. याप्रकरणी बुधवारी रात्री उशिरा साडेअकरा वाजता गुन्ह्याची नोंद पोलादपूर पोलीस ठाण्यात करण्यात आली असून, या छाप्यामुळे पोलादपूर तालुक्यात गांजा विक्री करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.



पोलादपूर तालुक्यातील धामणदिवी गावानजीक अन्नपूर्णा हॉटेलजवळ बुधवारी सायंकाळी सव्वासात वाजण्याच्या सुमारास पांढऱ्या रंगाची मारुती ब्रिझा कार (क्र. २४ बीएच १५९३) उभी होती. यावेळी नशाकारक अंमली पदार्थाची विक्री करण्यासाठी आलेला आरोपी विक्की विजय गोस्वामी उर्फ छोट्या (रा. शाहूनगर, पाचगणी, जि. सातारा) याने पोलिसांची चाहूल लागताच गाडीची चावी घेत हॉटेल परिसरातून पलायन केले. पोलिसांकडून गाडीची पाहणी करीत असताना या गाडीत २२ किलो ४३५ ग्रॅम वजनाचा सुमारे ७ लाख ३३ हजार ५० रुपये किमतीचा हिरवट रंगाचा गांजा हा अंमली पदार्थ निळसर पांढऱ्या रंगाच्या गोणीमध्ये आढळून आला. याप्रकरणी पोलिसांनी दोन आरोपींपैकी एका आरोपीला अटक केली. पोलिसांनी अंमली पदार्थासह ८ लाखाची कार असा एकूण १५ लाख ३३ हजार ५० किमतीचा मुद्देमाल जप्त केला.

स्थानिक गुन्हे अन्वेषण, अलिबाग-रायगडचे पोलीस कॉन्स्टेबल बाबासाहेब पिंगळे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार मंगेश मधुकर भिलारे (२७, रा. गुरेघर, ता. महाबळेश्वर,जि. सातारा) यास अटक करण्यात आली असून, दुसऱ्या आरोपीचा शोध सुरू आहे. याप्रकरणी पोलादपूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद केल्याप्रमाणे ही कारवाई करण्यात आली आहे. घटनास्थळी पोलादपूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अनिल जाधव यांनी भेट दिली. या कारवाईमध्ये पोलादपूर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक शिंदे यांच्यासह जितेंद्र चव्हाण, प्रतिक सावंत, अक्षय पाटील, स्वप्नील कदम, संग्राम बामणे, कृष्णा जागडे, चंद्रकला भुरके, नारायण दराडे आदी कर्मचारी तसेच स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलादपूर कर्मचारी सहभागी झाले होते.

# साप्ताहिक राशिभविष्य दि. १५ ते २१ सप्टेंबर २०२४

**ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग**
**मोबा.९४०४७९१७९८**

## जोडीदाराच्या सल्ल्याने वागा

**मेष :** या कालावधीत तुम्हाला भाग्याची पूर्ण साथ मिळेल आणि भाग्याच्या बळावर तुम्ही कुठल्याही स्पर्धा परीक्षेत यश मिळवू शकतात. प्रेमजीवनात यश मिळवण्यासाठी तुम्हाला आपल्या व्यवहारात विनम्रता आणण्याची आवश्यकता असेल. जर तुम्ही प्रत्येक गोष्टीला घेऊन राग करत असाल, तर तुमचा जिवलग यावेळी तुमच्यापासून दूर होऊ शकतो आणि वादाची स्थिती ब्रेकअपपर्यंत पोहोचू शकते. घरातील स्थितीला उत्तम बनवण्यासाठी तुम्हाला आपल्या जीवनसाथीची प्रत्येक गरजेच्या गोष्टीवर सल्ला घेतला पाहिजे. या राशीतील जे जातक कुठल्या लांब आजाराने चिंतीत आहे त्यांनी नियमितपणे आपले चेकअप डॉक्टरांकडून केले पाहिजे आणि नियमित औषधांचे सेवन केले पाहिजे. नियमित सूर्योदयाच्या वेळी श्री गणपतीचा जप करा. **महिलांना :** घरातील वातावरण आनंदी राहील. आपला जोडीदार आपल्यासोबत लांब प्रवास करण्याचा बेत करेल, नवीन किमती वस्तूची खरेदी करण्याचा बेत तडीस जाईल, खाण्यापिण्याबाबत मात्र आपण सजग राहावे, नाहीतर त्रास होऊ शकतो. **शुभ दिनांक** : १६,१७.

## मेहनतीला यश मिळेल

**वृषभ :** या राशीतील विवाहित जातकाचे जीवनसाथी या कालावधीत एक मित्रासारखे त्यांच्याशी व्यवहार करू शकतात. या राशीतील जातकांना या वेळेत खांदेदुखीची समस्या होऊ शकते. याचे कारण खूप जास्त वेळ काम करणे असू शकते. तुम्हाला आपल्या कामामध्ये काही वेळ काढून आराम नक्कीच केला पाहिजे. नियमित सूर्योदयाच्या वेळी ‘ओम नमः नारायण’चा १०८ वेळा जप करा. जगामध्ये आपली वेगळी ओळख बनवण्यासाठी या आठवड्यात तुम्ही कठीण मेहनत कराल. जर तुम्ही आपली मेहनत कायम ठेवली, तर तुम्हाला यश मिळवण्यात कुणी थांबवू शकणार नाही. यावेळी कुणाला उधार देणे टाळले पाहिजे. कारण, आता तुमच्या कुटुंबातील खर्च वाढतील म्हणून, तुम्ही आपल्या कुणी जवळच्या नातेवाईकांकडून उधार मागू शकतात. तथापि, तुम्हाला हाच सल्ला आहे, उधार माघू नका आणि आपल्या गरजांवर प्रतिबंध आणा. **महिलांना :** या महिन्यात तुमच्या वडिलांचे मन कुठल्यातरी गोष्टीला घेऊन चिंतीत होऊ शकते. अश्या वेळेत तुम्हाला आपल्या वडिलांसोबत वेळ व्यतीत केला पाहिजे. **शुभ दिनांक** :१५,१६.

## विद्यार्थ्यांना प्रतिकूल काळ

**मिथुन :** या राशीतील जातकांच्या डोक्यात या सप्ताहात टीव्ही, मोबाईल, मित्र सोडून इतर जीवनाची सार्थकता, जीवनात कशी चांगल्या प्रकारे व्यतीत करू शकतो या प्रकारे विचार येऊ शकतात. आपल्या करिअरला उज्वल बनवण्यासाठी लागोपाठ आपली योग्यता पाहात राहणे खूप गरजेचे आहे. हा कालावधीत तुम्ही ही या गोष्टीला उत्तम रित्या समजू शकतात. हे आयोजन तुम्हाला समाजात सन्मान देईल. या राशीतील विद्यार्थ्यांसाठी हा कालावधी थोडा प्रतिकूल राहू शकतो. यावेळी तुम्हाला शिक्षणाच्या क्षेत्रात चांगले फळ मिळण्यासाठी कठीण मेहनत करण्याची आवश्यकता आहे. वाईट संगतीपासून या कालावधीत दूर राहा आणि जितके शक्य असेल एकांतात राहून अभ्यास करा.

**महिलांना :** या कालावधीत धार्मिक कार्यात तुमचा खर्च होऊ शकतो. तथापि, यामुळे तुम्हाला जास्त फरक पडणार नाही तर, यामुळे तुम्हाला मानसिक शांती मिळेल. त्याचप्रमाणे तुम्ही आपल्या नातेवाईकांसोबत मिळून कुठल्या तरी धार्मिक स्थळी सहल आयोजन करू शकतात. जोडीदाराची साथ मिळेल. **शुभ दिनांक** : १७,१८.

## आर्थिक उन्नती होईल

**कर्क :** जातकांच्या आर्थिकबाबतीत नजर टाकली असता यात आता सुधारणा होण्याची पूर्ण शक्यता आहे. जर तुम्ही कुणाला उधारी दिलेली असेल, तर या कालावधीत तुम्हाला तुमची उधारी परत मिळू शकते. त्यासाठी प्रयत्न करा. यामुळे तुमच्या आर्थिक स्थितीमध्ये सुधारणा होईल. कौटुंबिक जीवनात मोठ्या भाऊ-बहिणींचा पूर्ण सहयोग मिळेल. या कालावधीत तुम्हाला घरातील लहान सदस्यांना ही वेळ दिला पाहिजे आणि त्यांच्यासोबत खेळून आणि त्यांना वेळ देऊन जवळीकता वाढवली पाहिजे. तुमचे मार्गदर्शक या कालावधीत तुम्हाला शिक्षणाच्या क्षेत्रात बरीच मदत करू शकते. त्यांची मदत मिळवून तुम्ही मोठ्यातील मोठी समस्या शिक्षणाच्या क्षेत्रात खूप सहजरित्या सोडवू शकाल. आपला नावलौकिक होईल. या राशीतील जे जातक प्रेमसंबंधात पडलेले आहेत, ते या कालावधीत आपल्या प्रेमी किंवा प्रेमिकेला आपल्या घरच्यांसोबत भेट घेऊ शकतात. **महिलांना :** जे समोर दिसेल, ते खरे असेल असे नाही. आपली खात्री करण्यासाठी थोडा वेळ घ्या. नियमित सूर्योदयाच्या वेळी दुर्गापाठ वाचा, फायदा होईल. **शुभ दिनांक** : १९,२०.

## कौटुंबिक जीवन सुखदायी

**सिंह :** या लोकांसाठी हा आठवडा शुभ फलदायी राहण्याची पूर्ण अपेक्षा आहे. तुम्ही आपल्या करिअरमध्ये सकारात्मक परिवर्तन आणण्याचा प्रयत्न केला आहे, ज्याचे उत्तम फळ तुम्हाला या आठवढ्यात नक्कीच मिळेल. तुमच्या कार्यक्षेत्रात तुमची प्रगती होऊ शकते आणि यासोबतच तुमच्या कमाईमध्ये वाढ होण्याची पूर्ण संधी आहे. तुमच्या आर्थिक बाबीची गोष्ट केली तर, या दिवसात तुमचे दिवस लाभपूर्ण होण्याची शक्यता जास्त आहे. तुम्हाला बाहेरील स्रोतांनी अधिक लाभ होऊ शकतो. कौटुंबिक जीवनाची गोष्ट केली तर, हा आठवडा तुमच्यासाठी सुखद राहील. जर मोठ्या भाऊ बहिणींसोबत कुठल्या गोष्टीला घेऊन वाद चालत आहे तर, हा वाद या दिवसांत दूर होऊ शकतो. वृश्चिक राशीतील विद्यार्थी यावेळी शिक्षणाच्या क्षेत्रात अधिक चांगले प्रदर्शन करतील. **महिलांना :** हा आठवडा तुमच्यासाठी उत्तम सिद्ध होऊ शकतो. धनलाभ होण्याची शक्यता आहे. आरोग्य संबंधित गोष्ट केली असता या आठडव्यात तुम्हाला शरीराच्या उजव्या बाजूला दुखू शकते. **शुभ दिनांक** - १५,२१.

## विचारपूर्वक निर्णय घ्या

**कन्या :** या राशीतील जातक खूप एकांतप्रिय असतात आणि खूप विचार करणारे नसतात. कल्पनाशक्तीमुळे यांच्या जीवनात चांगल्या फळांची प्राप्ती होत असतेच; परंतु, बऱ्याच वेळा अत्याधिक विचार करण्यामुळे हे आपला मूल्यवान वेळ खराब करून बसतात. बऱ्याच वेळा तुमच्या चांगल्या कामाच्या कारणाने काही लोक तुमच्या कामाच्या ठिकाणी तुमचे शत्रू बनू शकतात आणि तुमच्या पाठीमागे कारस्थान रचू शकतात. म्हणून, आपल्या कार्यक्षेत्रात खूप विचार करून चालण्याचा सल्ला दिला जातो आहे. **महिलांना-** कौटुंबिक जीवनात या महिन्यात हालचाल होऊ शकते. जमिनीच्या वाटणीला घेऊन घरातील वरिष्ठ लोक आणि आपल्या भाऊ-बहिणींसोबत वाद होऊ शकतात. तुमच्यामुळे कुटुंबात तणावाची स्थिती बनू शकते. जर तुम्हाला वाटले की, या जमिनीची वाटणी गरजेची आहे, तर तुम्ही जो विचार करत आहात, तो तर्कसंगत आहे तर तुम्हाला शांती आणि शालीनतेने सर्वांसोबत बसून बोलणी केली पाहिजे. तुम्हाला तुमच्या प्रत्येक गोष्टीचे समाधान मिळेल. त्या निर्णयाचा आनंद घेऊ शकाल. **शुभ दिनांक** - १६,२०.

## आरोग्य उत्तम राहील

**तुळ :** राशीतील जातक आपल्या आरोग्याच्या प्रति बरेच गंभीर राहतात. या आठवड्यातील नक्षत्र पाहिल्यास तुमच्या आरोग्याची स्थिती खूप चांगली सांगितली जात नाही. या महिन्यात तुम्हाला कफ, सर्दी, खोकला या बाबत समस्या होऊ शकतात. आपले डोके शांत ठेवा घरातील अनुभवी व्यक्तीचा सल्ला उपयोगी पडू शकतो. या राशीतील विद्यार्थ्यांसाठी हा आठवडा खूप चांगला राहण्याची आहे, खेळ व अभ्यास यात संपूर्ण यश मिळेल. नवीन प्रवेशाची बातमी मिळू शकते. या आठवड्यात तुमचे वैवाहिक जीवन आणि प्रेम जीवन हे सामान्य राहिले तरी जोडीदारांकडून भेट मिळण्याची शक्यता राहील. या राशीतील विवाहित जातकांना या महिन्यात आपल्या जीवनसाथीच्या आरोग्याची विशेष काळजी घेण्याची आवश्यकता असेल.

**महिलांना :** जीवनसाथीची आरोग्य या महिन्यात खराब होऊ शकतात. जागरण, ताण या दोन्हीपासून लांब राहा. या कालावधीत तुमची आई, सासू तुमच्या कामाचे कौतुक करू शकते. वडिलांकडून लाभ मिळणार आहे. **शुभदिनांक** - १७,१९.

## नवीन नोकरीच्या संधी मिळतील

**वृश्चिक :** या राशीतील लोकांसाठी हा कालावधी शुभ फलदायी राहण्याची पूर्ण अपेक्षा आहे. या राशीतील विद्यार्थी या आठवड्यात शिक्षणाच्या क्षेत्रात अधिक चांगले प्रदर्शन करतील. प्रेमजीवनाची गोष्ट केली असता हा कालावधी तुमच्यासाठी उत्तम सिद्ध होऊ शकतो. नियमित सूर्योदयाच्या वेळी ‘ओ नमः शिवाय’चा १०८ वेळा जप करा. या राशीतील जातकांमध्ये उत्तम ऊर्जा आणि नेतृत्व क्षमता असते. आपल्या याच गुणांच्या कारणाने लोकांमध्ये सिंह राशीतील लोक वेगवेगळे दिसतात. या राशीतील त्या जातकांना या कालावधीत अधिक मेहनत करावी लागेल. विशेषतः ज्यांना अद्याप नोकरी लागलेली नाही. तुम्हाला या कालावधीत मित्र आणि टीव्ही तसेच मोबाइलपासून दूर राहावे लागेल, तरच तुम्हाला आपल्या मनासारखी नोकरी मिळू शकते. **महिलांना-** तुमची आरोग्य संबंधित गोष्ट केली असता यावेळी तुम्हाला शरीराच्या उजव्या भागात दुखू शकते म्हणजे उजव्या भागाच्या डोक्याची बाजू किंवा हात दुखण्याची शक्यता आहे. घरात पाहुणे येतील. त्यांच्या सरबराईत आपला वेळ जाईल. धनलाभही होणार आहे. **शुभदिनांक-** १६,२०.

## आर्थिक लाभ होतील

**धनु :** राशीतील विद्यार्थ्यांसाठी हा सप्ताह खूप चांगला राहण्याची शक्यता आहे. मात्र, इतर ग्रहस्थिती पाहिल्यास या आठवड्यात तुमच्या आरोग्याची स्थिती खूप चांगली सांगितली जात नाही. यावेळी तुम्हाला डोळे, डोके आणि कानामध्ये समस्या निर्माण होऊ शकतात. नियमित सूर्योदयाच्या वेळी प्राणायम करावा, फायदा होईल तसेच धनसंपत्तीसाठी श्री सूक्त पाठ करावा. तुम्ही आपल्या करिअरमध्ये सकारात्मक परिवर्तन आणण्याचा प्रयत्न केला आहे, ज्याचे उत्तम फळ तुम्हाला यावेळी नक्कीच मिळेल. आपल्या कामात तुमची प्रगती होऊ शकते आणि या सोबतच तुमच्या कमाईमध्ये जोरदार वाढ होण्याचे पूर्ण चांस आहे. मानाजोगटी बदली मिळू शकेल तुम्हाला मोठा आर्थिक लाभ होणार असल्याने आपण बचतीबाबत पाऊल उचलून भविष्याबाबत सुरक्षित राहू शकता. **महिलांना :** कौटुंबिक जीवनाची गोष्ट केली तर, हा महिना तुमच्यासाठी सुखद राहील. जर मोठ्या भाऊ-बहिणींसोबत कुठल्या गोष्टीला घेऊन वाद चालत आहे तर, हा वाद या कालावधीत दूर होऊ शकतो. त्या मार्गाने प्रयत्न करा, यश मिळेल. **शुभ दिनांक :** १७,१८.

## जोडीदाराची काळजी घ्या

**मकर :** हे राशीधारक खूप कल्पनाशील असतात आणि खूप विचार करणारे असतात. यांची कल्पनाशक्तीचे कारण यांच्या जीवनात चांगल्या फळांची प्राप्ती असतेच; परंतु, बऱ्याच वेळा अत्याधिक विचार करण्यामुळे हे आपली संधी घालवून बसू शकतात. या सप्ताहात जर तुम्ही शाळा किंवा कॉलेजमध्ये शिक्षण घेत असाल, तर यावेळी शाळा-कॉलेजच्या शिक्षणासोबत काही एक्स्ट्रा ॲक्टिव्हिटी शिकण्यात रुची घेऊ शकतात. या कालावधीत तोंडाच्या संबंधित काही समस्यांचा सामना करावा लागू शकतो. जर तुम्ही गुटखा, तंबाखू या पदार्थांचे सेवन करत असाल तर, तुम्हाला या समस्यांचा सामना करावा लागू शकतो. अशा गोष्टींपासून दूर राहणेच तुमच्यासाठी उत्तम असेल. नियमित सकाळी श्री शिवस्तोत्राचा जप करा. **महिलांना :** या कालावधीत तुमचे वैवाहिक जीवन आणि प्रेमजीवन सामान्य राहील. या राशीतील विवाहित जातकांना या महिन्यात आपल्या जीवनसाथीच्या आरोग्याची विशेष काळजी घेण्याची आवश्यकता असेल. कारण, जीवनसाथीचे आरोग्य या महिन्यात खराब होऊ शकते. **शुभदिनांक** -१९,२१.

## आरोग्याबाबत सतर्क राहा

**कुंभ :** या राशीतील विद्यार्थी यावेळी जास्त समंजस होऊ शकतात. म्हणजे, विद्यार्थ्यांना लक्षात येऊ शकते की, त्यांनी आपल्या आयुष्यातील किती किमती वेळ वाया घालवला आहे, परिणामतः या राशीतील विद्यार्थ्यांद्वारे उत्तम अभ्यास केला जाईल. आरोग्याबाबत तुम्हाला थोडे सतर्क राहण्याची आवश्यकता आहे. तुम्हाला डोळ्यांची तपासणी केली पाहिजे आणि नियमित सूर्योदयाच्या वेळी श्री सूर्यमंत्राचा जप करा. बऱ्याच वेळा तुमच्या चांगल्या कामाच्या कारणाने काही लोक तुमच्या कार्य क्षेत्रात तुमचे शत्रू बनू शकतात आणि तुमच्या पाठीमागे कारस्थान रचू शकतात म्हणून, कार्यक्षेत्रात खूप विचार करून चालण्याचा सल्ला दिला जातो. कौटुंबिक जीवनात या कालावधीत हालचाल होऊ शकते. **महिलांना :** जमिनीच्या वाटणीवरून तुम्ही घरातील वरिष्ठ लोक आणि आपल्या भाऊ-बहिणींसोबत वाद होऊ शकतात. तुमच्यामुळे कुटुंबात तणाव स्थिती बनू शकते. जर तुम्हाला वाटले की, या जमिनी वाटणी गरजेची आहे तर तुम्ही जो विचार करत आहे तो तर्कसंगत आहे तर, तुम्हाला शांती आणि शालीनतेने सर्वांसोबत बसून बोलणी केली पाहिजे. तुम्हाला तुमच्या प्रत्येक गोष्टीचे समाधान मिळेल. **शुभ दिनांक -१५,१७**

## व्यवसायात भरभराट होईल

**मीन :** सहनशीलता आणि धैर्य तुमचे गुण आहेत. आपल्या याच गुणांमुळे तुम्ही जीवनाच्या वेगवेगळ्या क्षेत्रामध्ये प्रगती करू शकतात. या कालावधीत तुम्हाला आपल्या याच गुणांना घेऊन पुढे जावे लागेल. यावेळी तुम्हाला तुमच्या कार्यक्षेत्रात चांगली फळं मिळतील. कारण, तुमच्या कामाला पाहून तुमच्या बॉसद्वारे तुमच्या कमाईमध्ये वाढ केली जाऊ शकते. तसेच, व्यावसायिकांचा व्यवसायही चांगला चालेल. तुम्हाला आर्थिक जीवनात चांगल्या फळांची प्राप्ती या कालावधीत मिळेल. जर तुम्ही खरेदी-विक्री व्यहारात असाल तर काही वस्तू विकून आपली आर्थिक स्थिती अधिक उत्तम बनवू शकणार आहात. कौटुंबिक जीवनात तुम्ही नेहमी सुख शांतीमध्ये राहण्याची कामना करतात. तुमची ही कामना ह्या यावेळी पूर्ण होऊ शकते. **महिलांना :** या कालावधीत घरातील लोकांमध्ये उत्तम सामंजस्य राहील, यासोबतच जीवनसाथीसोबत मिळून तुम्ही काही नवीन व्यवसाय यावेळी सुरु करू शकणार आहात. प्रेम आणि वैवाहिक जीवन यावेळी दोन्ही क्षेत्रात उत्तम फळ प्राप्त होतील. तथापि, तुम्हाला प्रेमाच्या नात्यामध्ये कुठल्याही प्रकारचा गैरसमज करणे टाळले पाहिजे नाहीतर नाते खराब होऊ शकते. **शुभदिनांक** -१६,१७.

# प्रति झाशीची राणी विरांगना .... झलकारीबाई कोरी (कोळी)

**''आकर रणमें ललकारी थी वो, झाशीकी झलकारी थी ।**
**गोरों से लडना सिखा गई, वह भारतकी ही नारी थी ।''**

प्रति झाशीची राणी झलकारीबाई कोरी 'कोळी' ही लढवय्यी विरांगना 'कोळी' समाजातील होती. १८५७ च्या स्वातंत्र्य युध्दात झलकारीबाई कोरीने महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे. विरांगना झलकारीबाई कोरी (कोळी)च्या प्रेरणादायक स्फूर्तिदायक इतिहासातून प्रेरणा घेण्यासाठी 'कोळी' समाजाने झलकारी बाई कोरीचा जन्मदिन, स्मृतिदिन साजरा करायला पाहिजे.

अठराव्या शतकात भारतात इंग्रजांच्या सत्तेचा जम बसत चालला होता. महाराष्ट्रातील मराठेशाही (पेशवाई) फक्त त्यांच्या ताब्यात यायची होती. ती आली की; भारतात साम्राज्य स्थापन करण्याचे इंग्रजांचे स्वप्न साकार होणार होते. १८१७ साली दुसऱ्या बाजीराव पेशव्यांचा पराभव करून इंग्रजांनी मराठेशाहीचा अंत केला. याच दरम्यान २२ नोव्हेंबर, १८३० ला उत्तर प्रदेशातील भेजल गावातील सदोबासिंग व जमुनाबाई या 'कोळी' दाम्पत्याच्या पोटी झलकारीचा जन्म झाला.

लहानपणापासूनच झलकारी अत्यंत हुशार व साहसी स्वभावाची होती. झलकारीच्या रोमारोमात साहस, धाडस ठासून भरलेले होते. एकदा लाकडे तोडण्यासाठी झलकारी जंगलात गेली होती, त्यावेळी तिच्यावर वाघाने हल्ला केला. झलकारीने वाघाला कुऱ्हाडीने मारले. असे अनेक पराक्रम झलकारीने लहान वयात केले होते.

झलकारी लहान असतानाच तिच्या आईचे निधन झालं. आईचे छत्र हरपलेल्या झलकारीला तिच्या वडिलांनी मुलासारखं सांभाळलं. लहान वयातच झलकारीला सदोबासिंग यांनी घोडेस्वारी करणे, तलवार चालविणे इत्यादी शस्त्रकला शिकवल्या. झलकारीने तारूण्यात पदार्पण केले तेव्हा तिच्यासारखाच तिला अनुरूप असा शूर व धाडसी, साहसी पती मिळावा यासाठी झलकारीचे वडील आजूबाजूच्या गावांमध्ये मुलांची चौकशी करीत. तेव्हा झाशीमधील नयापुरा येथील पुरणसिंह नावाच्या मुलाची माहिती त्यांना मिळाली.

नयापुरा येथील कोरी (कोळी) समाजातील पुरणसिंह हा तरूण अत्यंत साहसी व शूर होता. घोडेस्वारी करणे, दांडपट्टा, तलवार चालविणे, कुस्ती खेळणे, लाठीकाठी फिरवणे या युध्दकलेत त्याने प्राविण्य मिळवले होते. पुरणसिंहने दाखविलेल्या शौर्यावर खुष होऊन झाशीची राणी लक्ष्मीबाई (मणिकर्णिका तांबे) हिने पुरणसिंहला आपल्या सैन्यात दाखल करून घेतले होते. पुरणसिंहने झाशीच्या सैन्यातील तोफखान्यात काम करताना एक साहसी वीर म्हणून स्वत:चे स्थान निर्माण केले होते. पुरणसिंह आणि झलकारी या एकमेकांना अनुरूप असलेल्या विवाह इच्छुक जोडीचा दोन्ही घरातल्यांनी पुढाकार घेऊन थाटात विवाह केला. तारूण्यांत पदार्पण केलेली झलकारी ही सौभाग्यवती झलकारीबाई झाली. लग्नानंतर पुरणसिंह कोरीने झलकारीमधील उपजत साहसी गुणांना वाव देण्याचे ठरविले. झलकारीला शत्रूशी युद्ध करताना आक्रमण कसे करायचे, युद्धाचे डावपेच कसे आखायचे, गनिमिकाव्याने शत्रूवर हल्ला कसा करायचा इत्यादी युद्धशास्त्रातील बारकावे पुरणसिंहने शिकवले. थोड्या दिवसातच झलकारीबाईने युद्धशास्त्रातील कला आत्मसात केल्या. पुरणसिंह झाशीच्या राजवाड्यात होणाऱ्या कार्यक्रमांना, उत्सवांना झलकारी बाईला घेऊन जात असे. अशीच एकदा एका उत्सवानिमित्त झलकारीबाई राजवाड्यात गेली होती तेव्हा राणी लक्ष्मीबाईचे लक्ष झलकारीबाईंकडे गेले. झलकारीबाई दिसायला सुंदर होती आपल्याच रूपात झलकारीबाई उभी आहे असे राणीलक्ष्मी बाईला क्षणभर वाटले. दोघींमध्ये विलक्षण साम्य होते. झलकारीबाई राणीलक्ष्मीबाई सारखी अनुरूप होती. राणी लक्ष्मीबाईंची प्रतिरूप होती.

बुंदेलखंडांचा राजा छत्रसाल याने स्थापन केलेल्या बुंदेलखंड राज्याचा झाशीचे राज्य हा एक भाग होता. झाशीच्या राज्याचा राणी लक्ष्मीबाई कारभार सांभाळीत होती. राणी लक्ष्मीबाईचा विवाह गंगाधरराव नेवाळकर यांच्याशी झाला. विवाहानंतर नऊ वर्षांनी राणी लक्ष्मीबाईला मुलगा झाला. पण त्याचा लगेचच मृत्यू झाला. झाशीला वारस असावा यासाठी गंगाधररावांनी त्यांचे भाऊ आनंदराव यांचा पाच वर्षांचा मुलगा दामोदर याला दत्तक घेतले. त्यानंतर गंगाधररावांचा २१ नोव्हेंबर, १८५३ रोजी अकाली मृत्यू झाला.

ईस्ट इंडिया कंपनीचा गव्हर्नर लॉर्ड डलहौसीने ७ मार्च, १८५४ रोजी झाशीचे राज्य खालसा केले व इंग्रज मेजर एलियनने झाशीच्या शाही खजिन्याला टाळे लावले. झाशीवर अशी संकटांची मालिका सुरू होती.

इंग्रज राणी लक्ष्मीबाईला इंग्रजांचे मांडलीक असल्यासारखी अपमानास्पद वागणूक देवू लागले. राणी लक्ष्मीबाईंच्या होणाऱ्या अपमानाबद्दल झाशीतील सर्वसामान्य जनतेमध्ये इंग्रजांविरूद्ध असंतोष निर्माण झाला होता. या परिस्थितीचा फायदा उठवत राणी लक्ष्मीबाई इंग्रजांची सत्ता उलथवून टाकण्यासाठी प्रयत्न करीत होती. इंग्रजांशी युद्ध करण्यासाठी राणी लक्ष्मीबाईने आपल्या सैन्यात झाशीमधील महिलांना सामील करून घेतले. महिलांच्या खास 'दुर्गदलाची' निर्मिती केली. या महिला दलात कोरी (कोळी), चर्मकार, मेहेतर इत्यादी जातीतील महिला सामील झाल्या होत्या. राणी लक्ष्मीबाईने साहसी, पराक्रमी झलकारीबाईला महिला सैनिक दलाची सेनापती केले. झलकारीबाई साहसी, शूर व पराक्रमी होती. ती बंदूक चालवायलाही शिकली. झलकारीबाई कसलेली योद्धा झाली.

१८५७ साली इंग्रजांविरूद्ध झालेल्या रणसंग्रामाचे साद झाशीपर्यंत पोहोचले. २३-३१ मार्च, १८५७ रोजी झाशीत इंग्रजसेना आणि झाशीच्या सैन्यात भडका उडाला. इंग्रज जनरल हयू रोज याच्या नेर्तृत्वाखाली

**सुधाकर लाड**



इंग्रजांच्या गोऱ्या सैन्याने झाशीवर आक्रमण केले. राणी लक्ष्मीबाई झाशीच्या किल्ल्यात चार हजार बुंदेला सैनिक, चारशे घोडे आणि तीनशे तोफांसह दबा धरून बसली होती. 'मेरी झाशी नही दुँगी।' असा निश्चिय करून झाशीचे रक्षण करण्यासाठी राणीलक्ष्मीबाई, पुरणसिंह कोरी, झलकारीबाई कोरी, बक्षी कोरी इत्यादी शूरवीरांनी, रणरागिणींनी एकत्र येवून इंग्रज सैनिकांच्या तुकडीवर जोरदार हल्ला केला. या हल्ल्याने झाशीतील इंग्रज सेनेला पळून जाणे भाग पडले. राणी लक्ष्मीबाईंचा विजय झाला. इंग्रज सेनेचा झाशीच्या पराक्रमी सेनेपुढे टिकाव लागला नाही. या पराभवानंतर इंग्रजांनी आपली रणनीती बदलली. इंग्रजांनी झाशीच्या सैन्यातील काही सैनिकांना भरपुर लाच देवून फोडले. या गद्दारांना हाताशी धरून इंग्रजांनी किल्ल्याच्या कम कुवत भागातील बुरूजावर तोफांचा भडीमार करून किल्ल्याला भगदाड पाडले आणि किल्ल्याच्या आत घुसण्याचा प्रयत्न सुरू केला. किल्ल्याच्या उत्तर दिशेच्या दरवाजातून इंग्रज सेनेला घुसायचे होते, परंतु झलकारीबाईच्या दुर्गदलातील महिला वीरांगना जिवाची बाजी लावून एक-एक करीत इंग्रज सैनिकांना टिपून मारीत होत्या. चिवट इंग्रज सैनिक पुन्हा-पुन्हा एकत्र येवून नव्या जोमाने झाशीच्या किल्ल्यावर हल्ला चढवित आणि किल्ल्याच्या आत घुसण्याचा प्रयत्न करीत इंग्रजांना बाहेरून भरपुर रसद मिळत होती. त्यामुळे अखेर इंग्रजांचे गोरे सैन्य झाशीच्या किल्ल्यात शिरले. इंग्रजांचे सैन्य आणि झाशीच्या सैनिकांत एकच रणधुमाळी सुरू झाली. युद्धात आपली पिछेहाट होत असल्याचे पाहून युद्धाच्या या संकटातून मार्ग काढण्यासाठी झाशीच्या दरबारातील सल्लागारांनी राणी लक्ष्मीबाईला आणि दामोदरला किल्ल्यातून गुप्त दरवाजाने सुखरूप बाहेर काढण्यासाठी राणी लक्ष्मीबाईंच्या जागी राणी लक्ष्मीबाईच्या वेषात राणी लक्ष्मीबाईंची प्रतिरूप असलेल्या झलकारीबाईला लढाईत लढत ठेवायचे त्यामुळे राणी लक्ष्मीबाई आपल्या बरोबर लढाईत सामिल झालेली आहे असे झाशीच्या सैनिकांना वाटेल. ४ एप्रिल, १८५७ रोजी राणी लक्ष्मीबाई लहान दामोदरला पाठीवर बांधून 'बादल' नावाच्या घोड्यावरून काही निवडक शूर सैनिकांना बरोबर घेवून गुप्त मार्गाने झाशीच्या किल्ल्यातून बाहेर आली. याचवेळी सेनापती तात्या टोपे राणी लक्ष्मीबाईला मदत करण्यासाठी आपल्या सैन्यासह झाशीत दाखल झाले. परंतु जनरल ह्यू रोजच्या सैन्यापुढे त्यांचा निभाव लागला नाही. राणी लक्ष्मीबाईंची राजवस्त्रे अंगावर घालून राणी लक्ष्मीबाईंच्या वेषातील झलकारीबाई (कोळी) राणी लक्ष्मी बाईंशी असलेल्या साधर्म्याचा फायदा घेत स्वत: राणी लक्ष्मीबाई असल्याचे भासवत इंग्रज सैन्याशी शौर्याने लढत राहिली. इंग्रज सेनापती ह्यू रोजला वाटले; राणी लक्ष्मीबाईबरोबर आपली लढाई सुरू आहे. याचवेळी इंग्रजांनी केलेल्या गोळीबारात पुरणसिंह कोरी याच्या छातीत गोळी घुसली आणि पुरणसिंह धारातीर्थी पडला. झलकारीबाईंने आपला पती धारातीर्थी पडल्याचे पाहिले पण मोठ्या हिमतीने आपले आश्रु पुसत रणचंडीकेच्या आवेशात त्वेषाने इंग्रज सैन्यावर तिने हल्ला केला. झलकारीबाईला इंग्रज राणी लक्ष्मी बाईचे समजत होते. झलकारीबाईला जेरीस आणण्यासाठी इंग्रज सैन्याने झलकारीबाईला चारीबाजुने घेरले. एकाकी इंग्रज सैनिकांशी लढणाऱ्या झलकारीबाईला कैद करण्यात इंग्रज सैन्याला यश आले. राणी लक्ष्मी बाईने झलकारीबाईवर सोपवलेली जबाबदारी पार पाडली होती.तोपर्यंत राणी लक्ष्मीबाई सुरक्षीत ठिकाणी पोहचली होती. इंग्रज सैनिकांनी साखळदंडांनी जखडलेल्या झलकारीबाईला इंग्रज जनरल ह्यू रोज समोर नेले तेव्हा झलकारीबाईची शहानिशा करण्यासाठी राणी लक्ष्मीबाईंशी विश्वासघात करून इंग्रजांना झाशीच्या किल्ल्याची गुप्त माहिती देणाऱ्या दुल्हा-जूला बोलावण्याचा हुकूम दिला गेला. दुल्हा-जू घाबरत-घाबरत झलकारीबाईसमोर आला तेव्हा तो आश्चर्यचकित झाला. कारण इंग्रजांनी राणी लक्ष्मीबाई समजून साखळदंडांनी बांधून कैद केलेली राणी लक्ष्मीबाई नव्हती तर झलकारीबाई कोरी (कोळी) होती. इंग्रज फसल्याचे पाहून झाशीची राणी लक्ष्मीबाईने दाखविलेल्या विश्वासाला आपण पात्र झाल्याचे समाधान झलकारीबाईला झाले.

झलकारीबाईला एका कोठडीत साखळदंडांने बांधून ठेवण्यात आले होते. या कोठडीच्या सभोवती बंदुकधारी सैनिकांचा खडा पहारा ठेवण्यात आला होता. जनरल ह्यू रोज झलकारीबाईला पाहण्यासाठी कोठडीत आला तेव्हा झलकारीबाईला साखळदंडातून मुक्त करण्यात आले. पण तिच्या सभोवती उभ्या असलेल्या इंग्रज सैनिकांनी तिच्यावर बंदुका रोखल्या होत्या. साखळदंडातून मुक्त होताच झलकारीबाईने डोळ्याचे पाते लवते न लवते तोच हवेत झेपावत एका गोऱ्या सैनिकाच्या हातातील बंदूक त्वेषाने हिसकावून घेतली आणि त्याच बंदूकीने त्याला गोळी झाडून ठार केले. त्याक्षणी जनरल ह्यू रोजने झलकारीबाईंवर गोळ्या झाडण्याचा हुकूम दिला. गोऱ्या इंग्रज सैनिकांनी झलकारीबाईवर बेछुट गोळ्या झाडल्या. या गोळीबारामुळे वीरांगना झलकारीबाई कोरी (कोळी) धारातीर्थी पडली तो दिवस होता वैशाख शुद्ध १३ भिमप्रदोष ४ एप्रिल १८५८ चा झाशीची राणी लक्ष्मीबाई (मणिकर्णिका तांबे) साठी स्वत:चे बलिदान देणाऱ्या 'कोळी' वीरांगना झलकारीबाई कोरीच्या प्रामाणिकपणाची, एकनिष्ठतेची, वीरगतीची रक्तरंजित गाथा झाशीच्या इतिहासात सुवर्णाक्षरात लिहिली गेली. झाशीच्या राणी लक्ष्मीबाईंचे प्रतिरूप असलेल्या वीरांगना झलकारीबाई कोरी (कोळी) च्या पराक्रमाची, अतुलनीय शौर्याची दखल अनेक लेखकांनी, कवींनी घेतली आहे. कवी मैथलीश गुप्ता यांनी झलकारीबाईंचा गौरव करताना लिहिलं आहे :

**''आकर रणमें ललकारी थी वो,**
**झाशीकी झलकारी थी ।**
**गोरोंको लडना सिखागई,**
**रानी बनगई जोहर दिखा गई ।**
**है इतिहासमें झलक गई वो,**
**भारत की ही नारी थी।''**

**

# 'गणेश चतुर्थी आणि अण्णांचे भजनप्रेम...'

**धनंजय शेट्ये**

कोकणातला गणेशोत्सव म्हणजे संपूर्ण घरालाच जणू मंदीराचे स्वरुप प्राप्त झालेले असते. पाणंदीतून पायवाटेने फिरताना सगळीकडे सुवासिक धूप, अगरबत्तीचा सुगंध घराघरातुन दरवळत असतो. सारा आसमंतच जणूमंगलमय, भक्तीमय बनलेला असतो. अजित कडकडे, प्रल्हाद शिंदे यांची अजरामर गाणी लाऊडस्पिकरच्या आवाजात आसमंताला मंत्रमुग्ध करीत असतात. चाकरमानी गणेशोत्सवानिमित्त गावी आलेले असतात. तोंडाला कुलूप लावून एरवी वर्षभर बंद असलेले घर घरमालकाच्या आगमनाने, वास्तव्याने कमालीचे आनंदुन गेलेले असते. घरची म्हातारी माणसं सुना-नातवंडांच्या, मुलांच्या आगमनाने आनंदात असतात. संध्याकाळी टाळमृदुंगांचा आवाज प्रसन्न वातावरणात दुमदुमत असतो.

चतुर्थी दिवशी संध्याकाळी श्रीगणेशाच्या सामूहिक आरतीची जबाबदारी वाडीतल्या सदस्यांची असते. प्रत्येक घरातून कोण ना कोण तरी एकजण आरतीसाठी बाहेर पडतोच. पावसाळा असल्यामुळे पावसाची रिपरिप आणि पाणंदीच्या रस्त्यातला चिखल ह्या सगळ्या गोष्टींचा सामना करीत प्रत्येक कोकणवासीय अतिशय आनंदाने आरतीसाठी, भजनासाठी बाहेर पडलेला असतो. वर्षातून एकदा हा अवर्णनीय आनंद अनुभवण्यासाठी कोकणी चाकरमानी येत असतात. त्यामुळे आरतीला जाण्याची मजा काय औरच असते. पहिल्या दिवशी वाडीवाडीत आरती जाणाऱ्यांना काजू मोदक, तर काही चिंगमासारखे दाताला चिकटणारे मोदक, लाडू, फुटाणे, कापलेली काकडी (तवसा), साखर लावलेला चिबूड असा प्रसाद दिला जातो.

'आज कोणाकडे भजन आसा रे इलशा?'

अण्णांनी आरतीला आलेल्यांना विचारले.

''अण्णानू मांडार आसतला आणि भिरकलकाराचो गणपती जाताहा दीड दिसान .... त्याच्याकडे आसतला''

इलशाने आपल्याजवळील माहीत असलेली माहिती सांगितली.

''आमच्याकडे आज भजन आसा सा वाटता अण्णानू....आमचो आबलो पाव हाडुक इरणीच्या बाजारात गेलो हा''

मधेच प्रसाद शेंडगे बोलला.

''म्हणजे ऊसळ पाव आसा मारे.... पयल्याच दिसा...जोर मारलास गड्यानु....रात्री अंशीन सरसरावन येवक होया तर''

अण्णा धावडेंचा सुरकुत्या पडलेलो चेहरा आनंदाने उजळून निघाला. अण्णा धावडेनी वयाची अंशी गाठलेली होती. पण गणेशोत्सवात तन, मन हरपून भक्तीभावाने आरती, भजनात सहभागी होतात. अण्णा धावडेचा सर्व परिवार मुंबईला असतो. अण्णा धावडेंचे दोन्ही मुलगे काहीतरी कारण दाखवून गणपतीला गावी यायचे टाळतात. पण अण्णा मात्र अगदी अकरा दिवस मनोभावे गणपतीची सेवा चाकरी, पूजाअर्चा करतात. रात्री वाडीतल्या भजन मंडळासोबत अगदी सगळी भजन संपेपर्यंत जागे असतात. सकाळी गुरेढोरे चारुन आणतात. दुपारी यथासांग गणेशपुजन करतात. त्यांची कारभारीन (बायको) गेली पाच वर्षे दुर्धर अशा आजाराने हथरुणाला खिळलेली आहे. तीची सेवाशुश्रुषा अण्णांनाच करावी लागते. अगदी सगळेच जाग्यावर. जेवणं सुद्धा अण्णांनाच बनवावे लागते. घरात इनमीन दोनच माणसे. पण गणपतीत घराला सजावट रंगरंगोटी अतिशय कौशल्यपूर्ण करतात. दोन्ही मुले चांगल्या गलेलठ्ठ पगाराच्या नोकरीवर असूनही बापाला काडीचीही मदत करीत नाहीत. नाना तसे स्वाभिमानी गृहस्थ.

''आज मगे माज्याकडेव भजन करुक सांगतय. मी पण उसळपावचं करतंय. पाव हाडुक पांडग्याक पाव हाडुक सांगतंय.''

''अण्णानु एकटे तुमी काय काय परकार करतलास....तुमका कोण काय बोलाचो नाय.... कडक बुंदीचे लाडु देवनं मोकळच व्हायचा...नुसती नाटका खेका करतास ती''

मध्येच इनगो पळसकर बोलला. आता अण्णांना इनग्याचा राग आला होता. ते चढ्या स्वरात बोलले,

''ह्या बघ इनग्या तु माका शिकव नुको. भजनाक काय देवक होया नी काय नुको ता? कडक बुंदीचे लाडु वाटले तर सकाळी परत चटयबुडी सगळे गावतत... कर्तो करवितो देव आसा ... देणारो पण तोच आणि ओढुन घेणारो पण तोच आसा..मग मीया काटकसर करुन काय मिळवतलंय? तुका काय समजाचा नाय ता''

''अण्णानू चांदणा कसा भारी पडला हा ना?''

गणपत सावंत आकाशाकडे बघुन बोलत होतो. त्याने नकळत चंद्रदर्शन घेतले होते. खरतर श्री गणेश चतुर्थीच्या रात्री चंद्रदर्शन त्याज्य असते. पण गणप्याने आज चुकून अनवधानाने चंद्र बघितला होता.

''शिरा पडांदेत ती तुज्या त्वांडार. मेल्या जा करु न्हीये ताच केलंस, वरती खेका बगलंस?''

''मगे अण्णानू आता काय व्हतला??''

''काय व्हतला? गणपती रागावतलो. फटकेक गावलस तो आता तुका असा काय तरी करुक होया जेणेकरून तुका कोणीतरी अगदी ठेवणीतले गाळी (शिव्या) घालुक होयो''

''कित्याक हो अण्णानु?''

''तेची बाबा लय मोठी गोष्ट आसा....एकदा गणपती आपल्या वाहनार बसान फिराक भायर पडलो हुतो.... गुलामा मगे काय झाला म्हायत हा तुका?''

''आयेच्यान नाय.... अण्णानु मिया थयतर तेव्वा नाय हुतय''

''अरे गुलामा, मी सांगतय ता आयक. ओत म्हतल्यार ओतायचा लोमता काय? असा इचारायचा नाय. समादला. तर गणपती हुंदरार (उंदीर) बसान भायर फिराक गेलेलो गणतीचा वजन ह्या बापारा!! आणि हुंदीर तर ल्हान. खाली घसारलो मारे!! ढोपरा खराडली आता वरसून ता बगुन गुलामा चंद्र खदाखदा हसाक लागलो ...गणपतीक ईलो राग..तेना चंद्राक शाप दिल्यान....मी लोकांच्या घरात येतलंय त्या दिसा तुजा त्वांडा कोणीदुकुल बगायचा नाय...आणि जो कोण बगीत तेका पाप लागतला''

''मगे अण्णानू मिया आता काय करू...?''

''काय घाबरा नुको फकस्त तुका कोणीतरी गाळी घालुक होये असा काय तरी कर...म्हणजे झाला.''

''म्हणजे नेमक्या काय करु??''

''गुलामा, कुणाच्यातरी परड्यातली तवशी चोरून हाड, परड्यातलो माटव मोडुन टाक... कुणाचा तरी मडक्या फोड नाय तर कोणाच्यातरी खळयात जावून घाण करुन ये.''

अण्णानी गणपतीत घरी बरीच भजनं बोलवली होती. भजन संस्कृतीशी नानाची नाळ जोडलली होती. सकाळपर्यंत भजनात अण्णा दंग असायचे. एकटे असुन ई भजनमंडळीसाठी अनेक पदार्थ बनवून यथासांग आदरातिथ्य करायचे. भजनमंडळीसाठी अण्णाजवळचे भजन म्हणजे अवर्णनीय उत्साह असायचा.

# तुका आकाशा एवढा!



**जावे संतांच्या गावा!**

**अनुराधा म्हात्रे**

**तुकाराम महाराजः भाग चौथा**

**एक धरिला चित्तीं।**
**आम्ही रखुमाईचा पती।।**

'रखुमाईचा पती' मनोभावे आळवीत तुकाराम महाराजांचा जीवनक्रम चालू होता. त्यांच्या व्यक्तिमत्त्वांत भक्ती, ज्ञान, वैराग्य याचे प्रखर तेज दिसू लागले त्यामुळे हळूहळू गावातल्या लोकांवर त्यांचा प्रभाव पडला. धाकटा भाऊ कान्होबा, गंगाधर मवाळ कडूसकर, संतोबा तेली, जगनाडे चाकणकर, नावजी माळी, कोंडभट पुराणिक असे बहुविध जातीचे लोक त्यांचे भक्त झाले. देवाला आळविण्यासाठी त्यांनी भक्तीभावे कीर्तने केली.

**एक एक अक्षरांत।**
**आहे माझ्या रमाकांत।**

हे त्यांच्या कीर्तनाचे ब्रीद होते. त्यांच्या कीर्तनामध्ये पुन्हा पुन्हा भवसागरात गोते खाणाऱ्या दुःखी जीवांविषयी पराकोटीची तळमळ होती. सुलभ भाषेत ते त्यांना परमार्थाचा मार्ग दाखवत होते.

**जे का रंजले गांजले।**
**त्यांसि म्हणे जो आपुले।।**
**तोचि साधु वोळखावा।**
**देव तेथेंचि जाणावा।।**

स्वतः तुकाराम बुवांनी सांगितलेली ही साधुत्वाची लक्षणे आणि देवत्वाची खूण त्यांच्या आचरणात दिसून येत होती त्यामुळे त्यांची कीर्ती हळूहळू सर्वत्र पसरायला लागली होती. धर्मपरायण, धर्मनिष्ठ राजा, छत्रपती शिवाजी महाराज यांच्यापर्यंत तुकोबांची थोरवी पोहोचली. या थोर संतांचा सन्मान करावा असे वाटून त्यांनी अतिशय प्रेमाने आणि आदराने बुवांना नजराणा पाठवला. सोने-चांदी, मोहरा, वस्त्रे इत्यादी नाना वस्तूंचा तो नजराणा होता. महाराजांचे शिलेदार तुकोबांची चौकशी करत गावात आलेले पाहून, लोकांनी त्यांच्या घराभोवती गर्दी केली. नामस्मरणांत दंग होऊन मंदिरांत बसलेल्या बुवांच्या कानावर ही गोष्ट गेली. ते लगबगीने घरी आले. सैनिकांनी सर्व नजराणा जिजाबाईंच्या हवाली केला होता. त्या हरखून गेल्या. तुकारामबुवांना मात्र हे धर्मसंकट वाटले. त्यांना प्रश्न पडला की, पांडुरंग आपल्याला या धनाच्या मोहात का गुंतवतोय? त्यांनी शिलेदारांना हात जोडून नमस्कार केला आणि सांगितले, 'महाराजांना माझा दंडवत सांगा परंतु हा नजराणा मी स्वीकारू शकत नाही. कृपा करून तुम्ही हा नजराणा परत घेऊन जा'. महाराजांच्या सेवेकरांना फारच आश्चर्य वाटले. इतका विरक्त पुरुष त्यांनी क्वचितच पाहिला असेल!

तुकाराम बुवांचे ही विरक्ती म्हणजे सर्वसामान्य माणसांना आश्चर्याने तोंडात बोट घालायला लावणारी आहे. ज्याची परिस्थिती सधन आहे, असा माणूस संपत्ती नाकारू शकतो पण बुवांच्या घरात अठराविश्व दारिद्र्य असताना त्यांनी हा नजराणा परत पाठवला. हा त्यांचा थोरपणा मोजायला आकाशाची फुटपट्टी ही पुरी पडणार नाही. अंगी कडकडीत वैराग्य असल्याशिवाय व ईश्वराशिवाय इतर कोणतीही गोष्ट नको; असा दृढनिश्चय असल्याशिवाय हे साध्य होणार नाही. आपल्यासारखी सामान्य माणसे धनधान्य, कीर्ती, पुत्रपौत्र अशा गोष्टी मिळवण्यासाठी परमेश्वराचा धावा करतात, तर तुकाराम बुवा म्हणतात,

**'तुका म्हणे देवा।**
**माझे सोडवणें धांवा।।''**

पांडुरंगाला कळवळून सांगतात मला या मोहात अडकवू नकोस रे! यांतून मला सोडविण्यासाठी धांव! अशी ही संतांच्या घरची उलटी तऱ्हा असते.

तुकाराम बुवांच्या वैराग्याची साक्ष देणाऱ्या घटना आपण यापूर्वी पाहिल्या आहेतच. दुष्काळांमध्ये त्यांनी घरातले धान्य गोरगरीब लोकांना वाटून टाकले. त्यावेळी त्यांचे वय अवघे वीस-पंचवीस वर्षाचे होते. त्या जवान वयात पोटात जठराग्नी पेटलेला असताना सुद्धा, त्यांनी गोरगरीब लोकांच्या पोटाची काळजी केली. तीच कथा कर्जाचे कागद नदीत बुडवण्याची! आपल्या हाती उदरनिर्वाहाचे पक्के साधन नसताना, ज्यांतून थोडीफार धनप्राप्ती होण्याची आशा आहे, अशा कर्जाच्या वह्या त्या भयंकर दुष्काळी परिस्थितीत नदीत बुडवणे ही सोपी गोष्ट नाही. तुकाराम बुवांच्या वैराग्याने इतके अत्युच्च शिखर गाठले होते की, देवाकडे सुद्धा ते काही मागत नाहीत. ते म्हणतात,

**' आम्ही मागों ऐसें नाही तुजपाशीं।**
**जरी तूं भीतोसी पांडुरंगा।।**
**पाहे विचारूनि आहे तुज ठावें।**
**आम्ही धालों नांवे तुझ्या एका।।**

पांडुरंगा तू घाबरू नकोस, तुझ्याकडे मी काहीच मागत नाही. मी फक्त तुझ्या नावासाठी तुझ्याकडे धावत आलोय; हे तुलाही ठाऊक असायला हवे! पुढे एका ठिकाणी त्यांनी विठ्ठलाला परखडपणे बजावले आहे, '**तुझी न लगे दसोडी। परी आहे आवडी दर्शनाची।।**

विठ्ठलाचे नाव आणि विठ्ठलाचे दर्शन हाच त्यांचा ध्यास होता. कोणती इच्छा मनी न धरता केवळ देवासाठी देव हवा ही वृत्ती फक्त संतानाच जमते! आपल्यासारखी सामान्य माणसे त्यापासून फार फार दूर असतात. तुकाराम बुवांची साधना, भक्ती जशीजशी वाढू लागली तसेतसे त्यांच्या वृत्तीचे तेज सर्वत्र फांकू लागले. त्यांची कीर्ती हळूहळू सगळीकडे पसरू लागली. पुण्यापासून जवळच असणाऱ्या लोहगाव मध्ये महाराजांची किर्तने होत असत, छत्रपती शिवाजी राजे कधीकधी या कीर्तनाला हजेरी लावत. बुवांच्या व्यक्तिमत्त्वाने शिवाजी राजे फार प्रभावीत झाले होते. कीर्तनाला आलेल्या शिवाजी महाराजांना एकदा यावनी सेनेने घेरले होते. तुकारामबुवांनी पांडुरंगाचा धावा करून त्या प्रसंगातून त्यांची सुटका केली; अशी आख्यायिका सांगितली जाते. ही आख्यायिका असली तरी एक मात्र नक्कीच सत्य आहे की, छत्रपतींना तुकाराम बुवांबद्दल अतिशय आदर व भक्ती होती तर बुवांना राजांबद्दल प्रेम आणि कौतुक होते. विठ्ठल भक्तीत रंगलेला एक परमयोगी आणि धर्मरक्षणांत गुंतलेला कर्मयोगी! यांचे ते मनोमिलन होते, अर्थातच पवित्र आणि उदात्त!



एखाद्या माणसाची कीर्ती वाढू लागते तसे त्याचे शत्रूही वाढतात. तुकाराम महाराजांच्या वाट्याला तर हे नष्टचर्य फारच मोठ्या प्रमाणात आले. देहू गावांतील मंबाजी हा गृहस्थ तुकारामांचा अत्यंत द्वेष करत असे. तुकारामांची वाढती कीर्ती त्याला सहन होत नव्हती. गावांतील एका नर्तकीला हाताशी धरून त्याने तुकारामांना बदनाम करण्याचे ठरवले. ती वाईट चालीची स्त्री तुकारामांना भुलवण्यासाठी त्यांच्याकडे गेली पण परद्रव्य आणि परनारी विषासमान मानणे हा तुकोबांचा बाणा होता.


**'पराविया नारी रखुमाईसमान।**
**जाईं वो तू माते न करीं सायास।**

असे बुवांनी तिला निक्षून सांगितले. त्यांनी तिला 'माता' असे संबोधले. विषयसुखाच्या जाळ्यांत अडकवण्यासाठी आलेल्या स्त्रीला माता म्हणून त्यांनी तीचा इरादा फोल ठरवला. तिला सांगितले, 'तुझे हे पतन म्हणजे दुर्वर्तन मला पाहवत नाही.' महाराजांनी मोठ्या कनवाळूपणे तिला उपदेश केला. महाराजांचा तो संयम आणि त्यांचा कनवाळपणा पाहून ती बदलून गेली. तिला आपल्या कृत्याचा पश्चाताप झाला. तीने त्यांची क्षमा मागितली. ती पुढे तुकारामांची भक्त झाली. संतांचा सहवास हा असा असतो ! वाईट गुणांचा नाश करणारा आणि मनुष्याला चांगल्या मार्गाला लावून त्याचा उध्दार करणारा!

ज्ञानेश्वर माऊलींनी पसायदानामध्ये 'खळांची व्यंकटी सांडो' असे म्हटले आहे, म्हणजे दृष्टांचा दुष्टपणा नाहीसा होवो असे दान मागितले आहे. दुष्टांचा नाश व्हावा अशी इच्छा नाही केली. सर्व संत याच पद्धतीने वागतात. तुकारामबुवांनी त्या बाईच्या वाईट वृत्तींचा नाश केला. मंबाजी मात्र आपला डाव फसला हे पाहून निराश झाला, मात्र तो काही स्वस्थ बसणार नव्हता! त्याने दुसरा बेत आखला. विठ्ठल मंदिराच्या प्रदक्षिणेच्या मार्गावर त्याने काट्यांचा ढीग पसरला. तुकारामबुवांनी तो ढिग बाजूला केला व प्रदक्षिणेची वाट मोकळी केली. मंबाजीला हे समजतात त्याने काट्याची फांदी घेऊन तुकाराम महाराजांना खूप झोडपले.

तुकोबांच्या अंगातून रक्त वाहू लागले. तुकारामांच्या पत्नीला, आवलीला हे समजताच तीने बुवांना घरी आणून औषधपाणी केले व मंबाजीच्या घरी जाऊन त्याला भरपूर शिव्या दिल्या. थोड्यावेळाने तुकोबा स्वतः मंबाजीच्या घरी गेले. तो झोपला होता. हळुवारपणे त्याचे हातपाय चेपू लागले. तो जागा झाल्यावर त्याला म्हणाले, 'मला काही झालं नाही पण तुम्ही दमला असाल'' हे संतांचे 'संतत्व' आहे. बुवांनी त्याला काडीचाही दोष न देता क्षमा केली. संत हे दया व क्षमे से सागर असतात हेच खरे! **

# बहुगुणी फलक




शिक्षकाच्या व विद्यार्थ्यांच्या जीवनात फलकाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. शिक्षकाचा तर तो अध्यापानासाठीचा महत्त्वाचा मित्र आहे. त्याच्या साथीशिवाय शिक्षक आपले अध्यापन पूर्णच करू शकत नाही. तर, विद्यार्थ्यांच्या अध्यापनात महत्त्वाचा बदल शालेय फलकाशिवाय होऊ शकत नाही. कालपरत्वे या फलकांमध्ये बदल होत गेला. ब्लॅकबोर्ड, व्हाईट बोर्ड, ग्रीन बोर्ड, इलेक्ट्रिक बोर्ड, इलेक्ट्रॉनिक बोर्ड आणि इत्यादी अगणित बोर्ड आले आणि येत राहतील. मात्र, कितीही आधुनिकता आली तरी फलकाचे महत्त्व कमी झाले नाही. फक्त त्याचे स्वरूप बदलले.

काही वेळेस शिक्षकाला एकापेक्षा अधिक वर्गासाठी एकाच वेळी अध्यापन करावे लागते. अशा वेळी शिक्षकाच्या मदतीला धावून येतो तो म्हणजे बहुगुणी फलक. एकापेक्षा अधिक वर्गांना अध्यापनाद्वारे विद्यार्थ्यांना गुंतवून ठेवून अध्यापन निष्पत्ती साधायची असेल तर शिक्षकाला बहुगुणी फलाकाशिवाय पर्याय नसतो.

बहुगुणी फलक म्हणजे एकाच फलकावर विविध अध्ययन निष्पत्ती साध्य करण्यासाठी केलेली रचना कृती होय.

उदा. आपल्या समोर जो फलकाचा नमुना दिलेला आहे. त्या फलकावर एकाच वेळी विविध अध्यापन कृती विविध वर्गासाठी घेता येतात.

उदा. १) संख्यावाचन सराव.
२) संख्येचे विस्तारित रूप
३) अंकांची स्थानिक किंमत.
४) रुपये पैसे, तास मिनिटे
५) किलोग्रॅम- सेंटीमीटर
६) मीटर- सेंटीमीटर

इत्यादी कृती बहुगुणी फलकावर घेता येतात. त्यामध्ये फक्त जुजबी बदल करावा लागतो. हे शिक्षकाने लक्षात घ्यावे.

हे बहुगुणी फलक कसे तयार करावे.

आकडेमोड
राजेंद्र पाटील
९८२२३०२०८५

**बहुगुणी फलक**

साहित्य :- २ ग २ फुट प्लायवूड, इलेक्ट्रीक फिटींग पट्टी, २ नग कार्ड पेपर फेव्हीकॉल, पाव इंची चुका, ९ फूट गोट पट्टी गम मार्कर

**कृती :-**

१) प्रथम प्लायवूड घ्या व त्यावर कार्डपेपर चिकटवून घ्या. यानंतर त्याच्या चारी बाजूस त्याच्या मापाची गोटपट्टी मारा व वर दोन कान अडकवण्यास बसवा.

२) यानंतर इलेक्ट्रीक पट्टी (फीटींग) त्या पट्टीचे २ भागापैकी कोणताही १ भाग घ्या व त्याचे १८ फुटाचे पट्टीचे कापून समान ५ भाग करा. प्लायवुडला आकर्षक नाव लिहिण्यास जागा सोडून फिटींग पट्ट्या समान इंच अंतरावर फेव्हिकॉल व खिळे मारुन चिकटवा.

३)बसवलेल्या पट्टीच्या समोरील राहिलेल्या जागेत दुसऱ्या व तिसऱ्या पट्टीच्या समोर १X१ इंचाच्या दोन पट्ट्या बसवा.
जेणेकरून संख्याचिन्हे +, -, X, बसवता येतील.

४) यानंतर फिटींग पट्टीच्या राहिलेल्या दुसऱ्या भागाचे १८ इंचाचे दोन भाग करा व प्रथम पट्टीवर एक भाग बसवा व त्यावर एकक, दशक असे कोटीपर्यंत लिहा. दुसरी राहिलेली पट्टी चार नंबर पट्टीवर बसवा व त्यावर रेघ मारा. राहिलेल्या पट्टीचे ४ इंचाचे १० समान भाग करा व प्रत्येकावर रुपये, पैसे, मीटर, सेमी, ग्रॅम, की, ग्रॅम, तास, मिनीट, लीटर, मिली, लिहा. पुन्हा राहिलेल्या पट्टीचे एक इंचाचे आपणास हवे तितके तुकडे करा. त्यावर ० ते ९ अंक लिहा.

**साहित्य कसे वापरावे :-** कोणताही अंक घ्या व प्लायवुडवर बसवलेल्या पट्टीच्या खाचेत बसवा व कोणत्याही क्रिया दोन अंकी, तीन अंकी घेऊन बेरीज वजाबाकी... संख्या वाचन घेऊ शकता. इतर वेळेस एकक दशकाची पट्टी काढून त्या ठिकाणी रु.पै... कोणत्याही क्रिया घालून त्याची बेरीज, वजाबाकी घेऊ शकता. अंक पट्टीवर मागे-पुढे सरकवून बेरीज संख्या बदलू शकता. या पद्धतीने एकाच साहित्यावर वेगवेगळ्या क्रिया मनोरंजन पद्धतीने शिकवू शकता.

**उपयोग**

१) इ.५ वी ते ७ वी गणित
२) संख्या वाचन सराव
३) संख्येचे विस्तारात रुप
४) अंकांची स्थानिक किंमत
५) रुपये, पैसे, तास, मिनिटे, ग्रॅम, कि.ग्रॅ., लीटर, मिलीलीटर, मीटर, सेंटीमीटर, इ. गोष्टी या बहुगुणी फलकावर शिकता येतात. **

# बलात्काऱ्यांना फाशी किंवा जन्मठेप ही शिक्षा पुरेशी नाही





निलेश साठे

संपूर्ण देशभरात वरचेवर बलात्काराच्या घटना या घडत आहेत. का लोक एवढे मस्तावलेत.. मागच्या काही दिवसांपासून बलात्काराचे प्रकार प्रमाणाच्या बाहेर वाढले आहेत. का लोक हैवानासारखे वागू लागले आहेत. त्यांना पोलीस आणि कायद्याचीसुद्धा भीती राहिलेली नाही. मग असं हे का होतंय यावर विचार करण्याची वेळ आली आहे. तीन-तीन, चार-चार वर्षांच्या मुलींनासुद्धा आता टार्गेट केले जात आहे. या गुन्ह्याचं गांभीर्य वेळेत ओळखलं पाहिजे अन्यथा खूप मोठी किंमत आपल्या देशाला मोजावी लागेल. कारण बलात्कार हा गुन्हा काही नकळतपणे घडत नाही. तो जाणूनबुजून केला जातो. यात पीडित व्यक्तीचे संपूर्ण आयुष्य बरबाद केले जाते. पीडित व्यक्ती भविष्यातील एखादा मोठा खेळाडू, मोठा ॲक्टर किंवा एखादा मोठा मंत्री, एखादा समाजसेवक, शास्त्रज्ञ, डॉक्टर किंवा आणखी काही बनू शकेल. हे आपल्या कोणालाही माहीत नाही. परंतु, या घाणेरड्या आणि किळसवाण्या घटनेमुळे त्यांचे पंख अवेळीच छाटले जातात. उमलण्या आधीच त्यांच्या संपूर्ण स्वप्नांचा चुराडा होतो. हे नक्की. त्या एका घटनेमुळे संपूर्ण कुटुंब उद्ध्वस्त होते. त्यामुळे बलात्काराचे प्रकार हे रोखलेच गेले पाहिजेत. हे बलात्कारी अतिशय घाणेरड्या विचाराचे असतात. ते वेळ जागा आणि परिस्थिती पाहून सारासार विचार करून हे कृत्य करत असतात. जो अक्षम्य गुन्हा आहे.

बलात्काऱ्यांना काय शिक्षा द्यावी यावर जेव्हा सर्वसामान्यांच्या प्रतिक्रिया घेतल्या. त्यावेळी वेगवेगळी प्रतिक्रिया देण्यात आली. कोणी म्हणाले त्याचे लिंग कापून टाका. कोणी म्हणाले त्याचे एन्काऊंटर करा. कोणी म्हणाले त्याला झाडाला टांगा आणि दगडाने ठेचून मारा जोपर्यंत त्याचा जीव जात नाही. कोणी म्हणाले त्याचे हातपाय तोडा. कोणी म्हणाले फाशी द्या किंवा जन्मठेप तरी करा. अर्थात, हा जनसामान्यांचा आक्रोश आहे. जनसामान्यांचा राग आहे. पण, न्यायालयाला काय मान्य आहे. कायदा काय म्हणतो. त्यावरच शिक्षा सुनावले जाते.

बलात्काऱ्याना फाशी किंवा जन्मठेप ही शिक्षा पुरेशी नाही. कारण हे गुन्हेगार फार बदमाश झालेले आहेत. त्यांना फाशी आणि जन्मठेपे बद्दल काहीच वाटत नाही. कारण, फाशी दिली तर दोन मिनिटात विनात्रासात खेळ खल्लास. असं पण मरायचं आहे आणि तसं पण मरायचं आहे, असा विचार हे बदमाश करत असतात. त्यामुळे त्यांना त्यांच्या मरणाबद्दल काहीच वाटत नाही. आणि जर का जन्मठेपेची शिक्षा दिली तर चार भिंतीच्या आतमध्ये सुरक्षित दोन वेळा फुकट जेवण भेटेल. असासुद्धा विचार करण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे अशा गुन्हेगारांना फाशी किंवा जन्मठेप न देता दुसऱ्या कुठल्यातरी वेगळ्या प्रकारची शिक्षा होणे गरजेचे आहे. परंतु ती शिक्षा अशी दिली गेली पाहिजे की ते वाचून किंवा ऐकून लाखो लोकांचा थरकाप उडायला पाहिजे. तर आणि तरच हे प्रकार कुठेतरी रोखले जाऊ शकतील. अन्यथा हे प्रकार अधूनमधून घडतच राहणार. कळ्या चिरडल्या जाणार. कित्येक कुटुंब उद्‌ध्वस्त होणार. कित्येकांचे भविष्य अंधकारमय होणार. मग आंदोलने मोर्चा मेणबत्ती पेटवणे. जाहीर निषेध. आणि तारीख पे तारीख. **

# बाप्पांना निरोप देताना...

**बाप्पांना निरोप देताना मन आपसूकच दाटून येते. गेले काही दिवस गणरायाच्या आगमनामुळे सर्वत्र चैतन्यमय वातावरण होते. देशभरात सामाजिक एकात्मतेचे प्रतीक म्हणून साजरा होणारा सार्वजनिक गणेशोत्सव लोकमान्य टिळकांमुळे सामाजिक एकोप्याचा सण बनला खरा, पण या उत्सवाने सणाचे पावित्र्य, समाजाला होणारे फायदे-तोटे आणि एकूणच साजरीकरणाबद्दल गांभीर्याने विचार करायलाही भाग पाडले.**



शंतनू चिंचाळकर

अखेर बाप्पाला निरोप देण्याची घटिका समोर आली. गेले काही दिवस गणरायाच्या आगमनाने सर्वत्र चैतन्यमय वातावरण पसरले होते. केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर संपूर्ण भारतात सामाजिक एकात्मतेचं प्रतीक म्हणून साजरा होणारा उत्सव म्हणजे गणेशोत्सव. सुरवातीला घरोघरी साजऱ्या होणाऱ्या या चैतन्य सोहळ्याला लोकमान्य टिळकांमुळे सार्वजनिक गणेशोत्सवाचे सामाजिक एकोपा असलेले रूप आले. आबालवृद्धांना आपल्याशा वाटणाऱ्या सर्वसमावेशक अशा या उत्सवाने निरोपाच्या वळणावर पावित्र्याबद्दल, समाजाला होणाऱ्या फायद्या-तोट्यांबद्दल आणि साजरीकरणाबद्दल गांभीर्याने विचार करायला भाग पाडले. त्याला कारणेदेखील अनेक होती. सालाबादप्रमाणे दरवर्षी उत्सवामध्ये येणारा तोचतोचपणा, त्यात अपेक्षित असलेले वेगळेपण आणि उत्सव संपल्यावर त्यातून सामाजिक पातळीवर काय बदल जाणवले, त्यातून आवर्जून वर्णन करावे असे काय फलित निघाले या विचारांची चक्र अनंतचतुर्दशीचा दिवस जवळ येऊ लागला तशी डोक्यात फिरू लागली.

बऱ्याच सार्वजनिक मंडळांच्या गणपतींचे सातव्या अथवा दहाव्या दिवशी विसर्जन होते. सोसायट्यापुरत्या मर्यादित असलेल्या मंडळांकडून यंदादेखील फार अपेक्षा नव्हत्या. कारण मर्यादित संख्येने असलेल्या सभासदांकडून गोळा होणाऱ्या अल्पश्या वर्गणीतूनही त्यांनी सालाबाद प्रमाणे सामाजिक संदेश देणारे देखावे, मनोरंजनाचे दर्जेदार कार्यक्रम, बाळगोपाळांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन केले होते. अशा छोटेखानी पण सार्वजनिक स्वरूपाच्या गणेशोत्सवात सोसायटीतल्या ज्येष्ठ सभासदांनी मंडळांच्या कार्यक्रमावर वैयक्तिक लक्ष दिल्याचे जाणवत होते. त्यामुळे कार्यकर्त्यांच्या वागणुकीत शिस्त आणि सभासदांनी वर्गणी रूपाने दिलेल्या पैशाच्या होणाऱ्या अनावश्यक व अवाजवी खर्चावर नियंत्रण ठेवले गेले. उत्सवाची ही एक जमेची बाजू म्हणावी लागेल. असे असले तरी मोठ्या प्रमाणावर वर्गणी गोळा करणाऱ्या आणि सार्वजनिक ठिकाणी साजऱ्या होणाऱ्या मंडळांवर पुरेसा अंकुश असल्याचे जाणवत नाही.

समाजात मानाचे स्थान असलेल्या एखाद्या अग्रणी देणगीदाराच्या मदतीतून अनेक मंडळांचे अर्थकारण उभे राहते. अशा मंडळांकडून जल्लोश आणि दिखाऊ साजरी करणापलिकडे फार काही साधत नाही. असे प्रकार थांबावेत म्हणून एक गाव एक गणपती किंवा एक प्रभाग एक गणपती असे स्तुत्य उपक्रम राबवण्याचे आवाहन मंडळांना करणे, पण वर्चस्ववाद श्रेयवाद यापायी ती आवाहने झुगारून देणे यंदाही जाणवले. दरवर्षी महानगरपालिकेने, पोलीस खात्याने मांडवांबद्दल त्यांच्या सार्वजनिक रस्त्यांवरील व्याप्तीबद्दल स्पष्ट निर्देश दिलेले असतात. मात्र, स्थानिक नेत्यांच्या, पुढाऱ्यांच्या मार्फत दबाव आणून नियम झुगारून दिल्याचे जाणवते. यंदाचे वर्षही त्याला अपवाद ठरले नाही. यंदाही अनेक मांडवांनी रस्ते अडवण्याकामी महत्त्वाची भूमिका बजावलीच. संपूर्ण शहरात वाहतुकीचा बोजवारा उडवणारे मोठमोठे मांडव सालाबादप्रमाणे जैसे थे अवस्थेतच दिसले.

काही मंडळांपुढे असलेल्या डॉल्बी सिस्टीमचा आवाज हा नियमाने ठरवून दिलेल्या मानकांपेक्षा बराच जास्त होता हेदेखील लक्षात आले. त्यावर आणि लेझर प्रकाश यंत्रणेवर कुणाचाही अंकुश जाणवला नाही. महागाईमुळे बाजाराची उलाढाल दरवर्षीप्रमाणे ठिकठाक म्हणण्यासारखीच होती. अनेक ठिकाणी व्यापारी आणि दुकानदारांनी सजावटीच्या साहित्यात नव्याने गुंतवणूक करण्यापेक्षा मागील वर्षीचा स्टॉक खपवण्यावर भर दिल्याचे जाणवले. बाजारात आलेल्या पर्यावरणपूरक शाडू मातीच्या मूर्ती तशा महाग आणि सामान्यांना परवडण्यासारख्या नव्हत्या असे म्हणणे वावगे ठरू नये. 'ना नफा ना तोटा' तत्त्वावर विक्री करणाऱ्या काही स्टॉल्सवर एक-एक फुटाच्या मूर्तीदेखील १४००-१५०० रुपयांना मिळत होत्या. यावरून मूर्ती घडवणाऱ्या मूर्तिकारांच्या हाती काय पडले असेल आणि मध्यस्थांनी किती कमावले असेल याची कल्पना यावी.

बळीराजाची हलाखीची परिस्थिती पाहता पूजा साहित्यामधील फुले आणि ऐन उत्सवांच्या आणि सणासुदीच्या काळात वाढणाऱ्या त्यांच्या किंमती हा चर्चेचा विषय ठरावा. एरवी किरकोळ भावात मिळणाऱ्या गुलाबाच्या एका फुलाला १५-२० रूपयांचा भाव मिळत होता. इतर वेळी २०-२५ रूपयांना मिळणारा फुलांचा हार ५० रूपयांना मिळत होता. मार्केट यार्डच्या ठोक बाजारात ३० रुपयांना मिळणारी गड्डी मध्यस्थाचे कमिशन, उत्पादनखर्च आणि वाहतुकीचा खर्च जाता शेतकऱ्याला किती किंमत मिळवून देत असेल हे देखील विचार करण्यासारखे आहे. अर्थात हे वर्षानुवर्ष चालत आले आहे. त्यात काही बदल नाही आणि हेच पहायला आपण दर वर्षी त्या बाप्पाला 'पुढच्या वर्षी लवकर या' असे म्हणतो. गणेशोत्सवावर पोट असणाऱ्या या मुर्तिकरांसाठी, मळे पिकवणाऱ्या शेतकऱ्यांसाठी सरकारकडून अनुदानाची काही तरी घोषणा होईल अशी आशा दर वर्षी लागून असते. आपण भावामध्ये जास्त तोलमोल न करता त्यांचा जास्तीत जास्त फायदा कसा होईल हे पाहतो, कारण तेवढेच आपल्या हातात असते.

अनंत चतुर्दशी संपताच भक्तांच्या अंगातला उत्साह निवळून जाईल. काही दिवस काहीशी रुखरुख लागून राहील. पण ती गणेशोत्सव संपला म्हणून नसेल, तर पूर्वापार एकाच पठडीत साजऱ्या होणाऱ्या या उत्सवात आपल्याला किंवा संबंधित यंत्रणांना आवर्जून वर्णन करावेत असे कोणतेच स्वागतार्ह बदल करता आले नाहीत यासाठी असेल. घरी एक दिवस मुक्कामी असलेली पाहुणेमंडळी जाताना देखील आपले मन हेलावून जाते. इथे तर आपण प्रत्यक्ष गणाधीशाला निरोप देत असतो. वर्षभरात आपल्या हातून कळत-नकळत घडत असलेली पापं उदरात साठवून नष्ट करण्यासाठी स्वतः जलसमाधी घेणाऱ्याला निरोप देताना मन उचंबळून येते. अर्थात विरहामुळे होणाऱ्या दु:खापेक्षा या उत्सवाचे पावित्र्य जपण्याच्या दृष्टीने, आपला सांस्कृतिक वारसा टिकवण्याच्या दृष्टीने, दर वर्षीचा तोच तोच रटाळपणा टाळण्याच्या दृष्टीने फारसे ठोस प्रयत्न झाले नाहीत, ही अपराधीपणाची भावना जास्त सतावून जाते.

श्री गजानन हा विश्वव्यापक, चराचरात सामावलेला देव आहे. तो निर्गुण, निराकार आहे. पण भक्तांच्या प्रेमापोटी तो दहा दिवस साकार मूर्तीच्या रूपात पाहुणा म्हणून येतो. त्याची दहा दिवस भेट झाल्यावर, त्याचे ते साकार रूप पुन्हा नीराकारात एकरूप होणे क्रमप्राप्तच असते. म्हणूनच गणेशाचे विसर्जन केले जाते. पण या विसर्जन कथेवरून माणसाने चराचरात, प्रत्येक माणसात ईश्वर आहे हे जाणूनच आचरण ठेवावे, हा बोध घ्यावा. श्री गणेशाला निरोप देताना आपण 'गणपती बाप्पा मोरया' म्हणतो. त्या 'मोरया' या शब्दाचा अर्थ नमस्कार करणे असा आहे. अशा लाडक्या बाप्पाला निरोप देताना निघणारी विसर्जनाची मिरवणूक ही सामान्य जनतेसाठी मोठी अपूर्वाई आणि आनंद लुटण्याची पर्वणी असते. या मिरवणुकीचे वैशिष्ट्य म्हणजे सगळी माणसे भक्तिभावात दंग होऊन मनसोक्त नाचत असतात. या वेळी कुणी कसेही नाचले तरी कुणीही कुणाला हसत नाही. याच वेळी रस्त्यात खाद्यपदार्थ, खेळणी, विविध अनुषंगिक वस्तू विकणाऱ्यांची लगबगही मजा वाढवत असते. लाऊडस्पीकरवरची गणपतीची गाणी, ढोल-ताशाचा आवाज, विक्रेत्यांची गडबड यामुळे एकूणच वातावरणात उत्साहाची कारंजी उसळत असतात. त्या चैतन्यात चिंब भिजून आपल्याला जगायला नवसंजीवनी मिळते.

पुण्यातल्या मानाच्या पहिल्या कसबा गणपतीसमोरची मिरवणूक तर राजेशाही थाटाची असते. हत्तीदळ, घोडदळ, लयबद्ध लेझीम, ढोल ताशांच्या ठेक्यात भगवा झेंडा नाचवणारे शाखेचे उत्साही सभासद असा नुसता पहात राहण्यासारखाच थाट असतो. तसंच वैभवशाली अशा दगडू हलवाईची मध्यरात्री निघणारी मिरवणूक हा तर स्वर्गीय इंद्रप्रस्थाच्या वैभवाची आठवण देणारा अनुभव असतो. मुंबईतले अनेक गणपती छोट्या इमारतींएवढ्या उंचीचे असतात आणि त्याची मिरवणूकही अशीच प्रेक्षणीय असते. या गणपतींचे विसर्जन समुद्रातच केले जाते. अर्थात पाण्यात विसर्जित केलेल्या प्लास्टर ऑफ पॅरिसपासून बनवलेल्या गणेशमूर्ती नीट पाण्यात विरघळत नाहीत आणि त्या मूर्तींची खरे तर विटंबना होते. त्याचाही विचार करायला हवा. शिवाय अशा मूर्ती बनवताना वापरले जाणारे रंग अनेक प्रकारची द्रव्ये, रसायने एकत्र करून तयार केले जातात. त्यामुळे मूर्ती विसर्जित केल्यावर पाणी प्रदूषित होते. त्यामुळे विसर्जनानंतर मोठ्या प्रमाणावर जल आणि वायू प्रदूषण होते. असे होऊ नये, यासाठी पाण्यात विरघळतील अशाच पर्यावरणपूरक गणेशमूर्ती तयार करणे हा राजमार्ग आहे. अशा मूर्ती बनवण्यासाठी समाजाला वारंवार आवाहन केले जात आहे. या आवाहनाला हळूहळू उत्तम प्रतिसाद मिळू लागला आहे. सुशिक्षित समाज अशा पाण्यात विरघळणाऱ्या मूर्ती स्वतः घरी बनवतो किंवा विकत घेतो, आणि विसर्जन घरातच स्वच्छ पाण्याच्या बादलीत करतो. यातच गणेशमूर्तींचा सन्मान आहे, असे वाटते. **

# चक दे इंडिया !

## भारतानं उडवला पाकिस्तानचा धुव्वा



। नवी दिल्ली। वृत्तसंस्था ।

आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफी २०२४ मध्ये भारतीय हॉकी संघानं आपली विजयी मालिका सुरू ठेवली आहे. शनिवारी (दि.१४) चीनमधील हुलुनबुर येथे झालेल्या सामन्यात भारतानं कट्टर प्रतिस्पर्धी पाकिस्तानचा २-१ असा पराभव केला. भारतासाठी कर्णधार हरमनप्रीत सिंगनं (१३ वं मिनिट आणि १९वं मिनिट) दोन्ही गोल केले. दुसरीकडे, पाकिस्तानकडून एकमेव गोल अहमद नदीमनं ( ७ व्या मिनिटाला) केला.

सामन्यादरम्यान पहिल्या क्वार्टरमध्ये दोन्ही संघांमध्ये चुरशीची स्पर्धा पाहायला मिळाली. खेळाच्या सातव्या मिनिटाला हन्नान शाहिदनं झटपट भारतीय वर्तुळात पोहोचून अहमद नदीमकडे पास दिला. त्यानं भारताचा गोलरक्षक कृष्ण बहादूर पाठक याला चकवून गोल केला. पहिला धक्का बसल्यानंतर सुमारे ६ मिनिटांनी भारताचा कर्णधार हरमनप्रीत सिंगनं पेनल्टी कॉर्नरवर गोल करत बरोबरी साधली. दुसरा क्वार्टर भारताच्या नावे राहिला, ज्यात हरमप्रीत कौरनं पेनल्टी कॉर्नरद्वारे दुसरा गोल केला.

हाफ टाईमपर्यंत भारत २-१ ने आघाडीवर होता. त्यानंतर तिसऱ्या क्वार्टरमध्ये पाकिस्ताननं बरोबरी साधण्याचा प्रयत्न केला. पाकिस्तानला काही पेनल्टी कॉर्नरही मिळाले. परंतु भारताच्या बचावफळीनं ही संधी हाणून पाडली. या क्वार्टरमध्ये भारतीय संघालाही गोल करण्याच्या संधी होत्या, पण संघाला त्याचा फायदा घेता आला नाही. यानंतर चौथ्या क्वार्टरमध्येही दोन्ही संघांना एकही गोल करता आला नाही.

भारतीय हॉकी संघाचा चालू स्पर्धेतील हा सलग पाचवा विजय आहे. टीम इंडियानं मागील सामन्यात दक्षिण कोरियाचा ३-१ असा पराभव केला होता. त्याआधी भारतानं मलेशियाचा ८-१ असा पराभव करत उपांत्य फेरीत प्रवेश केला होता. त्यापूर्वी भारतीय हॉकी संघानं चीनचा ३-० आणि जपानचा ५-० असा पराभव केला होता.

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन आयोजित पंधरा वर्षाखालील मुलींच्या क्रिकेट स्पर्धेत

# रोशनी पारधी हिने ठोकले दुसरे शतक

। पोयनाड । प्रतिनिधी ।

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन आयोजित पंधरा वर्षाखालील मुलींच्या निमंत्रित आंतरजिल्हा निवडचाचणी एकदिवसीय क्रिकेट स्पर्धेतील साखळी फेरीचा दुसरा सामना काल पुणे येथील विस्डॉम क्रिकेट अकॅडमीच्या मैदानावर रायगड विरूद्ध सांगली ह्या संघांमध्ये खेळला गेला. त्यामध्ये रायगड जिल्ह्यातील महाडच्या रोशनी पारधी हिने धुवाधार फलंदाजी करत स्पर्धेतील लागोपाठ दुसरे शतक झळकावत रायगडच्या संघाला विजय मिळवून दिला आहे. अवघ्या ८१ चेंडूंमध्ये २४ चौकाराच्या सहाय्याने तिने नाबाद ११९ धावा काढल्या आहेत.याआधी हिंगोली विरूद्ध तिने शतक केले आहे.



सांगली जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या संघाने प्रथम फलंदाजी करताना ३५ षटकांच्या समाप्तीनंतर ८ गडी गमावत १९० धावा धावफलकावर नोंदवल्या. सांगली संघाची सलामीची फलंदाज कृष्ण सागरे हिने एका बाजूने सयमी फलंदाजी करत ११७ चेंडूमध्ये १११ धावा काढून शतक झळकावले तिला श्रेया जगदाळे हिने दुसऱ्या बाजूने साथ देत ३२ धावा काढल्या. रायगड काढून निषिता विठलानी हिने ४,रोशनी पारधी २ तर स्तुती विठलानी हिने १ फलंदाज बाद केला.१९० धावसंख्येला उत्तर देताना रायगड संघाची कर्णधार रोशनी पारधी हिने चौफेर टोलेबाजी करत स्पर्धेतलं लागोपाठ दुसरं शतक ठोकल. अवघ्या ८१ चेंडूमध्ये नाबाद ११९ धावा तिने केल्या त्यामध्ये २४ चौकारांचा समावेश होता. मधल्या फळीत अनिश्का वर्मा व स्वरा जगताप यांनी प्रत्येकी १५ धावा काढून संघाला योगदान दिले.

२८ व्या षटकात रायगडच्या संघाने सामना ४ गडी राखून जिंकला. रोशनी पारधी हिने स्पर्धेत लागोपाठ दोन शतकं झळकावत रायगडच्या संघाचे अस्तित्व स्पर्धेत कायम ठेवले आहे. रायगडच्या मुलींच्या संघाच्या विजया बद्दल जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील,सचिव प्रदिप नाईक,सहसचिव बशीर चिचकर, सर्व सदस्य, संघ प्रशिक्षक विनय पाटील, संघ व्यवस्थापक प्रज्ञा सकपाळ, प्रशिक्षक आवेश चिंचकर यांनी संघाचे आणि रोशनी पारधीचे अभिनंदन केले आहे.

# इंग्लंडने ऑस्ट्रेलियाचा केला पराभव

। कार्डिफ । वृत्तसंस्था।

इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात खेळल्या जात असलेल्या ३ सामन्यांच्या -२० मालिकेतील दुसऱ्या सामन्यात इंग्लंडने ऑस्ट्रेलियाचा ३ गडी राखून पराभव केला. यासह मालिकेत १-१ अशी बरोबरी झाली आहे. ऑस्ट्रेलियाने पहिला सामना २८ धावांनी जिंकला होता. कार्डिफच्या सोफिया गार्डन्स स्टेडियमवर झालेल्या सामन्यात इंग्लंडचा कर्णधार फिल सॉल्टने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला.

जेक फ्रेझर-मॅकगुर्कचे पहिले अर्धशतक आणि जोश इंग्लिशच्या ४२ धावांच्या जोरावर ऑस्ट्रेलियाने ६ गडी गमावून १९३ धावा केल्या.लक्ष्याचा पाठलाग करताना इंग्लिश अष्टपैलू खेळाडू लियाम लिव्हिंगस्टोनने शानदार फलंदाजी केली. त्याच्या ८७ आणि जेकब बेथेलच्या ४४ धावांच्या जोरावर इंग्लंडने १९ व्या षटकात ७ गडी गमावत १९४ धावा करत विजय मिळवला. लियाम लिव्हिंगस्टोनला त्याच्या ८७ धावा आणि २ विकेट्ससाठी सामनावीर म्हणून गौरवण्यात आले.

पॉवरप्लेच्या ६ षटकांत ऑस्ट्रेलियाने १ गडी गमावून ६७ धावा केल्या. येथे मॅथ्यू शॉर्ट आणि ट्रॅव्हिस हेड या दोन्ही सलामीवीरांनी पहिल्या विकेटसाठी २६ चेंडूत ५२ धावा जोडल्या. ऑस्ट्रेलियाने पहिल्या ५० धावा फक्त ४ षटकात पूर्ण केल्या. इंग्लंडचा कर्णधार फिल सॉल्टने शानदार सुरुवात करून दिली. त्याने २३ चेंडूत ३९ धावा केल्या, ज्याच्या मदतीने संघाने पहिल्या ६ षटकात २ गडी गमावून ६५ धावा केल्या.

ऑस्ट्रेलियन फलंदाज जॅक फ्रेजर मॅकगर्कने इंग्लंडविरुद्ध पहिले अर्धशतक झळकावले. १६१ च्या स्ट्राईक रेटने फलंदाजी करताना त्याने ३१ चेंडूत ५० धावा केल्या. मॅकगर्कने या डावात ४ चौकार आणि २ षटकार मारले.त्याच्याशिवाय यष्टीरक्षक जोश इंग्लिशनेही ४२ धावांची जलद खेळी केली. कर्णधार ट्रॅव्हिस हेडने १४ चेंडूत ३१ धावा केल्या. इंग्लंडकडून ब्रीडेन कार्स आणि लियाम लिव्हिंगस्टोनने २-२ विकेट घेतल्या. तर सॅम कुरन आणि आदिल रशीद यांनी १-१ विकेट घेतली.

# रोनाल्डोचे १०० कोटी फॉलोअर्स

**नवी दिल्ली :** पोर्तुगालचा स्टार फुटबॉलपटू ख्रिस्तियानो रोनाल्डो सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर १ अब्ज म्हणजेच १०० कोटी फॉलोअर्स असलेला जगातील पहिला व्यक्ती ठरला आहे. खुद्द रोनाल्डोने सोशल मीडिया पोस्टद्वारे ही माहिती दिली.ही कामगिरी केल्यानंतर रोनाल्डोने गुरुवारी एक पोस्ट केली. या पोस्टच्या शेवटी लिहिले, माझ्यावर विश्वास ठेवल्याबद्दल, मला पाठिंबा दिल्याबद्दल आणि माझ्या जीवनाचा एक भाग बनल्याबद्दल धन्यवाद. रोनाल्डोच्या सोशल मीडिया फॉलोअर्समध्ये इन्स्टाग्रामवर ६०० दशलक्ष (६० कोटी) पेक्षा जास्त, एक्सवर १०० दशलक्ष (१० कोटी), फेसबूकवर १७० दशलक्ष (१७ कोटी) आणि यूट्युबवर ६० दशलक्ष (६ कोटी) पेक्षा जास्त सबस्क्रायबर आहेत.रोनाल्डो हा इंस्टाग्रामवर सर्वाधिक फॉलो केला जाणारा सेलिब्रिटी आहे. अर्जेंटिनाचा फुटबॉलपटू लिओनेल मेस्सी दुसऱ्या स्थानावर आहे. त्याचे ५०० दशलक्ष (५० कोटी) फॉलोअर्स आहेत.

# अफगाणिस्तान-न्यूझीलंड कसोटी रद्द

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

अफगाणिस्तान-न्यूझीलंडची एकमेव कसोटी पावसामुळे रद्द झाली आहे. नोएडामध्ये शुक्रवारी सकाळपासून पाऊस सुरूच होता आणि मैदान पाण्याने भरले होते. सामना अधिकाऱ्याने सकाळी मैदानाची पाहणी करून सामना रद्द करण्याचा निर्णय घेतला. अफगाणिस्तान क्रिकेट बोर्डाने सांगितले- मग्रेटर नोएडामध्ये अजूनही पाऊस पडत आहे. सततच्या पावसामुळे सामना अधिकाऱ्यांनी पाचव्या आणि शेवटच्या दिवसाचा खेळही रद्द केला आहे.

कसोटी क्रिकेटच्या इतिहासात पहिल्यांदाच भारतातील कसोटी सामना एकही चेंडू टाकल्याशिवाय रद्द करण्यात आला आहे. हा एकूण ८ वा सामना आहे. ब्लॅककॅप्स म्हणून प्रसिद्ध असलेल्या न्यूझीलंड क्रिकेट बोर्डाने या पोस्टद्वारे कसोटी रद्द झाल्याची माहिती दिली. शनिवारी (दि.१४) हा संघ श्रीलंकेला रवाना होईल, जिथे किवींना कसोटी मालिका खेळायची आहे.

# अविनाश साबळेची भारतासाठी ऐतिहासिक कामगिरी



। पॅरिस । वृत्तसंस्था ।

महाराष्ट्राच्या अविनाश साबळेने शुक्रवारी मध्यरात्री इतिहास घडवला. ३००० मीटर स्टीपलचेस स्पर्धेतील राष्ट्रीय विक्रम धारक अविनाश साबळे हा डायमंड लीग फायनल खेळणारा भारताचा पहिला ट्रॅक ॲथलीट आहे. अविनाशने आज त्याच्या ३०व्या वाढदिवशी ब्रुसेल्समध्ये या विक्रमाला गवसणी घातली.

जगातील अव्वल १२ खेळाडूंमध्ये झालेल्या या फायनलमध्ये अविनाशसमोर पॅरिस ऑलिम्पिक चॅम्पियन सौफियाने एल बक्काली (मोरोक्को) आणि कांस्यपदक विजेता अब्राहम किबिवोट (केनिया) यांचे आव्हान होते. त्याने पॅरिस डायमंड लीगमध्ये ८:०९.९१ सेकंदाच्या वेळेसह स्वतःचा राष्ट्रीय विक्रम मोडला होता आणि तीन गुण मिळवले. राष्ट्रीय विक्रम मोडण्याची ही दहावी वेळ होती.

अविनाशने ऑगस्टमध्ये सिलेसिया डायमंड लीगमध्ये ९:२९.९६ सेकंद वेळेसह १४ वे स्थान मिळविले होते. पण, डायमंड लीगमध्ये पात्र ठरलेल्या अव्वल १२ खेळाडूंपैकी दोघांनी माघार घेतल्याने अविनाशला फायनल खेळण्याची संधी मिळाली. मागच्या डायमंड लीगच्या फायनलसाठी अविनाश पात्र ठरला होता, परंतु त्याने माघार घेतली होती.

मोरोक्कोचा बक्काली, केनियाचा विलबरफोर्स कोनेस यांनी पहिल्या ४०० मीटर अंतरापर्यंत आघाडी घेतली होती. अविनाश १२व्या क्रमांकवर होता. १२०० मीटर अंतर कापल्यानंतर केनियाचा आमोस सेरेम आणि अब्राहम किबिवोट यांच्यासह इथोपियाचा गेतनेट वेल अव्वल तिघांमध्ये आले. अविनाशही एक क्रम वर सरकला होता. २००० मीटरनंतर बोयूसेल व कोनेस या दोघांनी माघार घेतली आणि अविनाश दहाव्या क्रमांकावर आला. अविनाशची प्रगती होत होती, परंतु अव्वल तीनमध्ये स्थान मिळवण्यासाठी त्याचे प्रयत्न अपूरे ठरले. केनियाचा सेरेम ८:०६.९० सेकंदासह अव्वल आला, तर मोरोक्कोचा बक्काली ( ८:०८.६० से.) आणि ट्युनिशियाचा मोहम्मद आमीन (८:०९.६८ से.) अनुक्रमे दुसरे व तिसरे आले. भारताच्या अविनाशला ८ मिनिटे १७.०९ सेकंदासह ९व्या क्रमांकावर समाधानी रहावे लागले. सेरेमने पॅरिस ऑलिम्पिक चॅम्पियनला हरवून आश्चर्याचा धक्का दिला.

# राष्ट्रीय महिला कबड्डी खेळाडू पुष्पा महाडेश्वर काळाच्या पडद्या आड

**मुंबई :** बँक ऑफ महाराष्ट्र, मुंबई व महर्षी दयानंद स्पोर्ट्स क्लबची राष्ट्रीय खेळाडू पुष्पा महाडेश्वर (रोडे)यांचे (दि.११) सायंकाळच्या सुमारास प्रदीर्घ आजाराने निधन झाले. निधना समयी ती ६२ वर्षांची होती. तिच्या पश्चात एक मुलगा व मुली असा परिवार आहे. काही वर्षापूर्वी त्यांच्या पतीचे निधन झाले होते. कबड्डी खेळाडू म्हणून महाराष्ट्र बँक व महर्षी दयानंद संघाकडून खेळताना त्यांनी महाराष्ट्रातील व देशातील अनेक मैदाने गाजविली होती. आजारपणामुळे त्यांनी बँकेतून काही वर्षापूर्वी सेवानिवृत्ती घेतली होती.



त्यांनी तीन राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व केले होते. उत्कृष्ट डावा कोपरारक्षक असलल्या पुष्पा चवडा काढण्यात निष्णात होत्या. चढाईत पाठलाग करून गडी टिपण्यात त्यांचा हातखंडा होता. १२ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास त्यांच्या पार्थिवावर चेंबूरच्या चरई स्मशानभूमीत मुलाच्या हस्ते अंत्य संस्कार करण्यात आले.

# दुलीप ट्रॉफीत अभिमन्यू ईश्वरनचे शानदार शतक!

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था।

दुलीप ट्रॉफी २०२४ ची दुसरी फेरी खेळली जात आहे. पहिल्या फेरीच्या सामन्यात भारताच्या अनेक स्टार खेळाडूंनी भाग घेतला होता. मात्र आता बांगलादेशविरुद्धच्या कसोटी मालिकेची तयारी करण्यासाठी या खेळाडूंनी स्पर्धेतून माघार घेतली. दुलीप ट्रॉफीत असे अनेक खेळाडू खेळत आहेत, जे भारतीय संघात संधीची वाट पाहतायेत. यातीलच एक खेळाडू म्हणजे पश्चिम बंगालचा अभिमन्यू ईश्वरन.



तो दुलीप ट्रॉफीमध्ये इंडिया बी संघाचा कर्णधार आहे. ईश्वरननं दुसऱ्या फेरीतील सामन्यात इंडिया सी विरुद्ध शानदार शतक झळकावलं. यासह भारतीय संघातील जागेसाठी त्यानं आपला दावा ठोकला आहे.हा उजव्या हाताचा सलामीवीर इंडिया ए विरुद्धच्या पहिल्या सामन्यात अपयशी ठरला होता. तो दोन्ही डावात मिळून केवळ १७ धावाच करू शकला. मात्र इंडिया सी विरुद्धच्या सामन्यात त्यानं शानदार पुनरागमन केलं. इंडिया सी नं पहिल्या डावात ५२५ धावांचं डोंगर उभा केला आहे.

अभिमन्यू ईश्वरननं या धावसंख्येला जोरदार उत्तर देत इंडिया बी साठी सलामीला शतक ठोकलं. चहापानापर्यंत त्यानं १८६ चेंडूत १०८ धावा ठोकल्या होत्या. त्याच्या या खेळीत १० चौकार आणि १ षटकाराचा समावेश आहे.अभिमन्यू ईश्वरन गेल्या वर्षी दक्षिण आफ्रिकेच्या दौऱ्यात ऋतुराज गायकवाडचा बॅकअप म्हणून गेला होता. मात्र तेव्हा त्याला पदार्पणाची संधी मिळाली नाही.




पीएनपी शाळेच्या विद्यार्थ्याची बॉक्सिंग स्पर्धेत

# कांस्य पदकावर झेप




। अलिबाग । प्रतिनिधी ।

प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटी होली चाईल्ड सीबीएसई शाळेसाठी अतिशय अभिमानाचा क्षण आहे, पीएनपी शाळेमध्ये नववी मधील अथर्व दत्ताराय मोरे, संजय घोडावत इंटरनॅशनल स्कूल, कोल्हापूर, महाराष्ट्र येथे आयोजित ''सीबीएसई दक्षिण विभाग २ बॉक्सिंग स्पर्धा २०२४-२५'' मध्ये कांस्य पदक मिळवले. ९ ते ११ सप्टेंबर दरम्यान झालेल्या या स्पर्धेत मास्टर अथर्व दत्ताराय मोरे याने शाळेसाठी विभागीय स्तरावर पदक मिळवले. या स्पर्धेत संपूर्ण दक्षिण विभागातील राज्यांमधून एकूण ९८ शाळा आणि विविध श्रेणीतील सुमारे ५५० विद्यार्थी सहभागी झाले होते. अथर्वने केरळच्या हेरॉल्डला पराभूत करून स्पर्धेतील ८० किलो वजनी गटात तिसरा क्रमांक पटकावला.

प्रभाकर एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाह चित्रलेखा नृपाल पाटील या यशाच्या या प्रवासात शिक्षक आणि विद्यार्थ्यांसाठी भक्कम आधारस्तंभ ठरल्या. त्यांच्या मार्गदर्शन व पाठबळामुळेच हे शक्य झाले असल्याचे शाळेच्या मुख्याध्यापिका वेल्लईम्मल यांनी सांगितले. यावेळी चित्रलेखा पाटील यांनी सीबीएसई विभागाचे मुख्याध्यापिका वेल्लईम्मल मुरुगन, उपमुख्याध्यापिका सदाफ शाहबाजकर, पी. टी. प्रशिक्षक आदित्य यादव आणि होली चाईल्ड सीबीएसई शाळेच्या संपूर्ण टीमचे अभिनंदन केले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(✽ या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)